• पुणे, शुक्रवार, २९ नोव्हेंबर २०२४ • RASHTRA SANCHAR-Vol-4-issue 03 • वर्ष ४ थे, अंक ०३ • किंमत ₹ ६ • पाने : १२



मिळकतकर थकबाकीदारांचा वाजणार 'बॅन्डबाजा'..!
P3

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com
BEYOND THE NEWS



गुकेशचा उलटवार, तिसरा डाव जिंकला; लिरेनला आणले शरण
P12

## At a Glance

### वंदे भारत एक्सप्रेसवर झाली दगडफेक

**नवी दिल्लीः** देशातील सर्वात प्रीमियम ट्रेन म्हणजेच वंदे भारत एक्सप्रेसवर



पुन्हा एकदा दगडफेक करण्यात आली आहे. त्यामुळे रेल्वेच्या दोन डब्यांच्या खिडक्यांच्या काचा फुटल्या. या दगडफेकीमुळे ट्रेनमध्ये बसलेले प्रवासी घाबरले. 'वंदे भारत'वर ही दगडफेक गाझियाबादच्या मोदीनगर भागात झाली.

### पाणबुडीवर बॅलिस्टिक क्षेपणास्त्राची चाचणी

**विशाखापट्टणमः** भारतीय नौदलाने आण्विक पाणबुडी 'आयएनएस अरिघात'वरून ३,५०० किलोमीटर के-४ बॅलिस्टिक क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी घेतली. विशाखापट्टणमच्या किनाऱ्याजवळ ही चाचणी घेण्यात आल्याची माहिती संरक्षण सूत्रांनी दिली आहे. 'आयएनएस अरिघात' ही देशाची दुसरी अणुशक्तीवर चालणारी बॅलिस्टिक क्षेपणास्त्र पाणबुडी आहे.

### पुन्हा हेमंत सोरेन पर्वाला सुरूवात!

**नवी दिल्ली :** हेमंत सोरेन यांनी काल गुरुवारी पुन्हा एकदा झारखंडच्या मुख्यमंत्रीपदाची सूत्रे स्वीकारली. रांची येथे आयोजित एका भव्य समारंभात त्यांनी राज्याचे १४ वे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. राज्यपाल संतोष कुमार गंगवार यांनी सोरेन यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. झारखंड मुक्ती मोर्चा नेत्याची मुख्यमंत्री म्हणून ही चौथी टर्म आहे. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, आपचे राष्ट्रीय संयोजक आणि दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल, पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान , पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी या वेळी उपस्थित होते. यासोबतच झामुमोचे राष्ट्रीय अध्यक्ष शिबू सोरेन आणि त्यांच्या पत्नी रुपी सोरेनही शपथविधीवेळी उपस्थित होते.

## समाधी सोहळा




**पुष्पवृष्टी :** आळंदी मंदिरात माऊली माऊली नामजयघोषात कीर्तन सेवा, पुष्पवृष्टी आणि घंटानाद, श्रींची आभूषणांसह सजलेल्या पूजेतील लक्षवेधी वैभवी रूप दर्शन, तसेच परंपरेने पहाट पूजा करून श्रींचा ७२९ वा संजीवन समाधी दिन सोहळा प्रथा परंपरांचे पालन करीत नामजयघोषात लाखो भाविकांचे उपस्थितीत परंपरेने साजरा झाला. यावेळी ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी दिन सोहळ्यावर हेलिकॉप्टरने पुष्पवृष्टी केली. (सविस्तर वृत्त पान ८ वर)

## राजस्थान, मध्य प्रदेश पॅटर्न
# मुख्यमंत्री पुण्याचा?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबईः** राज्यात निवडून आलेल्या महायुतीच्या आमदारांचा आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा मुख्यमंत्रिपदासाठी देवेंद्र फडणवीस यांच्या नावासाठी आग्रह असला, तरी आगामी महापालिका आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा विचार करून, मराठा समाजाची नाराजी अधिक होऊ नये, म्हणून भाजप धक्कातंत्र वापरण्याची शक्यता व्यक्त होत आहे. राजस्थान आणि मध्य प्रदेशमध्ये अचानक नवे चेहरे आणून भाजपने देशात जे बेरजेचे राजकारण केले, तसेच राजकारण महाराष्ट्रात मराठा मुख्यमंत्री देऊन केले जाण्याची शक्यता व्यक्त होत आहे. त्यासाठी केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांना महाराष्ट्रात पाठवण्याची चर्चा जोरदार सुरू आहे. » पान ७ वर



### आमदारांची वाढली धाकधूक

• भाजपने भविष्यातील निवडणुकांत फायदा व्हावा या दृष्टिकोनातून आतापासूनच तयारी सुरू केली आहे. या अंतर्गत महायुतीच्या नव्या सरकारमध्ये तरुण नेत्यांना संधी दिली जाणार आहे. तरुण नेत्यांचा मार्ग मोकळा करण्यासाठी ५० वर्षांवरील आमदारांचा पत्ता कट केला जाणार आहे. यामुळे या आमदारांची धाकधूक वाढली आहे.

## चौकशीसाठी त्रिसदस्यीय समिती
# दिव्यांग शिक्षक भरतीत कोट्यावधींचा घोटाळा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** दिव्यागांना चांगली वागणूक द्या, असे न्यायालयाचे स्पष्ट आदेश असतानाही पुणे जिल्ह्यातील अनुदानित शाळांमध्ये दिव्यांग शिक्षकांची भरती करताना कोट्यावधी रुपयांचा घोटाळा झाला असल्याची धक्कादायक माहिती उघडकीस आली आहे, यासंदर्भात दिव्यांग संघटनेने जोरदार 'प्रहार' केल्यानंतर राज्य शासन आणि प्रशासन खडबडून जागे झाले आहे. या घोटाळयाची » पान ७ वर

> या पदांची भरती करताना काही निकष ठरवून देण्यात आले आहेत. मात्र; नुकत्याच झालेल्या या भरतीमध्ये या नियमांची ऐशी की तैशी झाली असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे दिव्यागांवर मोठ्या प्रमाणावर अन्याय झाला आहे, त्याची गंभीर दखल घेऊन दोषींवर कडक कारवाई करण्यात यावी अशी आमची मागणी आहे.
>
> — **धमेंद्र सातव पाटील**
> पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष, प्रहार अपंग क्रांती आंदोलन

> अपंगाच्या नावाखाली अशा प्रकारे मलिदा लाटणे योग्य नाही, त्याची गंभीर दखल दिव्यांग कल्याण आयुक्तालयाने घेतली आहे. त्यासाठीच चौकशी समिती नियुक्त करण्यात आली आहे, त्यामध्ये दोषी आढळलेल्यांवर कडक कारवाई करण्यात येणार आहे. त्यामध्ये कोणाचीही गय केली जाणार नाही.
>
> — **प्रविण पुरी**
> आयुक्त, दिव्यांग कल्याण आयुक्त, महाराष्ट्र

### पंतप्रधानांना जीवे मारण्याची धमकी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पुन्हा एकदा जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. मुंबई पोलिसांच्या नियंत्रण कक्षाला बुधवारी रात्री ९ वाजण्याच्या सुमारास धमकीचा कॉल आला. धमकीच्या कॉलमुळे मोठी खळबळ उडाली असून मुंबई पोलिसांकडून धमकी देणाऱ्याचा कसून शोध घेण्यात आला.

प्रकरणी अंबोली पोलिसांनी एका महिलेला ताब्यात घेतले आहे. धमकीचा फोन आला. मोदींना मारण्याचा कट सुरू असून शस्त्राची तयारी झाल्याची माहिती फोन करणाऱ्या व्यक्तीने दिली. या फोन कॉलची मुंबई पोलिसांनी गंभीर दखल घेऊन मुंबई पोलिसांनी फोन करणाऱ्या व्यक्तीचा शोध सुरु केला. यामध्ये कॉल करणारी व्यक्ती एक महिला असल्याचे समोर आले आहे.

## मतांची टक्केवारी वाढली कशी : पटोले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** विधानसभा निवडणुकीत महायुतीचा प्रचंड विजय झाला असून महाराष्ट्राच्या इतिहासात पहिल्यादांच एखाद्या पक्षाला किंवा आघाडीला इतकं बहुमत मिळालं आहे. महाविकास आघाडीला ५० चा आकडाही गाठता आलेला नाही. या दारुण पराभवानंतर महाविकास आघाडीच्या नेत्यांनी ईव्हीएममध्ये छेडछाड झाल्याचा आरोप केला आहे. त्याचबरोबर मतदान प्रक्रियेवरही शंका उपस्थित केल्या जात आहे. यानंतरआता देशभरात ईव्हीएमचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे. आता काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनीही निवडणूक आयोगावर गंभीर आरोप केला आहे. नाना पटोले यांनी म्हटले की, महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीत मतांच्या टक्केवारीतील तफावत गंभीर व चिंताजनक आहे. निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार मतदानाच्या दिवशी संध्याकाळी ५ वाजता ५८.२२ टक्के मतदान झाले.

» राजकीय

त्याच रात्री ११.३० वाजता ते ६५.०२ टक्के तर दुसऱ्या दिवशी २१ नोव्हेंबर रोजी हेच मतदान ६६.०५ टक्के झाल्याचे सांगितले, यात एकूण ७.८३ टक्के वाढ झाली असूनतब्बल ७६ लाख मतांची ही वाढनेमकी कशी झाली? असा सवाल निवडणूक आयोगाला केला आहे. त्याचबरोबर जिथे मतदान वाढले त्या केंद्राचे व्हिडीओ फुटेज जाहीर करावे, असे आव्हान पटोले यांनी दिले आहे.

## आ.पाटील यांची माहिती; पुस्तक महोत्सव
# नॅशनल बुक ट्रस्टचे कार्यालय पुण्यात होणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** नॅशनल बुक ट्रस्टचे कार्यालय आता मुंबई येथून कायमस्वरूपी पुण्यात होणार असून त्यांना मनपाची एका इमारतीची जागा देखील तात्काळ भाड्याने दिली आहे. त्यामुळे आता केवळ पुणे पुस्तक महोत्सव पुरते काम होणार नसून वर्षभर एनबीटी काम होणार आहे. मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाला आहे.

त्यामुळे याबाबत आता त्याची माहिती सर्वसामान्य लोकांना समजण्यासाठी एक फिल्म तयार करून महोत्सवत दाखवण्यात यावे. मुलांसाठी चित्रपट मोहत्सव सोबत एक पुस्तक आधारित नाटक बसवण्यात यावे. पुस्तकाची आवड त्यातून मुलांमध्ये निर्माण होईल. पुणे शहर हे विविध क्षेत्रात अग्रेसर झाले आहे त्यामुळे पुणे पुस्तक मोहत्सव देखील यशस्वी होईल, असे मत माजी मंत्री चंद्रकांत पाटील यांनी गुरवारी व्यक्त केले.

राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या वतीने यावर्षीच्या पुस्तक महोत्सवाचे आयोजन १४ ते २२ डिसेंबर या कालावधीत फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर करण्यात आले आहे. पुस्तक महोत्सवाचे कार्यालयाचे उद्‌घाटन आणि मांडवाचे भूमिपूजन माजी » पान ७ वर

### तयारीला लागा : ठाकरे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आगामी महापालिका आणि जिल्हा परीषद आदी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या तयारीला लागा असे आदेश मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी विधानसभा निवडणुकीतील पराभूत उमेदवारांच्या बैठकीत दिले.विधानसभा निवडणुकीत मनसेला एकही जागा जिंकता आली नाही. राज ठाकरे यांचा मुलगा अमित ठाकरे हे देखील माहीम विधानसभा मतदारसंघातून पराभूत झाले. राज्यात एकही आमदार निवडुन न आलेल्या राज ठाकरे यांनी पुण्यात पराभुत उमेदवारांची बैठक घेतली. या बैठकीत उमेदवारांनी आपली मते मांडताना, ईव्हीएम मशिनविषयी अधिक तक्रारी केल्या. त्यासंदर्भात बहुतेक उमेदवारांचा सुर होता. तसेच प्रतिस्पर्धी उमेवारांकडून केला गेलेल्या पैश्याच्या वापरापुढे निधी कमी पडल्याचे कारणही काही उमेदवारांनी सांगितले.

## मोदी सरकार बांधणार एक कोटी घरे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** येत्या पाच वर्षांत एक0 कोटी घरे बांधण्याचे मोदी सरकारचे स्वप्न कसे पूर्ण होणार, याचा आराखडा तयार आहे. गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालयातील सहसचिव आणि मिशन डायरेक्टर कुलदीप नारायण यांनी म्हटले आहे, की पाच वर्षांत एक कोटी घरे बांधण्याचे सरकारचे उद्दिष्ट आहे.

गेल्या नऊ वर्षांत आम्ही ९० लाख परवडणारी घरे बांधली आहेत. ती त्याआधीच्या दशकात बांधलेल्या घरांच्या दहापट आहेत. आमचे पुढील लक्ष्य पाच वर्षांत एक कोटी घरे बांधण्याचे आहे. रिअल इस्टेट कंपन्यांची सर्वोच्च संस्था 'नॅशनल रिअल इस्टेट डेव्हलपमेंट कौन्सिल' (नारेडको) ने एका निवेदनात ही माहिती दिली. 'नारेडको' ने भारत आणि संयुक्त अरब अमिराती यांच्यातील संबंध दृढ करण्यासाठी या



परिषदेचे आयोजन केले होते. नारायण यांनी आपल्या भाषणात सांगितले, की भारतात वेगाने होत असलेले शहरीकरण पाहता या दिशेने अधिक प्रयत्नांची गरज आहे. पुढील २० वर्षात आपला आर्थिक विकास दर सरासरी सात ते आठ टक्के राहण्याचा अंदाज आहे. यासोबतच पायाभूत सुविधांसाठी नवीन शहरांचा विकास आणि नाविन्यपूर्ण शहरी नियोजन महत्त्वाचे आहे.

या परिषदेत 'नारेडको' चे अध्यक्ष जी. हरी बाबू म्हणाले, की आज भारत आणि संयुक्त अरब अमिराती हे जगातील सर्वोत्तम मित्र आहेत. भारतातील २१ राज्यांचे प्रतिनिधी या परिषदेत सहभागी झाले होते आणि आम्ही शाश्वत शहरी विकासाचे महत्त्वाचे धडे घेऊन परतत आहोत. भारताच्या गृहनिर्माण क्षेत्राचा प्रवास मूलभूत घरांपासून परवडणाऱ्या, टिकाऊ आणि आलिशान घरांपर्यंत सुरू झाला आहे.

'नारेडको'चे अध्यक्ष डॉ. निरंजन हिरानंदानी म्हणाले, की सध्या भारताच्या सकल देशांतर्गत उत्पादनात (जीडीपी) रिअल इस्टेट क्षेत्राचे योगदान सात टक्के आहे. 'नीती' आयोगाच्या मते, भारत पाच ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था बनल्यानंतर, या क्षेत्राचे योगदान १५ टक्क्यांपर्यंत पोहोचू शकते. या वाढीचा रोजगार, गुंतवणूक आणि २७० सहायक उद्योगांवर सकारात्मक परिणाम झाला आहे.

### प्रेयसीच्या शरीराचे केले ५० तुकडे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** श्रद्धा वाळकर हत्या प्रकरण आठवते का? हैवान आफताबने आपली लिव्ह इन पार्टनर श्रद्धाची हत्या करून तिच्या शरीराचे तुकडे-तुकडे करून जंगलात फेकून दिले. दिल्लीतील या घटनेने संपूर्ण देश हादरला होता. आता झारखंडमध्ये एका नराधम प्रियकराने श्रद्धा वाळकरप्रमाणेच आपल्या प्रेयसीचे अनेक डझन तुकडे केले. शरीराचे छोटे-छोटे तुकडे केल्यानंतर ते जनावरांना खाण्यासाठी जंगलात फेकून दिले. २४ नोव्हेंबर रोजी जरियागड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील जोरडाग गावातील लोकांना असे काही दिसले की, त्यांना धक्का बसला. एक भटका कुत्रा मानवी हात घेऊन फिरत होता. या प्रकरणाची माहिती पोलिसांना देण्यात आली. नरेश भेंगरा असे मारेकऱ्याचे नाव आहे. तो २५ वर्षांचा आहे.

## निवडणुक खर्च : उमेदवारांनो ऐकले का?
# २३ डिसेंबर पर्यंत हिशोब द्या !



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** निवडणुकीच्या दरम्यान उमेदवारांच्या खर्चाची तीन टप्प्यांत तपासणी करण्यात आली होती. त्यात अनेकांचे खर्चाचे हिशोब जुळत नव्हते. उमेदवारांकडे विचारणाही करण्यात आली होती. खर्चाच्या तफावतीबाबत अनेक उमेदवारांनी संबंधित निवडणूक खर्च निरीक्षकांकडे खुलासेही दिले आहेत. मात्र, आता निवडणुका पार पडल्या आहेत. निकालही जाहीर झाले आहे. त्यामुळे निवडणुकीच्या खर्चाचा अंतिम हिशोब देणे सर्व उमेदवारांना

> विधानसभा निवडणुकीच्या अंतिम खर्चाबाबत सर्व उमेदवारांना तपशील देण्यासाठी एका महिन्याची मुदत असते. त्यानुसार, येत्या २३ डिसेंबरपर्यंत सर्व उमेदवारांनी संबंधित निवडणूक अधिकाऱ्याच्या खर्च निरीक्षकाकडे खर्चाचा तपशील देणे आवश्यक आहे. **- सोनप्पा यमगर,** निवडणूक खर्च निरीक्षक.

बंधनकारक आहे.जिल्ह्यातील २१ विधानसभा मतदारसंघात निवडणूक लढविणाऱ्या सर्व ३०३ उमेदवारांना निवडणूक खर्चाचा अंतिम हिशेब देण्यासाठी २३ डिसेंबरपर्यंतची मुदत देण्यात आली आहे. या मुदतीत सर्व उमेदवारांना निवडणूक खर्चाची तपशील निवडणूक शाखेकडे जमा करावा लागणार आहे.

संबंधित उमेदवारांकडून पुढील आठवड्यापासून खर्चाचा तपशील जमा होण्यास सुरुवात होईल. त्यात काही तफावत आढळल्यास त्याबाबत नोटीस पाठवून खुलासा मागविला जाईल. खुलासा समाधानकारक असल्यास संबंधित उमेदवाराचा खर्चाचा अहवाल निवडणूक आयोगाला पाठविण्यात येईल, असे जिल्हा निवडणूक शाखेकडून सांगण्यात आले.

विधानसभा निवडणुकीसाठी ४० लाख रुपयांच्या खर्चाची मर्यादा होती. अर्ज भरल्याच्या दिवसापासून निवडणुकीच्या दरम्यान सर्व उमेदवारांना टप्प्याटप्प्यांनी खर्चाचे हिशोब द्यावे लागत होते. उमेदवारांनी दिलेल्या खर्चाचे हिशोब निवडणूक » पान ७ वर

#रा

### दादांचा पक्ष दिल्ली विधानसभा लढवणार!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली:** महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीमध्ये भरभरुन यश मिळवल्यानंतर अजित पवारांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष दिल्ली विधानसभेच्या निवडणुका लढवणार आहे. अजित पवार हे गुरुवारी दिल्लीतल्या पक्ष कार्यालयामध्ये होते. यावेळी त्यांनी कार्यकर्त्यांशी संवाद साधला. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला आधी राष्ट्रीय पक्षाचा दर्जा होता. मात्र निवडणूक आयोगांच्या निकषांमुळे हा दर्जा निघून गेला. आता पुन्हा तो दर्जा प्राप्त करण्यासाठी पक्षाकडून धडपड सुरु आहे.

## कोयता गँगची दहशत सुरूच; एकाचा खून

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुण्यात कोयता गँगची दहशत सुरूच आहे. काही दिवसांपूर्वी सिंहगड किल्ल्या जवळील डोणजे येथे एका माजी उपसरपंच असलेले विठ्ठल पोळेकर याचे अपहरण करून हत्या करण्यात आली होती. ही घटना ताजी असतांना आता कोल्हेवाडी, खडकवासला जवळ भरदिवसा कोयत्याने वार करून तरुणाची हत्या करण्यात आली आहे.

आर्थिक वादातून ही हत्या करण्यात आल्याचे प्राथमिक तपासात पुढे आले आहे. सतीश थोपटे (रा. कोल्हेवाडी, खडकवासला) असे खून झालेल्या




तरुणाचे नाव आहे. तर घटनेनंतर हल्लेखोर फरार झाले आहे. या प्रकरणी सिंहगड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस आरोपींचा शोध घेत आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार ही घटना सिंहगड रस्त्यावरील कोल्हेवाडी येथे घडली. » पान ७ वर

## ट्रॅक पडले ओस; कोट्यावधींचा खर्च 'पाण्यात'

# शहरातून चक्क एक लाख सायकली गायब!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** एकेकाळी सायकलींचे शहर म्हणून केवळ देशातच नव्हे तर जगभरात ओळख निर्माण केलेल्या पुण्यातून चक्क एक लाख सायकली गायब झाल्या आहेत, या सायकलीच गायब झाल्याने त्यासाठी तयार करण्यात आलेले शेकडो किलोमीटर लांबीचे 'सायकल ट्रॅक' ओस पडले आहे. त्यामुळे प्रशासनाचा कोट्यावधी रुपयांचा खर्च अक्षरश: 'पाण्यात' गेला आहे.

**» धक्कादायक**

पर्यावरण संवर्धनाचे कारण देत महापालिकेकडून शहरात ही सायकल योजना प्रस्तावित केली होती. ती स्मार्ट सिटी चालविणार की महापालिका, यावरून प्रशासकीय वादही झाले. त्यानंतर शहरात एक लाख सायकल, ८ हजार सायकल स्थानके, ५३१ किलोमीटर लांबीचे सायकल मार्ग, ३१ किलोमीटरचा हरित मार्ग असे नियोजन करण्यात आले होते. त्यामध्ये एका ठिकाणावरून सायकल घेतल्यानंतर ती दुसऱ्या स्थानकावर सोडता येत होती, तसेच त्यासाठी शुल्क आकारले जात होते.

महापालिका आणि स्मार्ट सिटी मिशनअंतर्गत शहरातील नागरिकांनी खासगी वाहनांचा वापर कमी करून जवळच्या अंतरासाठी सायकल वापरावी, या उद्देशाने सायकल योजना राबविण्यात आली. त्यासाठी चार खासगी कंपन्यांनी शहरभर जवळपास १० हजार सायकली उपलब्ध करूनही दिल्या होत्या. त्यानंतर २०१७ मध्ये सुरू झालेली ही योजना २०२० मध्येच दोन्ही यंत्रणांनी गुंडाळली आहे.

सध्या शहरात एकही सायकल अस्तित्वात नाही. असे असतानाही प्रशासनाकडून ही योजना सुरू असून, त्याची माहिती ऑनलाइन मिळेल, असे आश्चर्यकारक उत्तर देण्यात आले आहे. या योजनेबाबत माहिती मागवली असता, मला ती ऑनलाइन बघा, असे उत्तर देण्यात आले; पण ही योजना बंद पडूनही स्मार्ट सिटीकडून अशा पद्धतीने देऊन ही योजना ऑनलाइन जिवंत ठेवली असल्याची टीका खांडके यांनी केली आहे.

पहिल्या टप्प्यात पुण्यात सुमारे तीन हजार सायकल दाखल झाल्या होत्या. या योजनेला पुणेकरांचा चांगला प्रतिसाद मिळाला; पण काही काळानंतर सायकल खराब होणे, त्यांची मोडतोड होणे, चोरीला जाणे असे अनेक प्रकार घडू लागले. त्यामुळे ही योजना २०१९ च्या सुमारास बंद पडली.

### स्मार्ट सिटी म्हणतेय ऑनलाईन सायकल शोधा

- शहरात एकही सायकल उपलब्ध नाही.त्यानंतरही ही योजना सुरू असून, सायकल हवी असल्यास त्याची माहिती ऑनलाइन शोधा, असे अजब उत्तर पुणे स्मार्ट सिटीकडून माहितीच्या अधिकाराअंतर्गत देण्यात येत आहे. ही योजना कुठे सुरू आहे?, किती सायकल उपलब्ध आहेत, याची माहिती सामाजिक कार्यकर्ते परेश खांडके यांनी विचारली होती. त्यावर स्मार्ट सिटीकडून हे उत्तर देण्यात आले आहेत.

## पुण्यात काय घडतंय...

### » तैलचित्रांचे प्रदर्शन

- हौशी चित्रकार असलेल्या अनंत भिडे यांच्या 'अनंत आकृती' या तैलचित्रांचे प्रदर्शन
- 'अनंत आकृती' या प्रदर्शनामध्ये प्रदर्शनामध्ये भिडे यांनी विविध चेहेरे, बौद्ध साधू, निसर्गचित्रे आणि आपल्या प्रवासातील आठवणी रेखाटल्या आहेत. त्यांच्या या प्रदर्शनामध्ये मुख्यत: तैलचित्रांचा समावेश आहे.



- **कुठे :** अरेना स्पोर्ट्स हॉल, भूगाव
- **कधी :** ७ डिसेंबर, २०२४
- **शुल्क :** विनामूल्य ( सर्वांसाठी खुले)

### शास्त्रीय नृत्य महोत्सव



**आत्मबोधी "एकल शास्त्रीय नृत्य महोत्सव**
**कलाकार :** आभा औटी,वैभव आरेकर, धीरेंद्र तिवारी.
**उपस्थिती :** किरण ठाकूर, श्रीमती शुभा धनंजय.
**संस्था :** लहेजा इव्हेंट्स व लोकमान्य कल्चरल फौंडेशन.

- **कुठे :** शकुंतला रेड्डी ऑडीटोरीयम,कलमाडी हायस्कूल,एरंडवणे पुणे.
- **कधी :** २९ नोव्हेंबर २०२३ (शुक्रवार)
- **शुल्क :** प्रवेश सर्वांसाठी मोफत.

राष्ट्रसंचार शासकीय योजना रा

## कोणाला लागणार म्हाडाची 'लॉटरी'?

### घरे सव्वासहा हजार; अर्ज ३८ हजार

**पुणे :** म्हाडाच्या घरांसाठी अर्ज करण्यास दि. १० ऑक्टोबर २०२४ पासून सुरुवात झाली. दिवाळी आणि विधानसभा निवडणुकीमुळे अर्ज करण्यास मुदतवाढ देण्याची मागणी नागरिकांकडून करण्यात आली होती. ती मान्य करून म्हाडाने या सोडतीस दि. १० डिसेंबर २०२४ पर्यंत मुदतवाढ दिली आहे.म्हाडा पुणे विभागाकडील ६ हजार २९४ घरांसाठी मागील दीड महिन्यात सुमारे ३८ हजारांपेक्षा अधिक अर्ज आले आहेत, अशी माहिती म्हाडा पुणे विभागाचे मुख्य अधिकारी राहुल साकोरे यांनी दिली.

म्हाडाने काढलेल्या सोडतीमध्ये प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य मधील २ हजार ३४० घरे आहेत, तर म्हाडाच्या विविध योजनेतील घरांची संख्या ९३ आहे, प्रधानमंत्री आवास योजनेतील घरांची संख्या ४१८, २० टक्के सर्वसमावेशक योजनेतील सदनिकांची संख्या ही ३हजार ३१२ आहे. १५ टक्के सामाजिक गृहनिर्माण योजनेतील घरांची संख्या १३१ आहे.

या घरांसाठीऑनलाइन अर्जासाठी नोंदणीची मुदत दि. १० डिसेंबर पर्यंत आहे, तर ऑनलाइन पेमेंट,अनामत रक्कम स्वीकृती अंतिम मुदत दि. १२ डिसेंबरपर्यंत आहे. सोडत दि. ७ जानेवारी २०२५ रोजी काढण्यात येणार आहे.

म्हाडाच्या घरांसाठीची सोडतीपूर्वीची अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया, सोडत, तसेच सोडतीनंतरची ताबा प्रक्रिया संपुर्णपणे संगणकीकरणाद्वारे ऑनलाइन पार पाडण्यात येणार असल्याने सोडतीच्या संपूर्ण प्रक्रियेमध्ये पारदर्शकता आहे, अशी माहिती साकोरे यांनी दिली.

### येथे भरा ऑनलाईन अर्ज...

- म्हाडाच्या घरांच्या सोडतीसाठी ऑनलाइन अर्ज भरण्यासाठी अर्जदारांनी प्रथम www.mhada.gov.in अथवा https://mhada.gov.in या संकेतस्थळास भेट द्यावी.
- प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य तत्त्वावरील योजनांच्या सदनिकांसाठी lottery.mhada.gov.in या संकतेस्थळावर नोंदणी करावी लागणार आहे, अशी माहिती साकोरे यांनी दिली.



## 'भारतीय संविधान विचार संमेलन'

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**पुणे :** विश्वभुषण. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक महोत्सव समिती, पुणेच्या वतीने संविधान दिना निमित्तआयोजित 'भारतीय संविधान विचार संमेलन' च्या उद्घाटन प्रसंगी न्या. ठिपसे, निवृत्त पोलिस महासंचालक सुधाकर सुराडकर, संमेलनाचे मुख्य आयोजक परशुराम वाडेकर व इतर मान्यवर.

### निवृत्त न्यायमूर्ती अभय ठिपसे यांचा आरोप

## हिंदूराष्ट्र ही संकल्पना संविधान विरोधी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महाराष्ट्रात नुकत्याच विधानसभा निवडणुका पार पडल्या, यामध्ये संविधान हा शब्द सत्ताधारी आणि विरोधक या दोघांच्याही प्रचाराचा प्रमुख भाग होता. मात्र संविधान - संविधान करणाऱ्या या दोन्ही बाजूच्या लोकांनी खरेच संविधान जाणून घेण्याचा कधी प्रयत्न केला आहे का? पूर्वीच्या काळी भेदाभेद करणारी संस्कृती चांगली कशी असेल ? असे सवाल उपस्थित करत हिंदुराष्ट्र ही संकल्पना भारतीय संविधान विरोधी आहे असा आरोप निवृत्त न्यायमूर्ती अभय ठिपसे यांनी केला. विश्वभुषण. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक महोत्सव समिती, पुणेच्या वतीने संविधान दिना निमित्तआयोजित 'भारतीय संविधान विचार संमेलन' च्या उद्घाटन प्रसंगी न्या. ठिपसे बोलत होते. याप्रसंगी निवृत्त पोलिस महासंचालक सुधाकर सुराडकर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते, डॉ. सुरेंद्र जोंधळे, इरफान इंजिनिअर समाजवादी जन परिषदेच्या अखिल भारतीय अध्यक्षा ॲड. निशा शिवूरकर, ह.भ.प . श्यामसुंदर महाराज सोनार, ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज वाबळे, संमेलनाचे मुख्य आयोजक परशुराम वाडेकर, संमेलनाच्या निमंत्रक, पुण्याच्या माजी उपमहापौर सुनीता वाडेकर, दीपक म्हस्के आदि उपस्थित होते. 'भारतीय संविधानाचे ७५ वर्षे .. विकास व वाटचाल' हा या संमेलनाचा विषय आहे.

न्या. ठिपसे म्हणाले, भारतीय संविधान आपला देश धर्मनिरपेक्ष राष्ट्र असल्याचे म्हणते याचा अर्थ कोणत्याही धर्माला इथे संविधाना पेक्षा जास्त महत्व नाही. आज हिंदुराष्ट्र ही संकल्पना मांडणारे जुनी संस्कृती चांगली असल्याचे सांगत आहेत परंतु त्याकाळी असलेली विषमता, भेदाभेद याचे समर्थन होऊ शकत नाही हे वास्तव आहे. आज हिदूराष्ट्र चा नारा देणारे सुद्धा संविधान - संविधान चा उदो उदो करताना दिसत आहेत याचाच अर्थ ज्यांना ते नकोय किंवा बदलायचे आहे ते संविधान प्रेम असल्याचा आव आणत आहेत अशी टीका त्यांनी केली.

## » Selected

## कात्रज-कोंढवा रस्त्याचे आता होणार रुंदीकरण

### ५० मी. रुंद रस्त्याचा कामास प्राधान्य



**पुणे :** कात्रज- कोंढवा रस्त्यावरील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी महापालिका प्रशासनाने प्रयत्न सुरू केले आहेत, त्यासाठी या रस्त्याच्या रुंदीकरणाला प्राधान्य देण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. त्यानुसारहा रस्ता पुन्हा ८४ मीटर रुंदीचा करण्याच्या दृष्टीने महापालिका प्रशासनाने कार्यवाही सुरु केली आहे. सध्या ५० मीटर रुंदीचा रस्ता तयार करण्याच्या कामास प्राधान्य दिले आहे, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

शहराच्या दक्षिण भागातील वाहतुक सुधारण्यासाठी कात्रज - कोंढवा रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम हाती घेण्यात आले. कात्रज येथील राजस सोसायटी ते कोंढवा येथील खडी मशिन चौक या दरम्यानच्या रस्त्याचे रुंदीकरण करण्यात येणार आहे. या कामाला 31 ऑक्टोबर 2018 रोजी मान्यता मिळाली असून या भूसंपादन न झाल्याने रस्त्याचे काम रखडले आहे.

या रस्त्यांच्या भूसंपादनासाठी 710 कोटी हवे आहेत. भूसंपादनामुळे दीर्घकाळ रेंगाळलेल्या या रस्त्याची रुंदी 84 ऐवजी 50 मीटर करण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. रस्त्याची रुंदी कमी केल्याने भूसंपादनाचा खर्च 280 कोटी रुपये इतका येणार होता. यापैकी राज्य सरकारकडून १४० कोटी रुपयांचा निधी महापालिकेच्या तिजोरीत जमा झाला आहे. या निधीचे जागा मालकांना वाटप केले जाणार आहे. काही भागात काम झाले असून, ग्रेड सेपरेटरचे काम सुरू आहे. जेथे जागा ताब्यात आल्या तेथे रस्ता बांधला जात आहे. रस्ता तुकड्या तुकड्यात कात्रज-कोंढवा रस्ताचे काही प्रमाणात टीडीआर देऊन भूसंपादन झाले आहे. त्यामुळे हा रस्ता तुकड्या तुकड्यामध्ये तयार आहे. रस्त्यासाठी आवश्यक असलेल्या जागेच्या भूसंपादनाअभावी रस्त्याचे काम रखडले आहे.

दरम्यान, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी सदर रस्त्याची रुंदी ८४ मीटर करावी अशी सुचना केली होती. त्या सुचनेनुसार महापालिकेने आता सदर रस्त्याचे ८४ मीटर पर्यंत रुंदीकरण करण्यासाठी कार्यवाही सुरु केली आहे.अशी माहीती आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी दिली.



> भुसंपादन करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत आवश्यक ती प्रक्रीया केली जाणार आहे. ८४ मीटर रुंदीकरणासाठी सुमारे १७ हजार २०० चौरसमीटर जागा आवश्यक आहे. त्या जागेच्या नुकसान भरपाईच्या मोबदल्यात सुमारे साडे तीनशे कोटी रुपयांची आवश्यकता आहे. यातील तीस टक्के रक्कम महापालिका देणार आहे."
>
> — **डॉ. राजेंद्र भोसले,** महापालिका आयुक्त, पुणे

### बसेसची संख्या तोकडी; पीएमपीच्या प्रवाशांची कसरत

## महायुती सरकारपुढे आव्हान 'लाईफलाईन' टिकविण्याचे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शहराला 'महामेट्रो'चा दर्जा मिळाला असला तरीही ' पीएमपीएमएल'च्या प्रवासी संख्येत फारशी घट झाली नाही, हे वास्तव असतानाही बसेसची संख्या अतिशय तोकडी असून प्रवास करताना प्रवाशांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. त्यामुळे राज्यातील नव्या महायुतीच्या समोर या बसेसची संख्या वाढविण्याचे आणि पुणेकरांची 'लाईफलाईन' तंदुरुस्त ठेवण्याचे मोठे आव्हान असणार आहे.

पीएमपीच्या ताफ्यातील बस संख्या पुणेकरांच्या लोकसंख्ये नुसार असणे आवश्यक आहे. याकरिता महापालिकेच्या सर्वंकश आराखड्यात त्याची माहिती देण्यात आली आहे. त्या आराखड्यानुसार 1 लाख लोकसंख्येसाठी 55 बस आवश्यक असतात. मात्र, पुण्याच्या लोकसंख्येसाठी आवश्यक तितकी बससंख्या पीएमपीकडे नाही. त्यामुळे पुणेकर प्रवाशांना प्रवास करताना मोठी कसरत करावी लागत आहे. या समस्या सोडवण्यासाठी नव्या सरकारने प्रयत्न करायला हवेत, अशी मागणी होत आहे. पुण्याच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा कणा असलेल्या पीएमपीच्या ताफ्यात पुणे, पिंपरी-चिंचवडसह पीएमआरडीए भागातील लोकसंख्येच्या तुलनेत खूपच कमी बस गाड्या आहे. या लोकसंख्येला अपुऱ्या बसगाड्यांमुळे पुणेकरांचे प्रचंड हाल होत असून, त्यांना बससाठी स्थानकावर तासनतास थांबावे लागत आहे.यासोबतच गर्दीने भरलेल्या बसगाड्यांमधून प्रवास करावा लागत आहे.



> " प्रवासी मंच सर्व प्रथम नव्या सरकारने 2017 पासून प्रलंबित असलेला वाहतूक धोरण आराखडा मान्य करावा. पीएमपी सक्षम करण्यासाठी महापालिकेच्या सर्वंकश वाहतूक आराखड्याची अंमलबजावणी करावी. तसेच, राज्यशासनाने पीएमपीला नव्या बस खरेदीसाठी निधीची मोठी भरीव तरतुद करावी. प्रवाशांसाठी बस गाड्या अपुऱ्या पडत आहेत. त्या वाढवण्यासाठी प्रयत्न करायला हवेत."
>
> — **संजय शितोळे,** मानद सचिव, पीएमपी

### महापालिकेच्या समितीची आयुक्तांकडे शिफारस

## मुठा नदी अतिक्रमण मुक्त करा अन पूर टाळा



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महापालिकेने, पाटबंधारे विभागाने गेल्या अनेक वर्षापासून मुळा-मुठा नदी आणि नाल्यांमध्ये होणारे अतिक्रमण, अरुंद होणाारे पात्र याकडे लक्ष दिले नसल्याने मुठा नदीला जुलै महिन्यात नदीला पूर आलेला होता. हाच ठपका महापालिका आयुक्तांनी नियुक्त केलेल्या समितीने ठेवला आहे. नदीपात्रातील अतिक्रमणे काढून टाकावीत, राडारोडा टाकण्यांवर कडक कारवाई करावी, नाल्यांच्या स्वच्छतेकडे लक्ष द्यावे अशा, पूर रेषेच्या आतील अवैध बांधकामे पाडून टाकावीत अशी शिफारस समितीने केली आहे. दरम्यान हा अहवाल आयुक्तांना सादर होऊन दोन महिने झाले, त्यावर अद्याप बैठक घेतली नाही. आता आयुक्तांकडून बैठक घेऊन कारवाईचे आदेश दिले जाणार आहेत.

### भिडे पूल येथे जुजबी कारवाई

- भिडे पुलालगत मोठ्या प्रमाणात अवैध बांधकाम, अतिक्रमण झाले आहे. बांधकाम विभागाने तेथील अवैध बांधकामास २४ तासाची नोटीस दिलेली असली तरी अद्याप पूर्ण बांधकाम पाडलेले नाही. हे आयुक्तांच्या निदर्शनास आणून दिले आहे. त्यावर त्यांनी तेथील अतिक्रमण काढून घेण्याची जबाबादारी अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांना दिली आहे.



### पूराची ही आहेत कारणे

- मुठा नदीत झालेली अवैध बांधकामे, टाकला जाणारा राडारोडा यामुळे खडकवासला धरणातून ४० हजार क्यूसेस पाणी सोडल्यानंतर पूर येत आहे.
- नदीपात्रात व नदी तीरावर कचरा टाकला जात आहे
- विविध अडथळ्यांमुळे नदीच्या वहन क्षमतेत घट झाली आहे
- अनेक वर्षापासून हा प्रकार सुरु असल्याने पुराचा धोका वाढलेला आहे.

### या आहेत उपाययोजना

- निळ्या पूररेषेच्या आत बांधकामे आहेत, त्या बांधकामावर निळी पूर रेषा, लाल पूर रेषा दर्शवावी.
- प्रवाहाला अडथळे ठरणारे बंधारे, पूल काढून टाकावेत
- अतिक्रमण, अवैध बांधकाम करणारे, राडारोडा, कचरा टाकणाऱ्यांवर गुन्हे दाखल करावेत
- ज्या ठिकाणी नदीचे अस्तित्व राहिले नाही, तेथे बांधकामे पाडून नदी अस्तित्वात आणावी
- नाल्यांची रुंदी कमी होणे, कचरा अडकणे, बांधकामे होणे यामुळे नाल्यांमध्ये पाणी तुंबून परिसरातील वस्तीत पाणी साठते. नाल्यातील हे अडथळे काढून टाकावेत.
- पुर रेषेसोबतच २० हजार क्यूसेस, ३०, ४० क्यूसेस पाणी कुठल्या भागात येते हे चिन्हांकित करावे, त्याचे नकाश तयार करावेत.

शहरात जुलै महिन्यात झालेल्या मुसळधार पावसानंतर सिंहगड रोड परिसरातील काही सोसायट्यांमध्ये पावसाचे पाणी घुसले होते. शहरातील इतर भागांमध्ये देखील पावसाचे पाणी शिरले होते. सिंहगड रस्त्यांवरील सोसायट्यांमध्ये मध्यरात्री अचानकपणे पाणी शिरल्याने एकतानगरी आणि आजूबाजूच्या सोसायट्यांमधील रहिवाशांचे मोठे नुकसान झाले होते. हा पूर कशामुळे आला याचा अभ्यास करण्यासाठी आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी चार सदस्यांची समिती नेमली होती. त्याचा अहवाल सप्टेंबर महिन्यात सादर करण्यात आला. पण आयुक्तांनी हा अहवाल सार्वजनिक न केल्याने सजग नागरिक मंचाचे अध्यक्ष विवेक वेलणकर यांनी आक्षेप घेतला होता. आचारसंहिता संपल्यानंतर हा अहवाल आज जाहीर केला आहे. #रा

# धर्मादाय संस्थांचे ऑडिट दाखल करण्यास मुदतवाढ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सनदी लेखापालांकडून लेखापरीक्षण झालेले वार्षिक हिशोबपत्रके (ऑडिट रिपोर्ट) मुंबई येथील मुख्य धर्मादाय कार्यालयाच्या संकेतस्थळावर ऑनलाइन पद्धतीने अपलोड करण्यास प्रचंड तांत्रिक अडचणी येत आहेत. त्यामुळे वार्षिक हिशोबपत्रके दाखल करण्याची मुदत ३१ डिसेंबरपर्यंत वाढविण्यात आली आहे. यासंदर्भात राज्याचे धर्मदाय आयुक्त अमोघ श्यामकांत कलोती यांनी परिपत्रक काढले आहे. ट्रस्ट कायद्या नुसार आर्थिक वर्ष संपल्यावर सहा महिन्यात म्हणजेच तीस सप्टेंबर पर्यंत वार्षिक हिशोबपत्रके सादर करायची असतात. त्यावेळी आयकर कायद्या प्रमाणे रिटर्न भरण्याची अनिवार्य मुदत असल्याने धर्मादाय कार्यालयात दाखल करायच्या वार्षिक हिशोबपत्रकांची मुदत यापूर्वी नोव्हेंबर अखेर वाढवली होती.

पब्लिक ट्रस्ट प्रॅक्टीशनर्स असोसिएशनचे माजी अध्यक्ष ॲड. शिवराज कदम - जहागिरदार म्हणाले, "मुंबईतील मुख्य सर्वरवर पूर्ण राज्यातील ट्रस्ट व संस्था नोंदणी तसेच वार्षिक हिशोबपत्रके अपलोड करण्यास नेहमीच तांत्रिक अडचणी येतात. त्यामुळे वकील व संस्थाचालकांना प्रचंड मनस्ताप होतो. तो दूर करण्यास विभागीय स्तरावर सर्वरचे विकेंद्रीकरण तातडीने करून त्याची क्षमता वाढविणे अत्यंत गरजेचे आहे.



## महापालिका प्रशासनाचा इशारा; थकबाकी वसूलीसाठी निर्णय

# मिळकतकर थकबाकीदारांचा वाजणार 'बॅन्डबाजा'...!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महापालिकेच्या २०२४-२५ च्या अंदाजपत्रकात मिळकतकर विभागास २७२८ कोटींचे उद्दिष्ट असून, नोव्हेंबर अखेरपर्यंत १७७५ कोटींचाच कर जमा झाला आहे. त्यामुळे ३१ मार्च अखेरपर्यंत महापालिकेस जवळपास साडेनऊशें कोटींची

» प्रशासकीय




वसुली करने अपेक्षित असल्याने महापालिकेच्या मिळकतकर विभागाकडून मिळकतींच्या जप्तीसह, थकबाकीदारांच्या दारत बँड वाजविण्यास पुन्हा एकदा सुरुवात केली जाणार आहे.

आधी लोकसभा निवडणूक आणि नंतर विधानसभा निवडणुकीमुळे महापालिकेच्या मिळकतकर वसुलीवर मोठा परिणाम झाला आहे. त्यामुळे विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता संपताच महापालिका प्रशासन थकबाकी वसुलीसाठी सरसावले असून, १ डिसेंबरपासून पुन्हा थकबाकीदारांच्या दारात महापालिकेचा बँड वाजणार आहे.

महापालिकेच्या कर संकलन विभागाकडून थकबाकीदारांच्या मिळकती सील करण्यास सुरुवात करण्यात आली आहे. गेल्या दोन दिवसांत महापालिकेने १० मिळकती सील केल्या आहेत. महापालिकेची मिळकतकराची थकबाकी १० हजार कोटींच्यावर गेली आहे. त्यामुळे जी थकबाकी न्यायालयीन वादात नाही, ती वसूल करण्यासाठी पाच पथके नेमण्यात आली आहेत.याशिवाय पुढील आठवड्यापासून पाच बँड पथकेही तैनात करण्यात येणार आहेत. महापालिकेकडून गेल्या काही वर्षांपासून शहरात बँड पथकांचा वापर केला जात असून, त्यामुळे मोठ्या प्रमाणात थकबाकी वसूल होत असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे प्रशासनाकडून हा निर्णय घेण्यात आला आहे.

**मिळकतकर विभागास २७२८ कोटींचे उद्दिष्ट**



### मनुष्यबळ कमी असल्याचा परिणाम

● महापालिकेचे आर्थिक वर्ष एप्रिल महिन्यात सुरू होते. मात्र, या वर्षी मार्च ते जूनपर्यंत शहरात लोकसभा निवडणुका असल्याने महापालिकेचे अनेक कर्मचारी निवडणुकीच्या कामात होते. त्यानंतर या विभागातील कर्मचाऱ्यांची नियमित बदली झाली. बदली झालेले कर्मचारी रुजू झाल्यानंतर लगेचच त्यांना विधानसभा निवडणुकीचे काम देण्यात आले. परिणामी या विभागासाठी आवश्यक असलेले मनुष्यबळ उपलब्ध नसल्याने करवसुलीवर त्याचा परिणाम होत असल्याचे चित्र आहे.

## अवतीभवती
CITY UPDATE




### वन नेशन वन सबस्क्रिप्शन योजना ठरणार ' गेमचेंजर'

**पुणे :** येत्या १ जानेवारी २०२५ पासून वन नेशन वन सबस्क्रिप्शन योजनेचा लाभ घेता येणार आहे.या योजनेसाठी सुमारे सहा हजार कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. या योजनेच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय स्तरावर कोणते संशोधन सुरू आहे, याची माहिती एका क्लिकवर उपलब्ध होणार आहे. ही योजना देशातील ६ हजार ३०० सरकारी उच्च शिक्षण संस्थांमधील १ कोटी ८० लाख विद्यार्थी, प्राध्यापक आणि संशोधकांसाठी "गेमचेंजर' ठरणार आहे.

केंद्र सरकारने या नवीन योजनेत सध्या ३० मोठ्या आंतरराष्ट्रीय जर्नल प्रकाशकांचा समावेश केला आहे. केंद्र सरकार या प्रकाशकांना थेट पैसे देणार आहे. या योजनेचा लाभ केंद्र किंवा राज्य सरकार, केंद्र सरकारच्या संशोधन आणि विकास संस्थांच्या व्यवस्थापनाखालील सर्व उच्च शैक्षणिक संस्थांमधील विद्यार्थी, शिक्षक आणि संशोधकांना घेता येईल.

केंद्र सरकारने 'वन नेशन वन सबस्क्रिप्शन' योजनेला मंजुरी दिली आहे. या योजनेच्या अंमलबजावणीमुळे विद्यार्थी, प्राध्यापक आणि संशोधकांना मोठी मदत होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.या योजनेत केंद्रीय एजन्सी, माहिती आणि ग्रंथालय नेटवर्क, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या आंतर विद्यापीठ केंद्राद्वारे सदस्यत्व दिले जाणार आहे.

### २०० कोटी रुपयांच्या ठेवी बँकेत ठेवण्याचा प्रस्ताव

**पुणे :** विधानसभा निवडणुकीनंतर आणखी २०० कोटी रुपयांच्या ठेवी बँकेत ठेवण्याचा प्रस्ताव स्थायी समितीत ठेवण्यात आला आहे. याआधी लोकसभा निवडणुकीनंतर महापालिका प्रशासनाने सुमारे ५०० कोटी रुपयांच्या ठेवी बँकेत ठेवल्या होत्या.



निवडणूकांची आचारसंहिता तसेच निविदा प्रक्रिया वेळेत राबविण्यात आल्या नाहीत. तसेच महापालिकेच्या खर्चापेक्षा उत्पन्न अधिक ठरले. त्यामुळे प्रशासनाकडून या ठेवी बँकेत ठेवण्यात येत आहेत. अंदाजपत्रकात दरवर्षी जमा आणि खर्चाचे आकडे निश्चित असतात. वर्षभर मिळणाऱ्या उत्पन्नातून हा खर्च भागवला जातो.

मात्र, या वर्षी सलग दोन निवडणुकांमुळे महापालिकेस विशेष भांडवली कामे करता आलेली नाहीत. परिणामी, महापालिकेस नोव्हेंबर अखेरपर्यंत खर्चापेक्षा उत्पन्न जास्त मिळाल्याने प्रशासनाकडून हे पैसे बँकेत ठेवण्यात येणार आहेत. तसेच निवडणुकांच्या तोंडावरही शासनाकडून महापालिकेस विविध अनुदाने प्राप्त झाली आहेत.

### विद्यापीठात महात्मा फुले आणि संत ज्ञानेश्वर महाराज यांना अभिवादन



**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात भारतातील स्त्री शिक्षणाचे प्रणेते, थोर विचारवंत, समाजसुधारक महात्मा ज्योतिबा फुले आणि महाराष्ट्रातील थोर संत ज्ञानेश्वर महाराज यांना पुण्यतिथीनिमित्त अभिवादन करण्यात आले. कुलगुरू प्रा. (डॉ.) सुरेश गोसावी यांनी महात्मा फुले यांच्या प्रशासकीय इमारतीजवळील पुतळ्यास पुष्पहार अर्पण केले आणि विद्यापीठाच्या सरस्वती सभागृहात संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहीली.

यावेळी प्र - कुलगुरू प्रा. (डॉ.) पराग काळकर, प्रभारी कुलसचिव प्रा. (डॉ.) ज्योती भाकरे, वित्त व लेखाधिकारी चारुशीला गायके, अधिसभा सदस्य प्रा. (डॉ.) राजेंद्र घोडे, मुकुंद पांडे, संचालक व विभागप्रमुख प्रा. (डॉ.) विलास आढाव, विविध शैक्षणिक व प्रशासकीय विभागांचे विभागप्रमुख आदी मान्यवरांनीही यानिमित्त अभिवादन करून आदरांजली वाहिली. यावेळी विविध कर्मचारी आणि विद्यार्थी संघटनांचे प्रतिनिधी, शिक्षक, शिक्षकेतर सेवक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अद्याप जलसंपदा विभागाकडून निर्णय नाही

# शहरासाठी किती पाणी राखीव ठेवले जाईल ?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शहरासाठी पाणी सोडताना खडकवासला प्रकल्पातील खडकवासला, टेमघर, वरसगाव आणि पानशेत या चार धरणांमधून तसेच काही प्रमाणात भामा आसखेड धरणातूनही पुण्यासाठी पाणी उचलण्यात येते. महापालिकेच्या नियोजनानुसार शहराला २१ टीएमसी इतक्या पाण्याची गरज असते.

यंदा खडकवासला प्रकल्पातील धरणामध्ये सप्टेंबरमध्ये १०० टक्के पाणीसाठा उपलब्ध होता. तसेच जिल्ह्यातील अन्य धरणेही फुल्ल झाली होती. खडकवासला प्रकल्पात सध्या २७.२७ टीएमसी (९३.५५ टक्के) इतका पाणीसाठा उपलब्ध आहे. त्यामुळे यंदाच्या वर्षी पाण्याच्या टंचाईची स्थिती नाही. शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या खडकवासला प्रकल्पातील धरणांमध्ये सध्या समाधानकारक पाणीसाठा असला तरी शहरासाठी किती पाणी राखीव ठेवले जाईल, याबाबत अद्याप जलसंपदा विभागाकडून निर्णय झालेला नाही. विधानसभा निवडणुकीचा निकाल जाहीर झाला असून मंत्रिमंडळाच्या स्थापनेनंतर पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली तयार होणाऱ्या कालवा समितीच्या बैठकीत याबाबत निर्णय होण्याची शक्यता असल्याचे अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.

खडकवासला प्रकल्पातील पाण्याचे दरवर्षी १५ ऑक्टोबरला नियोजन करण्यात येते. त्यात शहरासह जिल्ह्यातील शेती आणि पिण्याच्या पाण्याच्या निर्णयासाठी कालवा सल्लागार समितीची बैठक घेण्यात येते. मात्र, निवडणुकीमुळे ही बैठक होऊ शकली नाही. ही बैठक घेण्यासाठी जलसंपदा विभागाने राज्य सरकारच्या मुख्य सचिवांशी पत्र व्यवहार केला आहे. मात्र, त्याबाबत सरकारकडून कोणतीही भूमिका अद्याप घेण्यात आली नसल्याचे समजते. पाण्याच्या नियोजनासाठी कालवा सल्लागार समितीची बैठक होणे आवश्यक असते. या बैठकीचे अध्यक्ष हे जिल्ह्याचे पालकमंत्री असतात. त्या बैठकीत पुण्यासह पश्चिम महाराष्ट्राच्या पाण्याचा फैसला करण्यात येतो. आता राज्यात महायुती की महाविकास आघाडी यापैकी कोणाचे सरकार स्थापन होणार याची उत्सुकता राजकीय वर्तुळाप्रमाणे जलसंपदा विभागाला आहे. त्यामुळे जोपर्यंत ही बैठक होणार नाही तोपर्यंत पाणीवाटपाबाबतचे निर्णय होण्याची शक्यता धूसर आहे.

## साकडे लाडक्या बहिणींचे...!

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



**पुणे :** एकनाथ शिंदे हेच पुन्हा मुख्यमंत्री व्हावेत, यासाठी लाडक्या बहिणी आणि ज्येष्ठ नागरिकांनी तळयातील गणपतीला साकडे घातले.

# वसतीगृह देण्यासाठी चक्क विद्यार्थ्यांकडून घेतली जातेय लाच!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

> "समाजकल्याण विभाग हा गोर गरीब विद्यार्थ्यांसाठी आहे. पण त्यांची जर आर्थिक पिळवणूक या भ्रष्टाचारी लोकांकडून होणार असेल तर समाज कल्याण विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी विद्यार्थी परिषद अजून मोठे आंदोलन करेल."
> — **हर्षवर्धन हरपुडे,** पुणे महानगर मंत्री

**पुणे :** अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने समाज कल्याण विभागाकडून झालेल्या वसतिगृह संदर्भातील भ्रष्टाचाराविरोधात तीव्र स्वरूपाचे आंदोलन केले.समाज कल्याण विभाग हा विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी कार्यरत आहे. परंतु याच समाज कल्याण विभागातील एका कर्मचाऱ्याने वसतिगृह उपलब्ध करून देण्याच्या आमिषाच्या नावाखाली गरजू विद्यार्थ्यांकडून लाच घेतली व पैसे न दिल्यास वसतिगृह मिळणार नाही अशी वारंवार धमकी दिली. हा भ्रष्टाचाराचा प्रकार गेले अनेक महिने सुरू असून या विषयाची समाज कल्याण विभागाकडून कोणत्याही प्रकारची दखल घेण्यात आलेली नाही. या भ्रष्टाचाराविरोधात अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेकडून आज तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात आले.

या वेळी सहायुक्तांच्या केबिन बाहेर बराच वेळ आंदोलन करूनही समाज कल्याण प्रशासन आणि सहआयुक्तांकडून आंदोलनाची कुठलीही दखल घेण्यात आली नाही त्यामुळे लोंढे सरांच्या केबिन बाहेर निवेदन चिकटवण्यात आले. अभाविपने समाज कल्याणच्या प्रादेशिक आयुक्तांकडे निवेदन देऊन; अशा प्रकारचा कोणताही भ्रष्टाचार होणार नाही याची काळजी घ्यावी, गरजू विद्यार्थ्यांची वेळोवेळी सोय करून देण्यात यावी व भ्रष्ट कर्मचाऱ्यावर तात्काळ कारवाई करण्यात यावी, या प्रकारच्या मागण्या करण्यात आल्या.

## गणरायाला साकडे, ज्येष्ठ नागरिकही उतरले रस्त्यावर

# 'लाडक्या बहिणी' म्हणतात पुन्हा एकनाथ शिंदेंना मुख्यमंत्री करा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

> "अवघ्या अडीच वर्षांच्या कालावधीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अनेक लोकाभिमुख योजना राबविल्या आहेत, त्यांचे नेतृत्व हे जनतेतील नेतृत्व आहे. त्यांच्यामुळेच महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना दिलासा मिळाला आहे. ही बाब लक्षात घेऊन त्यांनाच पुन्हा राज्याच्या मुख्यमंत्रीपदाची संधी देण्याची आवश्यकता आहे."
> — **एक ज्येष्ठ नागरिक**

**पुणे :** विधानसभेच्या महायुतीला मिळालेल्या मोठ्या यशानंतर महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री पुनश्च एकनाथ शिंदेच व्हावे याकरिता पुण्यातील जेष्ठ नागरिक व महिलांनी सारसबाग येथील तळ्यातील गणपतीला साकडे घातले असून एकनाथ शिंदेच पुन्हा मुख्यमंत्री व्हावे या जोरकस मागणीसाठी मोठ्या संख्येने जेष्ठ नागरिकांनी गणरायाला साकडे घालत एकनाथ शिंदेच ज्येष्ठ नागरिकांचे श्रावण बाळ आहेत आणि त्यांच्या नेतृत्वातच राज्यात निवडणुका लढविल्या गेल्या होत्या पुन्हा तेच मुख्यमंत्रीपदी विराजमान व्हावे हीच सर्वसामान्यांची इच्छा आहे असे मत व्यक्त केले.

दरम्यान एकनाथ शिंदे यांनी माझी लाडक्या बहिणींचा लाडका भाऊ अशी ओळख तयार झाली असून ते पद सर्वश्रेष्ठ आहे, गेल्या अडीच वर्षात आपण मुख्यमंत्री म्हणून केलेली विकास कामे आणि कल्याणकारी योजनांबाबत समाधानी आहोत त्यामुळे महायुतीच्या मुख्यमंत्री पदाबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शहा निर्णय घेतील तो आमच्यासाठी अंतिम असेल असे पत्रकार परिषदेत स्पष्ट भूमिका मांडली असली तरी पुण्यातील ज्येष्ठ नागरिक व महिलांनी रस्त्यावर येवून सारसबागेत तळ्यातील गणरायाला प्रार्थना करीत लाडक्या बहिणींच्या माध्यमातून एकनाथ शिंदे साहेबच पुन्हा मुख्यमंत्री व्हावे अशी प्रार्थन उपस्थित महिलांनी केली.

पुणे शहरातील अनेक माता भगिनींनी यावेळी एकनाथ शिंदे यांनी राज्याच्या प्रगतीसाठी घेतलेल्या कल्याणकारी योजना तसेच अठरापगड जाती व समाजाचे नेतृत्व करणारे, सर्व धर्मियांचे लोकमान्य, एकनाथ शिंदे आहेत बहुमत कोणत्याही पक्षाचे असले तरीही मुख्यमंत्रीपद हे सर्वसामान्य जनतेच्या कामासाठी व सर्वसामान्य जनतेच्या हितासाठी असावे अशा भावना महिलांनी व्यक्त केल्या.

## जागतिक सहिष्णुता सप्ताहाचा समारोप सोहळा भावपूर्ण उत्साहात संपन्न

# भजन आणि नामस्मरणाच्या गजरात रंगला श्री ज्ञानेश्वर माऊलींचा समाधी सोहळा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क





**पुणे :** विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे, भारत व श्रीक्षेत्र आळंदी-देहू परिसर विकास समिती यांच्या संयुक्त विद्यमाने संत शिरोमणी तत्वज्ञ श्री ज्ञानेश्वर माऊली यांच्या ७२८ व्या संजीवन समाधी सोहळा व जागतिक सहिष्णुता सप्ताहाचा समारोप 'श्री संत ज्ञानेश्वर-तुकाराम ज्ञानतीर्थ', विश्वरूप दर्शन मंच, श्रीक्षेत्र आळंदी येथे दुपारी १२ वा. वारकऱ्यांच्या उपस्थितीत पार पडला. इद्रायणीत वारकऱ्यांच्या गुलाल, बुक्का व फुलांची ओंजळ वाहून ज्ञानेश्वर माऊलीचे भावपूर्ण स्मरण केले. भजन करून नामस्मरणाचा गरज केला. यावेळी विश्वरूप दर्शन मंचावर घंटानाद करण्यात आला. विश्वशांती केंद्राच्या वतीने वारकऱ्यांना महाप्रसाद देण्यात आला.

तत्पूर्वी हभप डॉ. सुदाम महाराज पानेगावकर यांनी काल्याचे कीर्तन केले. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते दहीहंडी फोडण्यात आली. याद्वारे शेकडो वर्षांची परंपरा जपण्यात आली. इंद्रायणीच्या घाटावर वरकऱ्यांनी या समाधी सोहळ्याच्या काल्याच्या महाप्रसादाचा लाभ घेतला. या समारंभासाठी विश्वशांती केंद्र आळंदी, माईर्स एमआयटी विश्वशांती विद्यापीठाचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड, हभप तुळशीराम दा. कराड, उषा विश्वनाथ कराड, माईर्स मायमर वैद्यकीय महाविद्यालयाच्या कार्यकारी संचालिका डॉ. सुचित्रा कराड नागरे, प्रा. स्वाती कराड चाटे, आचार्य श्री शिवम, प्रसाद रांगणेकर, नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. एस.एन. पठाण, डॉ. मिलिंद पांडे, योगगुरू पाडेकर गुरूजी उपस्थित होते.

या सप्ताहात सुफी सं व इस्लाम धर्माचे अभ्यासक लतिफ पटेल, भागवतार्चा स्वामी डॉ. तुळशीराम महाराज गुट्टे, संत साहित्याचे अभ्यासक हभप डॉ. रविदास महाराज शिरसाठ, हभप डॉ. तुकाराम महाराज गरुड ठाकुरबुवा दैठणकर व हभप बापूसाहेब मोरे देहूकर या सारख्या नामवंत कीर्तनकारांनी कीर्तनरुपी सेवा सादर केली. तसेच श्रुती पाटील, मानसी वझे, डॉ. आशिष रानडे व विश्वशांती संगीत कला अकादमीच्या शिक्षक व विद्यार्थ्यांनी अभंगवाणी व भक्तीसंगीताचे कार्यक्रम सादर केले. हभप बापूसाहेब मोरे देहूकर म्हणाले,"सृष्टीवर संताच्या वचनामुळे मानवाचे कल्याण होते. संत हे वात्सल्य मूर्ती असून त्यांची महिमा शब्दात सांगता येत नाही. संत दुसऱ्यांचे दुख सावरण्यास पुढे येऊन त्याना सुख व शांतीचा मार्ग दाखवतात.

"प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड म्हणाले,पवित्र तीर्थ क्षेत्रांचे खऱ्या अर्थाने ज्ञान तीर्थ क्षेत्रामध्ये परिवर्तन घडविण्याचा आमचा प्रयत्न आहे. ज्ञान, कर्म आणि भक्तीतून ईश्वर दर्शन होते. त्याग आणि समर्पणाचा संतानी दिलेला संदेश व त्यांची शिकवण आत्मसात करून या मार्गाने चालण्याचा प्रयत्न करावा."



> या सप्ताहात प्रवचन, कीर्तन, गायन व भजन या मार्गाने नामवंतांनी माऊलीचरीण सेवा रूजू केली. पुढील वर्षभर लोकशिक्षणाचे विविध कार्यक्रम व विश्वरूप दर्शन मंचावर होणार आहेत. यामध्ये सुसंस्कृत समाजनिर्मितीसाठी जनजागृतीद्वारे विज्ञान व अध्यात्म यांचा संगम होईल."
> — **प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड,** संस्थापक अध्यक्ष, माईर्स एमआयटी विश्वशांती विद्यापीठ

#रा

# आत्मपरीक्षण गरजेचे!

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत दारूण पराभव झाल्यानंतर महाविकास आघाडीला आत्मपरीक्षण, आत्मचिंतन करावेच लागणार आहे. धुळीस मिळाल्यानंतर फिनिक्स पक्षाप्रमाणे राखेतून पुन्हा भरारी मारायची असेल तर आत्मपरीक्षण आवश्यकच आहे. आघाडीच्या सर्वच नेत्यांना ते मान्य आहे. दारूण पराभवाचे अराम्ही आघाडीतील तिन्ही पक्ष संयुक्तरित्या आत्मपरीक्षण करू, असे काँग्रेसचे सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल यांनी म्हटले आहे. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा निकाल धक्कादायक आणि अविश्वसनीय आहे. निकालात असे काय घडले ते आम्हाला समजत नाही. हा केवळ काँग्रेस पक्षाचा पराभव नव्हता तर संपूर्ण महाविकास आघाडीचा पराभव होता त्यामुळे आम्ही एकत्र बसून आत्मपरीक्षण करू, असे वेणुगोपाल म्हणाले. आम्ही झारखंड विधानसभा निवडणुकीत बाजी मारली; पण महाराष्ट्रात अपयश आले. या पराभवाची कारणमीमांसा करू, अशी प्रतिक्रिया राजदचे नेते तेजस्वी यादव यांनी दिली. महायुतीचा विजय 'अनपेक्षित' आणि 'अनाकलनीय' आहे, अशी सर्वसामान्य प्रतिक्रिया आहे. उद्धव ठाकरे, बाळासाहेब थोरात, राहुल गांधी यांच्यासह अनेक नेत्यांनी या निकालाचे वर्णन 'अनाकलनीय' या शब्दातच केले आहे मात्र, हा निकाल अनपेक्षित असला तरी तो अनाकलनीय आहे का याचा शोध घ्यावा लागणार आहे. कारण ज्या प्रकारे हा निकाल विरोधकांसाठी अनपेक्षित होता तसा तो सत्ताधाऱ्यांसाठीसुद्धा अनपेक्षित होता. एवढ्या मोठ्या प्रमाणात राज्यातील मतदार आपल्या पाठीशी राहतील, अशी अपेक्षा सत्ताधाऱ्यांनीसुद्धा केली नव्हती. मतदानोत्तर चाचण्यांचे निष्कर्ष पाहता महायुती आणि महाविकास आघाडीत अटीतटीची झुंज होईल, असा अंदाज होता. प्रत्यक्षात मतदारांनी महायुतीच्या पारड्यात भरघोस मते टाकली. हे सारे अनपेक्षित होते; पण अनाकलनीय निश्चितच नव्हते. मुळात मतदारांच्या मन:स्थितीचे आकलन करण्यात महाविकास आघाडी कमी पडली हेच त्यांच्या पराभवाचे मुख्य कारण म्हणावे लागेल. लोकसभा निवडणुकीत राज्यातील मतदार आघाडीच्या पाठीशी उभे राहिले आणि त्या विजयाच्या धुंदीतून आघाडीचे नेते बाहेर आलेच नाहीत. या उलट महायुतीच्या नेत्यांनी त्या पराभवापासून धडा घेऊ रणनिती आखण्यास सुरुवात केली. अल्प कालावधीतही सत्ताधारी पक्षाने अनेक महत्त्वाचे निर्णय घेऊन मतदारांना आकर्षित केले. 'लाडकी बहीण' योजना गेमचेंजर ठरली. या योजनेमुळे महिला मतदारांचा मतदानाचा टक्का वाढला. 'लाडकी बहीण' योजनेबाबत आघाडीने धरसोड वृत्ती दाखवली त्याचाही फटका आघाडीला बसला. लोकसभा निवडणुकीतील मतदारांचा कल विधानसभा निवडणुकीतही कायम राहील, या भ्रमात आघाडीचे नेते राहिले. अडीच वर्षांच्या कालावधीत एकनाथ शिंदे सरकारने सर्वसामान्य नागरिकांना आकर्षित करणाऱ्या विविध योजना जाहीर केल्या. महिलांना एस. टी. प्रवासात अर्धे तिकिट, ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवास, लाडकी बहीण योजना अशा अनेक योजनांच्या माध्यमातून लोकांना थेट लाभार्थी करण्याचा प्रयत्न सरकारने केला ज्या लाभार्थ्यांना थेट आर्थिक वा इतर प्रकारचा लाभ झाला त्यांनी सरकारच्या पाठीशी राहण्याचा निर्णय घेतला.लोकसभा निवडणुकीत मनोज जरांगे यांचे मराठा आरक्षण आंदोलन महत्त्वाचे ठरले होते. विधानसभा निवडणुकीत मनोज जरांगे यांनी ऐनवेळी कोणतीच भूमिका न घेतल्याने त्यांना मानणाऱ्या मराठा मतदारांनी त्यांना हव्या त्या उमेदवाराला पाठिंबा देण्याचे काम केले. त्याचप्रमाणे ओबीसी मतदारही महायुतीच्या पाठीशी राहिले. अजित पवार, एकनाथ शिंदे व भाजपने निवडून येण्याची क्षमता असणाऱ्या उमेदवारांनाच उमेदवारी दिली. महायुतीच्या नेत्यांनी ही निवडणूक अतिशय गांभीर्याने घेतली होती तर आघाडीचे नेते विजय आपलाच आहे या भ्रमात राहिल्याने त्यांना त्याचा फटका बसला. निवडणुकीतील निकालावरून महायुतीच्या बाजूने एक लाट तयार झाली होती असे दिसते. महायुतीतील तीन मुख्य पक्षांना मिळालेल्या जागा पाहता त्या मागे कोणताही एक समाज घटक नव्हता तर विविध समाज घटक होते असेच दिसून येते. या निवडणुकीत महायुतीने जे प्रयत्न केले त्यामुळे त्यांना भरघोस पाठिंबा मिळाला. गत काही महिन्यांतील विविध जाहिराती, मोदींच्या सभा हे घटक ही त्या मागे आहेत. भाजपने हिंदुत्वाचा लावून धरलेला मुद्दा त्यांच्या यशाला कारणीभूत ठरला, असे म्हटले जात आहे; परंतु त्यात फारसे तथ्य नाही. या निवडणुकीत काँग्रेसच्या पृथ्वीराज चव्हाण, बाळासाहेब थोरात, यशोमती ठाकूर अशा मोठ्या नेत्यांना जनतेने नाकारले आहे. त्या मागे महायुतीच्या अनेक योजना आणि मायक्रो मॅनेजमेंट असले तरी स्थानिक पातळीवर त्यांच्या विरोधात एक प्रकारचे जे ध्रुवीकरण तयार होते त्याचा त्यांना फटका बसला असावा. प्रस्थापित नेत्यांच्या बाजूने जसे मोठे वलय असते तसा त्यांना छुपा धोकाही असतो. त्यांच्या विरोधात वातावरण तयार होत असतं. स्थानिक असंतोष आणि निवडणुकीतील बदललेले वातावरण याचा फटका या मोठ्या नेत्यांना बसला. यंदाच्या निवडणुकीत सर्वसामान्य मतदाराला आपल्याला मत देणं भाग पडेल, अशी स्थिती निर्माण करण्यात महायुतीला यश आले. हे मतदान स्वेच्छेने झाले असले तरी ही अपरिहार्यता कशी निर्माण करायची याचा अभ्यास करून महायुतीने देशाच्या राजकारणात एक वेगळाच पॅटर्न निर्माण केला आहे. जनमत हे सर्वांत महत्त्वाचे असते, त्याचा अनादर करणे महागात पडत असते. एकूणच निकाल पाहता भ्रष्टाचार, महागाई, कर्जमाफी, शेतकऱ्यांचे प्रश्न, ढासळलेली कायदा आणि सुव्यवस्था असे अनेक प्रश्न प्रचाराच्या गदारोळात गौण ठरलेले दिसले. ही स्थिती चिंताजनक म्हणावी लागेल. निवडणूक प्रचारात महायुतीने बाजी मारली. त्यांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देणे आघाडीला जमले नाही. असे अनेक लहान-मोठे घटक आघाडीला मारक आणि महायुतीला तारक ठरले. आघाडीला आता हातपाय गाळून चालणार नाही. जनतेचा विश्वास पुन्हा एकदा संपादन करण्यासाठी त्यांना एकमेकांत समन्वय साधून अथक मेहनत करावी लागेल.

प्रचंड आर्थिक अरिष्टांच्या पार्श्वभूमीवर श्रीलंकेमध्ये काही महिन्यांपूर्वी झालेल्या राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकांमध्ये अनुरा कुमारा दिसानायके यांच्या नेतृत्वाला तेथील मतदारांनी पसंती दिली होती. आता संसदीय निवडणुकांमध्येही दिसानायकेंच्या नेतृत्वाखालील आघाडीने बाजी मारली आहे. दक्षिण आशियातील घराणेशाही पद्धतीने चालणाऱ्या देशांपैकी एक असणाऱ्या श्रीलंकेमध्ये पहिल्यांदाच गरीबी, बेरोजगारी आणि महागाई या प्रश्नांवर निवडणूक लढवली गेली आणि अपेक्षेप्रमाणे ती दिसानायके यांनी जिंकली. दिसानायके हे साम्यवादी असले तरी पूर्णत: चीनधार्जिणे आहेत असे आजिबात नाही. त्यांच्या पक्षाने इतिहासात भारतविरोधी भूमिका घेतल्या असल्या तरी आता त्यांची भूमिका बदलली आहे.

# नव्या वळणावरचा श्रीलंका आणि भारत

श्रीलंकेमध्ये काही महिन्यांपूर्वी राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुका पार पडल्या होत्या. या निवडणुकांमध्ये अनुरा कुमारा दिसानायके यांच्या जेव्हीपी पक्षाला मोठे बहुमत मिळाले होते. या निकालांनी श्रीलंकेमध्ये अनेक वर्षांपासून चालत आलेल्या घराणेशाहीच्या प्रभावाला साफ झुगारून देण्यात आले. विक्रमसिंघे, राजेपक्षे, गोटाबाये यांसारख्या घराण्यांनी श्रीलंकेला एक प्रकारे वेठीस धरले होते. त्या विळख्यातून मुक्त होत मतदारांनी दिसानायके यांच्या नेतृत्वाच्या पाठिशी उभे राहण्याचा निर्णय घेतला. दिसानायके हे मूलतः कम्युनिस्ट आहेत. त्यांचा पक्ष हा कष्टकरी, शेतकरी, निम्न मध्यमवर्ग, विचारवंत अशा लोकांचे प्रतिनिधीत्व करणारा आहे. श्रीलंकेतील वांशिक राजकारणाचा विचार केला तर दिसानायके यांचा पक्ष सिंहली बुद्धिस्टांचा पक्ष म्हणून ओळखला जातो. काही वर्षांपूर्वी श्रीलंकेमध्ये झालेले नागरी युद्ध जवळपास ३० वर्षे चालले होते. हा संघर्ष सिंहली विरुद्ध अल्पसंख्यांक तमिळी यांच्यामध्ये होता. या संघर्षामध्येही जेव्हीपी पक्षाने सिंहली बुद्धिस्टांची बाजू उचलून धरत तमिळी अल्पसंख्यांकांविरोधी भूमिका घेतली होती. हा संघर्ष संपल्यानंतर एकंदरीतच श्रीलंकेमध्ये आर्थिक संकटांची मालिका सुरु झाली. परिणामी तेथील जवळपास सर्वच राजकीय पक्षांनी आपल्या विचारांमध्ये आर्थिक विचारांना केंद्रस्थानी आणले. विशेषतः शेतकऱ्यांचे प्रश्न, कामगारांचे प्रश्न, सर्वसामान्य नागरिकांना दैनंदिन आयुष्यात भेडसावणाऱ्या अन्नधान्य, गरीबी, निवारा यांसारख्या समस्यांना प्राधान्य देण्यास सुरुवात केली. थोडक्यात, श्रीलंकेतील राजकीय पक्षांनी जातीय, वांशिक मुद्दे घेऊन मतदारांपुढे न जाता आर्थिक मुद्दे मांडण्यास सुरुवात केली. अर्थात परंपरागत जातीयवादी पक्षांनी आपली भूमिका सोडली नाही; पण दिसानायके यांच्या जेव्हीपी पक्षाने आपली पारंपरिक भूमिका सोडून आर्थिक मुद्यांवर लक्ष केंद्रीत केले. सर्वसामान्यांच्या, गरीबांच्या समस्यांच्या सोडवणुकीसाठी जोरदार प्रयत्न केले. प्रस्थापितांशी संघर्ष केला.

नागरी युद्धानंतर ढासळलेल्या आर्थिक स्थितीतून सावरेपर्यंतच कोरोना महामारीचे संकट संपूर्ण जगाबरोबरच श्रीलंकेवरही ओढावले. श्रीलंका हा देश निसर्गसौंदर्याने नटलेला आहे. या देशाला सांस्कृतिक वारसा लाभलेला आहे. त्यामुळे जगभरातील पर्यटक वषानुवर्षांपासून श्रीलंकेमध्ये पर्यटनासाठी जात असतात. श्रीलंकेच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नात पर्यटन उद्योगाचा मोठा वाटा आहे. श्रीलंकेला जवळपास ५० टक्क्यांहून अधिक उत्पन्न पर्यटनाच्या माध्यमातून मिळते. पण कोरोना महामारीमुळे पर्यटनाचे क्षेत्र पूर्णतः कोलमडून गेले. यामुळे श्रीलंकेची अर्थव्यवस्था प्रचंड अडचणीत सापडली. दुसरीकडे जागतिक पुरवठा साखळी विस्कळित झाल्यामुळे महागाई प्रचंड वाढली. पेट्रोल-डिझेलचे भाव गगनाला भिडले. स्वयंपाकाचा गॅस मिळणे दुरापास्त झाले. यातून श्रीलंकेतील नागरिकांचे जीवन अत्यंत संकटमय बनले. यातून तेथील सरकारविरोधात मोठ्या प्रमाणावर असंतोष नागरिकांमध्ये निर्माण झाला. उद्विग्न झालेली श्रीलंकन जनता रस्त्यावर उतरली. त्यांच्या आंदोलनांने उग्र रुप धारण केल्यावर श्रीलंकेतील सत्ताधारी राजेपक्षे यांना देश सोडून पळून जावे लागले. यामुळे हा देश निर्नायकी अवस्थेत पोहोचला.

या आर्थिक आणि राजकीय अराजकाच्या पार्श्वभूमीवर तेथे राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुका पार पडल्या आणि दिसानायके हे नवीन राष्ट्राध्यक्ष म्हणून विराजमान झाले. त्यांचा जेव्हीपी पक्ष सत्ताधारी बनला. यानंतर दहाव्या संसदेसाठीच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठीचे मतदान पार पडले. श्रीलंकेच्या संसदेची सदस्य संख्या २३० इतकी आहे. यापैकी १६० जागा जेव्हीपी पक्षाने जिंकल्यामुळे अत्यंत स्पष्ट बहुमताने दिसानायकेंचे सरकार सत्तेत आले आहे. जेव्हीपीच्या नेतृत्वाखाली पीपल्स पॉवर अलायन्स नावाची एक आघाडी स्थापन करण्यात आली होती. यामध्ये ख्रिश्चन अल्पसंख्यांक, मुस्लिम अल्पसंख्यांकांसह तमिळ अल्पसंख्यांकांचाही समावेश होता. पण याचे नेतृत्व दिसानायकेंकडे होते. यावेळच्या निवडणुकांमध्ये मोठ्या प्रमाणावर श्रीलंकन मतदार मतदानाच्या प्रक्रियेत सहभागी झाला. विशेषत:, आर्थिक दृष्ट्या पिचलेला कनिष्ठ मध्यमवर्ग मतदानासाठी मोठ्या संख्येने पुढे आला आणि त्यांनी जीव्हीपीच्या पारड्यात मतांचा कौल दिला. या निवडणुकीचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे श्रीलंकेच्या आजवरच्या सर्व संसदीय किंवा अध्यक्षपदाच्या निवडणुकांमध्ये जातीय दृष्टिकोन हा नेहमीच प्रभावी ठरलेला दिसून आला आहे. बहुसंख्यांक विरुद्ध अल्पसंख्यांक असा संघर्ष नेहमीच रंगलेला दिसला आहे. अल्पसंख्यांकांना खलनायक दाखवण्याचे प्रयत्न बहुतेकदा झालेले आहेत. त्यामुळे श्रीलंकेत सत्ताधाऱ्यांना बहुतेकदा अल्पसंख्यांकबहुल भागात आजिबात मतदान मिळत नाही. परंतु यावेळी पहिल्यांदा जाफनासारख्या तमिळ अल्पसंख्यांकांचे बाहुल्य असणाऱ्या क्षेत्रात तीन जागांवर दिसानायके यांच्या जेव्हीपी पक्षाने विजय मिळवला. १९४८ मध्ये ब्रिटनपासून स्वातंत्र्य मिळाल्यानंतर जाफना जिल्ह्यात दिसानायके यांच्या पक्षाला सर्वाधिक मते मिळाली आहेत. खरे पाहता हा पक्ष सिंहली बुद्धिस्टांचा पक्ष मानला जातो. असे असूनही जाफनामध्ये या पक्षाला मिळालेला विजय हे स्पष्टपणाने दर्शवतो की या निवडणुकांमध्ये जातीय किंवा वांशिक मुद्दे पूर्णतः बाजूला पडले आणि मतदारांनी आर्थिक मुद्यांना प्राधान्य देत मतदानाचा हक्क बजावला. दक्षिण आशियातील घराणेशाही पद्धतीने चालणाऱ्या देशांपैकी एक असणाऱ्या श्रीलंकेमध्ये पहिल्यांदाच गरीबी, बेरोजगारी आणि महागाई या प्रश्नांवर निवडणूक लढवली गेली आणि अपेक्षेप्रमाणे ती दिसानायके यांनी जिंकली. श्रीलंकेला आर्थिक कोंडीतून बाहेर काढण्यासाठी दिसानायके यांचे जोरदार प्रयत्न सुरू आहेत. आता येणाऱ्या काळात 'डबल इंजिन' सरकार प्रस्थापित झाल्याने या प्रयत्नांची दिशा आणि गती पुढील काळात कशी राहील यावर श्रीलंकेचे आर्थिक भवितव्य अवलंबून असणार आहे.

**डॉ. शैलेंद्र देवळाणकर,**
**परराष्ट्र धोरण विश्लेषक**

सध्या श्रीलंकेची अर्थव्यवस्था तीन प्रमुख आधारस्तंभांवर निर्भर आहे. यातील सर्वांत पहिला आधार आहे तो म्हणजे आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून मिळालेले बेलआऊट पॅकेज. या पॅकेजमुळे कोलमडून पडणाऱ्या श्रीलंकेच्या अर्थव्यवस्थेला काठीचा आधार मिळालेला आहे. अन्यथा तेथे महागाईचा आगडोंब उसळलेला आहे. सरकारी तिजोरीतील डॉलरचा साठा तळाला गेलेला आहे. परिणामी कच्चे तेल विकत घेण्यासही श्रीलंकेकडे पैसे शिल्लक नव्हते. पण आता आयएमएफच्या पॅकेजमुळे काही काळ का होईना, श्रीलंका तग धरू शकणार आहे. दुसरा आधार आहे तो म्हणजे भारताने केलेली मदत. शेजारी देशांबाबतचे आपले कर्तव्य पार पाडताना भारताने श्रीलंकेला आर्थिक आणीबाणीतून बाहेर पडण्यासाठी ६ अब्ज डॉलर्सची मदत देऊ केली. याशिवाय गहू,तांदुळ, पेट्रोल,डिझेलही भारताने श्रीलंकेला देऊ केले. तिसरा आधार आहे तो म्हणजे, चीनकडून मिळणारी मदत. चीनने प्रचंड मोठ्या प्रमाणावर श्रीलंकेला कर्ज दिलेले आहे. आजघडीला या कर्जाचे प्रमाण श्रीलंकेच्या जीडीपीच्या ८० टक्क्यांपर्यंत गेले आहे. श्रीलंकेवर असणाऱ्या एकूण सुमारे ८ अब्ज डॉलर कर्जापैकी ५ अब्ज डॉलर एकट्या चीनकडून घेतलेले आहे. यापूर्वीच्या सत्ताधाऱ्यांनी या कर्जापायी श्रीलंकेचे सार्वभौमत्वही चीनकडे गहाण ठेवलेले आहे. श्रीलंकेची काही भूमीही चीनला आंदण म्हणून दिलेली आहे. हंबनतोतासारख्खे बंदर १०० वर्षांच्या लीजवर चीनला दिलेले आहे. चीनने तेथे आपल्या आण्विक पाणबुड्या तेथे आणल्या आहेत.

आता दिसानायके यांच्यापुढे सर्वांत मोठे आव्हान आहे ते म्हणजे लोकांनी प्रचंड अपेक्षेने सोपवलेल्या सरकारच्या माध्यमातून श्रीलंकेचा आर्थिक दुष्टचक्रात अडकलेला गाडा पूर्वपदावर आणण्याचे. लोकांच्या अपेक्षा प्रचंड उंचावलेल्या आहेत. त्यांना आर्थिक समस्यांमधून त्वरित सुटका हवी आहे. यासाठी दिसानायके यांना सर्वांत आधी शेतीउत्पन्न वाढवणे गरजेचे आहे. महागाई आटोक्यात आणणे आवश्यक आहे. अन्नधान्यांच्या गगनाला भिडलेल्या किमती कमी करणे गरजेचे आहे. हे करत असताना कर्जात बुडालेल्या श्रीलंकेच्या अर्थव्यवस्थेचा समतोल साधावा लागणार आहे. कारण आता आयएमएफकडून अधिक मदत मिळण्याची शक्यता कमी आहे. चीनकडूनही आणखी कर्ज घेणे धोक्याचे ठरणार आहे. त्यामुळे दिसानायकेंसाठी येणारा काळ आव्हानात्मक असणार आहे.

दिसानायके हे साम्यवादी असले तरी पूर्णतः चीनधार्जिणे आहेत असे आजिबात नाही. त्यांच्या पक्षाने इतिहासात भारतविरोधी भूमिका घेतल्या असल्या तरी दिसानायके यांनी फेब्रुवारी २०२४ मध्ये भारताचा दौरा करून आपली भारताविषयीची भूमिका बदलल्याचे संकेत दिले होते.माहिती तंत्रज्ञानासारख्या क्षेत्रात आपण भारताकडून खूप काही मिळवू शकतो. देशात बदल घडवून आणण्याची अपेक्षा आहे. अशा परिस्थितीत आपल्याला आंतरराष्ट्रीय समर्थनाची गरज आहे. आपण एकाकी देश म्हणून जगू शकत नाही, आपल्याला आंतरराष्ट्रीय संबंध मजबूत करण्याची गरज आहे, असे त्यांनी म्हटले होते. दिसानायके हे धूर्त आहेत. श्रीलंकेला आर्थिक स्थितीतून बाहेर काढण्यासाठी भारताची मदत मोलाची ठरणार आहे याची त्यांना पूर्णपणाने जाणीव आहे. भारताकडून देण्यात येणारी मदत आणि चीनकडून होणारी मदत यातील गुणात्मक फरक दिसानायके जाणून आहेत. त्यामुळेच राष्ट्राध्यक्ष बनल्यानंतर त्यांनी सर्वप्रथम श्रीलंकेतील भारतीय उच्चायुक्तांची भेट घेतली होती. पंतप्रधान मोदींना त्यांनी श्रीलंकेला मदत करावी असे आवाहनही केलेले आहे. श्रीलंकेच्या नवनियुक्त परराष्ट्रमंत्री विजिथा हेरथ यांनी दिलेल्या माहितीनुसार, डिसेंबर महिन्यामध्ये दिसानायके भारतभेटीवर येणार आहेत. दिसानायकेंना शेतकरी आणि कामगारांच्या प्रश्नांची जाण आहे. त्यामुळे पुढील पाच वर्षांमध्ये श्रीलंकेला अपेक्षित असणारे आर्थिक स्थैर्य देण्याचा प्रयत्न त्यांच्याकडून होईल अशी अपेक्षा आहे.

## गुड मॉर्निंग

दिवसाची अर्थपूर्ण सुरुवात

### पंचांग

**शुक्रवार, दिनांक २९ नोव्हेंबर २०२४**
कार्तिक कृ. १३, स्वाती,
श्री शके १९४६,विक्रम संवत् २०८१,
अनलनाम संवत्सर, दक्षिणायन, हेमंत ऋतू शिवरात्री
**नक्षत्र** : स्वाती, योग : शोभन, करण : विष्टि
**सूर्योदय :** स.०६.३५ **सूर्यास्त :** सायं. ०५.२९ वा.
**राहू काळ : दुपारी :** १:३० ते ३:००

### दिनविशेष

▶१८६९: गुजरातमधील समाजसुधारक अमृतलाल विठ्ठलदास ठक्कर (ठक्करबाप्पा)यांचा जन्म. ▶१८७४: अंतोनिया मोनिझ या मेंदूशास्त्रज्ञाचा जन्म. विद्युतलहरींच्या सहाय्याने मेंदूतील आवाळू शोधून काढणारे 'सेरेब्रल अँजिओग्राफी' नावाचे तंत्र त्यांने निर्माण केले. त्यांना १९४९ चा वैद्यकशास्त्रातील नोबेल पारितोषिक देण्यात आले. ▶१९०७: 'नाना' या नावाने प्रसिद्ध असलेले बालसाहित्यिक गोपीनाथ तळवळकर यांचा जन्म. ▶१९२६: 'केरळ कोळीळ'चे संस्थापक संपादक कृष्णाजी नारायण आठल्ये यांचे निधन. ▶१९३९: माधव त्र्यंबक पटवर्धन उर्फ माधव ज्युलियन यांचे निधन. ▶१९५०: महर्षी अण्णासाहेब कर्वे यांच्या पत्नी बाया कर्वे यांचे निधन. त्यांचे नांव आनंदीबाई असे होते. त्यांनी कर्वे यांच्या कार्यात मोलाची साथ दिली. ▶१९५४: १९३८ चे नोबेल पारितोषिक विजेते आणि अणुबॉम्बनिर्मितीतले एक महत्वाचे शास्त्रज्ञ एन्रिको फर्मी यांचे निधन. ▶१९५९: 'रियासतकार' गो. स. सरदेसाई यांचा स्मृतिदिन

### राशीभविष्य

▲ **मेष** : खास व्यक्तींशी गाठभेट ▲ **वृषभ** : कामात विलंब होईल.▲ **मिथुन** : खाण्यापिण्यावर नियंत्रण ठेवा. ▲ **कर्क** : नशिबं साथ देईल. ▲ **सिंह** : कामे विलंबाने पूर्ण कराल. ▲ **कन्या** : अपेक्षित पत्रे येथील. ▲ **तुळ** : पाहुणचाराचा आस्वाद घ्याल. ▲ **वृश्चिक** : आनंदी व उत्साही दिवस. ▲ **धनु** : बोलताना जपून शद्ब वापरा. ▲ **मकर** : अपेक्षित पत्र व्यवहार होतील. ▲ **कुंभ** : भागीदाराचे लाड पूरवाल. ▲ **मीन** : नवीन जबाबदारी घ्याल.

### चिंतन

वैभवकाळी उदार रहा, आपत्तीकाळात कृतज्ञ रहा, शेजाऱ्याच्या विश्वासास पात्र व्हा. निष्पक्षपाती वर्तन करा आणि गरजूंच्या हाकेला 'ओ' द्या. बोलण्यात संशय आणि वर्तनात नम्रता ठेवा. तहानलेल्यांचे सरोवर व्हा. दु:खितांचा आनंद व्हा. निराश्रितांसाठी आधाराचे पहाड व्हा. अंधांचे नेत्र व्हा. सद्गुणांच्या क्षितिजावरील तारा व्हा. मानवजातीचे दीपस्तंभ व्हा. थोडक्यात अर्थपूर्ण 'माणूस' व्हा. – **भगवान बहाउल्लाह**

### व्यक्तीविशेष

## गोविंद सखाराम सरदेसाई

'रियासतकार' गोविंद सखाराम सरदेसाई यांचा आज स्मृतिदिन. रत्नागिरी जिल्ह्यातील 'गोविल' या गावी दि. १७ मे १८६५ रोजी त्यांचा जन्म झाला. पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी 'रीडर' म्हणून १८८९ पासून सयजीराव महाराजांकडे काम केले. राजकुमारांचे शिक्षक म्हणूनही काम केले. याचदरम्यान त्यांचे मुसलमानी रियासत' व अन्य दोन इंग्रजी ग्रंथांचे अनुवाद प्रसिद्ध झाले. 'पुढे हिंदुस्थानचा अर्वाचीन इतिहास' या मालेत मराठी रियासत, ब्रिटिश रियासत, प्रसिद्ध केली. रियासतीचे अन्य खंड त्यांनी कामशेत मुक्कामी लिहिले. सर जदुनाथ सरकारांनी 'ग्रेटेस्ट लिव्हिंग हिस्टोरियन ऑफ द मराठाज' अशा शब्दांत त्यांचा गौरव केला. सरदेसायांनी रियासतीचे एकूण तेरा खंड प्रकाशित केले आणि त्याद्वारा हिंदुस्थानचा संगतवार इतिहास लिहिला. ते 'रियासतकार' म्हणून ओळखले जाऊ लागले. याबरोबरच 'न्यू हिस्ट्री ऑफ दि मराठाज', 'मेन करंट्स ऑफ मराठा हिस्ट्री' हे इंग्रजी ग्रंथ लिहिले. शालोपयोगी भारतवर्ष, बालोपयोगी महाराष्ट्राचा इतिहास, हिंदुस्थानचा प्राथमिक इतिहास, ही त्यांची अन्य ग्रंथसंपदा. इतिहास लेखनाबरोबरच त्यांनी पेशवे दप्तरातील कागदपत्रांचे संशोधन करून ४५ खंड संपादून प्रकाशित केले. इतिहासलेखन, संशोधन हेच जीवितकार्य मानलेला हा संशोधक.

### बोधकथा

## आणि आत्मविश्वास वाढला...

मधुरा तिसऱ्या इयत्तेत शिकत होती. अभ्यासात चांगली हुशार होती. पण तिच्या मनात आत्मविश्वासाची कमतरता होती. त्यामुळे शाळेत कुठल्याही स्पर्धेत भाग घ्यायला ती पुढे यायची नाही. वास्तविक पाहता तिला परीक्षेत उत्तम गुण मिळायचे, तिला सर्व कविता आणि अवांतर गीतेही पाठ असायची. मधुराच्या आईच्या लक्षात ही गोष्ट आली. तिने मधुराचा आत्मविश्वास वाढवण्यासाठी प्रयत्न सुरु केले. पुढच्याच आठवड्यात वर्गात शब्दांची स्पर्धा असल्याचे बाईंनी सांगितले. मधुरा लिखाणात उजवीच होती. कुठलेही शब्द ती उच्चारानुसार व्यवस्थित लिहायची. आईने घरी मधुराचा वेगवेगळ्या प्रकारचे शब्द लिहून घेण्याचा भरपूर सराव करून घेतला. तिला स्पर्धेबाबत फारसे दडपण जाणवू दिले नाही. स्पर्धेच्या दिवशी मधुरा नेहमीप्रमाणेच शाळेत गेली. बाईंनी पहिल्या तासाला सर्व मुलांना एकेक पेपर वाटला आणि तोंडी शब्द सांगायला सुरुवात केली. मधुराचा घरी चांगला सराव झाल्यामुळे ती सहजपणे अवघड शब्दही लिहित होती. त्यात तिला फारसे कठीण काही वाटले नाही. बाईंचे सांगणे संपल्यावर आपला पेपर नेहमीप्रमाणे नेहमीप्रमाणे बाईंच्या हातात दिला आणि घरी आली. आईने घरी आल्यावर तिला स्पर्धेबाबत काहीही विचारले नाही. (पूर्वार्ध)

### जिज्ञासा

## शोध नव्या लघुग्रहांचा

अमेरिकेच्या नासा या अंतराळ संशोधन संस्थेच्या स्पिटझर या अंतराळ दुर्बिणीला अलीकडेच पृथ्वीच्या जवळ अनेक लघुग्रह सापडले आहेत. विविध आकारांचे आणि वैशिष्ट्ये असलेले हे लघुग्रह म्हणजे खगोलशास्त्रज्ञांना आव्हानच आहे. संख्येने शंभरहून अधिक असलेल्या या वस्तू यापूर्वी समजूत होती त्यापेक्षा कितीतरी अधिक प्रमाणात विविधतेने नटलेल्या आहेत, असे शास्त्रज्ञांना वाटते. हे लघुग्रह आकाराने अगदी लहान ते महाकाय असे आहेत. त्यांचे रंग आणि रचनेतही खूप वैविध्य आहे. काही लघुग्रह अंधारे आणि निस्तेज आहेत. तर काही अतिशय चमकदार आणि प्रकाशमान आहेत. स्पिटझर अंतराळ दुर्बिणीने गेल्या सहा वर्षांत सतत पाठवलेल्या छायाचित्रांतून या लघुग्रहांचा शोध लागला आहे. सततच्या व्यस्त कार्यक्रमामुळे स्पिटझरचे इन्फ्रारेड डिटेक्टर्स थंड होण्याची गरज होती. दुर्बिणीच्या स्वयंचलित पद्धतींचा वापर करून इन्फ्रारेड चॅनेल्स थंड करण्यात आले आणि आता ही दुर्बिण व्यवस्थित काम करू लागली आहे. नॉर्थ ॲरिझोना विद्यापीठातील शास्त्रज्ञ डेव्हिड ट्रीलिंग यांच्या मार्गदर्शनाखाली शास्त्रज्ञांचा एक गट या वस्तूंचा अभ्यास करत आहेत. सध्या या वस्तूंना लघुग्रह म्हटले असले तरी या वस्तू नेमक्या काय आहेत याचा अभ्यास शास्त्रज्ञ करत आहेत. (पूर्वार्ध)

### सामान्यज्ञान

## प्राण्यांची भविष्यवाणी

केवळ वास घेण्याचीच नाही तर कुत्र्यांची ऐकण्याची शेक्यताही माणसापेक्षा दहापट जास्त असते. याच आधारावर पुढे काय होणार आहे हे त्यांना समजू शकते. भूकंप किंवा समुदी वादळापूर्वी कुत्र्यांची धावा घेण्याची किंवा भूंकण्याची कृती सुरू होते. याद्वारे ते संकटांची सूचना देतात. मध्यंतरी एका दूरचित्रवाणी वाहिनीवर ऑस्कर नावाच्या मांजराबाबत विशेष कार्यक्रम दाखवला होता. ब्रिटनमध्ये ऑस्कर नावाच्या एक मांजर एका नर्सिंग होममध्ये रुग्णाच्या बिछान्याजवळ बसलेलं दिसलं. तो माणूस नंतर मरण पावला. नंतर या रुग्णालयाच्या डॉक्टरांनी रिडर्स डायजेसमध्ये मांजराच्या या भविष्यावाणीमागचे कारण देताना म्हटले हो की मृत्यूपूर्वी व्यक्तीच्या शरीराच्या आसपास एका विशिष्ट प्रकारच्या रसायनाचा गंध येऊ कतो. (क्रमश:)

### सोडवा सुडोकू

सुडोकू सोडवताना रिकाम्या चौकटीमध्ये १ ते ४ आकडे अशा पद्धतीने भरा जेणेकरून उभ्या अथवा आडव्या ओळीत तो आकडा एकदाच येईल.

**क्रमांक ५१३**

| | | | |
|---|---|---|---|
| 4 | 3 | 2 | 1 |
| 2 | | 4 | 3 |
| 3 | | | |
| | 4 | | 2 |

**क्रमांक ५१२ चे उत्तर**

| | | | |
|---|---|---|---|
| 4 | 2 | 1 | 3 |
| 1 | 3 | 2 | 4 |
| 3 | 1 | 4 | 2 |
| 2 | 4 | 3 | 1 |

### भूगोल

## घडीचे किंवा वळीचे पर्वत

या प्रकारचे पर्वत हे क्षितिज समांतर पातळीत घडणाऱ्या संकलनकारक हालचालींमुळे निर्माण होतात. जगातील आजचे सर्व प्रमुख पर्वत या प्रकारात समाविष्ट होतात. हिमालय, आल्प्स, रॉकी आणि अँडीज हे सर्व पर्वत अलीकडच्या काळात घडलेल्या पर्वतोत्पत्तीकारक हालचालींमुळे निर्माण झालेले असल्यामुळे त्यांना तरुण घडीचे पर्वत म्हणतात. याउलट उराल, ॲपलेशियन, तिएनशान व नानशान हे पर्वत यापूर्वी घडलेल्या भूहालचालींमुळे निर्माण झालेले आहेत. या हालचालींमुळे स्कॉटलंड व नॉर्वेतील उंचवटे, रशियातील सायन व स्टेनोव्हाय पर्वत निर्माण झाले होते. अरवली पर्वत हा जगातील सर्वात प्राचीन पर्वत समजला जातो. प्राचीन घडीपर्वतांचे अपक्षयन हवा, नद्या, हिमनद्या समुद्राच्या लाटांमुळे दीर्घ काळ घडून आले आहे. अर्वाचित घडीपर्वतापेक्षा या अपक्षक्न कार्यामुळे त्यांची उंचीदेखील कमी झालेली आहे.

### महिलायन

## सोने खरेदी करताना...

सोन्याच्या किमती अलीकडे महागाईचे रेकॉर्ड बनवत असल्या तरीही सोन्याप्रती असणारे आकर्षण जराही कमी झाल्याचे दिसून येत नाही. खास करून महिलावर्गाला सोन्याचे प्रचंड आकर्षण असते. जगभरातील देशांपैकी भारतात दागिन्यांसाठी सर्वात जास्त सोन्याचा प्रयोग होत असतो. म्हणूनच सोन्याचे भाव आकाशाला भिडले असले तरीही सोन्याच्या खरेदीत फारसा फरक झालेला दिसून येत नाही. सोन्याच्या दागिन्यांना पर्याय ठरणारे कृत्रिम ज्वेलरीचे अनेक पर्याय उपलब्ध असले तरीही सोन्याच्या बाजारात फरक झालेला दिसत नाही. कारण आपल्याकडे सोने हा केवळ महाग धातू म्हणूनच नाही तर स्टेटस सिंबॉल म्हणून बघितला जातो. आजही लग्नामध्ये वधूच्या अंगावर किती सोने घातले याकडे प्रतिष्ठा म्हणून बघितले जाते. सोन्याच्या किमती वाढल्या म्हणून कदाचित कमी प्रमाणात सोने खरेदी करण्याचा पर्याय लोकं निवडत असतील पण ते खरेदी करण्याचे महत्त्व मात्र कमी झालेले नाही. गुंतवणुकीचा पर्याय म्हणूनही सोन्याकडे बघितले जाते. हेच महत्त्व लक्षात घेऊन अलिकडे वजनदार दागिन्यांऐवजी कमी वजनाच्या दागिन्यांचा ट्रेंड आलेला दिसून येतो. कमी वजनाच्या दागिन्यांमध्ये पारंपरिक दागिन्यांबरोबरच अत्याधुनिक डिझाईन्सही मोठ्या प्रमाणात बघायला मिळतात. हल्ली मान्यताप्राप्त सोनारदेखील कमी वजनाच्या दागिन्यांना मोठ्या प्रमाणात तयार करत आहेत. यामध्ये लहान मोठ्या मंगळसुत्रांपासून गळ्यातले वेगवेगळे नेकलेस, कानातले आणि बांगड्या असे सर्व प्रकार बघायला मिळतात. कमी वजनाच्या दागिन्यांसाठी खास कारगिर कार्यरत असतात. त्यामुळे अशा कमी वजनाच्या दागिन्यातून महिलावर्ग आपली सोन्याची हौस भागवताना दिसत आहे. (पूर्वार्ध)

### बालांगण

## ओळख किल्ल्यांची

### कोळदेहेर किल्ला

नाशिक जिल्ह्यातील चांदवड तालुक्यात गिर्यारोहनाच्या आयुधानिशी सर करावा लागणारा एक किल्ला आहे, कोळदेहेर. या किल्ल्यावर जाण्यासाठी नाशिक-देवळे मार्गावरील खेळदरी गावातून जावे लागते. या किल्ल्याच्या चारी बाजूंनी सरळसोट कातळ असल्यामुळे याला तटबंदी आणि बुरूज बांधण्याची गरजच भासलेली नाही. गिर्यारोहघाच्या तंत्राने या किल्ल्याच्या माथ्यावर गेल्यावर आपणास कातळकोरीव गुहा आणि पाण्याची टाकी पाहायला मिळतात. जुलै १६६३ मध्ये हा गड निजामाडून मोगलांनी जिंकून घेतला. शिवकालात याचा ताबा मोगलांकडेच होता.

'राष्ट्र संचार' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave
Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com



# विश्ववेध

## मंगळावर टिकू शकतात सूक्ष्म जीव

मंगळ हा पृथ्वीप्रमाणेच कठीण पृष्ठभाग असलेला ग्रह आहे. एके काळी मंगळावर वाहते पाणीही होते. त्यामुळे तिथे सूक्ष्म जीवांच्या स्वरूपात का होईना जीवसृष्टी होती का, याबाबतचे कुतूहल नेहमीच असते. मंगळावरील विरळ हवेत सूक्ष्म जीव जिवंत राहू शकतात, असे वैज्ञानिकांनी म्हटलेले आहे. पृथ्वीवरील मिथेन निर्मिती करणारे जिवाणू मंगळावर टिकाव धरू शकतील, असा त्यांचा अंदाज आहे.



भारतीय वंशाच्या एका वैज्ञानिकाचा या संशोधनात समावेश आहे. मंगळाचा पृष्ठभाग सध्या कोरडा व थंड आहे, पण तेथे नद्या, सरोवर व सागर अब्जावधी वर्षांपूर्वी होते याचे पुरावे आहेत. पृथ्वीवर जेथे द्रव आहे तेथे सूक्ष्म जीव आहेत. मंगळावरील ओलसरपणा होता त्यामुळे तेथे अजूनही सूक्ष्म जीव असावेत, असे अनेकांना वाटते. अमेरिकेतील अरकान्सास विद्यापीठाच्या रिबेका मिकॉल यांनी सांगितले की, पृथ्वीवर जसे सूक्ष्म जीव आहेत तसे तिथेही असू शकतात. अगदी आपल्यासारखेच सूक्ष्म जीव तिथे असतील असे नाही, तर त्यात फरक असू शकतो. आधीच्या संशोधनानुसार मंगळाच्या वातावरणात मिथेनचा कार्बनी रेणू सापडला होता. मिथेन निर्मितीचे अजैविक मार्गही आहेत, त्यात ज्वालामुखीची क्रिया हा एक आहे. पृथ्वीवर या वायूची निर्मिती गायीगुरांच्या शेणातून होत असते. मंगळाच्या वातावरणातही मिथेन आहे. पृथ्वीवर जैविक पद्धतीने मिथेनची निर्मिती होते. पृथ्वीवर मिथुनोजेन्स नावाचे सूक्ष्म जीव आहेत, त्यांचा यात मोठा वाटा आहे. त्या सूक्ष्म जीवांना ॲनेरोब्स म्हणतात. त्यांना ऑक्सिजन लागत नाही. ते ऊर्जेसाठी हायड्रोजन वापरतात व कार्बनी रेणू निर्मितीत ते कार्बन डायॉक्साईडमधील कार्बन अणू वापरतात. मिथुनोजेन्सना ऑक्सिजन लागत नाही व प्रकाशसंश्लेषणही लागत नाही. याचा अर्थ ते मंगळाच्या पृष्ठभागाखाली जिवंत राहू शकतात. त्यामुळे ते मंगळावर असण्याची शक्यता नाकारता येत नाही. पदवीधर विद्यार्थिनी नविता सिन्हा यांनी मिथेनोजेन्सच्या चार प्रजातींवर प्रयोग केले असून त्यात मिथेनोथर्मोबॅक्टर वुल्फेई, मिर्थनोसारसिना बारकेरी, मिर्थेनो बॅक्टेरियम फॉर्मिसिसीयम व मिर्थनोकॉकस मारीपॉलुडिस या जिवाणूंचा समावेश आहे. हे संशोधन जर्नल ओरिजिन्स ऑफ लाईफ अँड इव्होल्यूशन ऑफ बायोस्पिअर्समध्ये प्रकाशित झालेले आहे.

## डोक्यावर पांघरुण घेऊन झोपताय?



भारतात आता थंडी हळूहळू वाढू लागेल. हिवाळा सुरू झाला की आपल्याला आपल्या आरोग्याची जरा जास्त काळजी घ्यावी लागते. काही लोकांना रात्री झोपताना डोक्यावरून पांघरुण घेण्याची सवय असते. या सवयीमुळे अनेक आजाराचा सामना करायला लागू शकतो, असे तज्ज्ञ सांगतात. जर आपण बराचवेळ डोक्यापासून पांघरुण घालून झोपत असू तर यानं बरेच त्रास होऊ शकतात. डोक्यापासून पायापर्यंत पांघरुण घेऊन झोपल्यावर अल्झायमर, डिमेंशिया, अथवा हृदयाच्या संबंधित आजार होऊ शकतात, हे आजार लगेच होऊ शकतात असे नसलं, तरी सुद्धा आरोग्याची काळजी घेणे फार महत्त्वाचे आहे.

रात्रभर पांघरुण डोक्यावर घेऊन झोपल्यावर शरीरातील ऑक्सिजन पातळी कमी होते. त्याबरोबर उष्णता वाढल्यानं थकवा, डोकेदुखी यांसारख्या समस्या वाढू शकतात. अनेक संशोधकाच्या मते रात्रभर तोंड झाकून झोपल्याने मानसिक आरोग्य बिघडते. स्लीप एपनिया या आजाराला त्रस्त असलेल्या लोकांना झोपताना श्वास घेण्यास त्रास होतो. या आजारातील लोकांना गुदमरू शकतं किंवा त्यांना श्वास घेण्यास अडथळे येऊ शकतात. अनेकदा तर हे रुग्ण अचानक घाबरून जागे होतात. अशा रुग्णांनी पांघरुण डोक्यावरून घेऊन झोपणे हे प्राणघातक असते. जर तुमच्या घरात कोणी डोक्यावर पांघरुण घेऊन झोपत असेल तर त्यांना या विषयी आताच सांगा कारण हे प्राणघातक ठरू शकतं. यामुळे हृदयासंबंधीत त्रास होऊ शकतो. शरीरातील ऑक्सिजन कमी होऊ लागेल. त्यामुळे गुदमरल्यासारखं वाटू शकतं. ऑक्सिजनच्या कमतरतेमुळे सगळ्यात जास्त त्रास हृदयविकारांच्या समस्येनं त्रस्त असलेल्या किंवा दमा असलेल्या लोकांना उद्भवू शकतो.

## अबब ! केवढा हा पृथ्वीचा 'भार'



ब्रह्मांडात अनेक ग्रह अस्तित्वात आहेत. यापैकी फक्त पृथ्वीवरच जीवसृष्टी अस्तित्वात आहे, असे सध्यातरी दिसून येते. पृथ्वीवर जीवसृष्टीची उत्पत्ती कशी झाली यासह अनेक रहस्यांचा नेमका व स्पष्ट उलगडा झालेला नाही. अशातच आणखी एक प्रश्न आहे ज्याच्या उत्तरावरून संशोधकांमध्ये नेहमीच वादविवाद होत राहतात ते म्हणजे पृथ्वीचे वजन. जाणून घेऊया, पृथ्वीचे वजन नेमकं आहे तरी किती?

पृथ्वीवर कोट्यवधी जीव अस्तित्वात आहेत. यासह आकाशाचे टोक गाठणारे उत्तुंग पर्वत तसेच अथांग समुद्रकिनारे, झाडे- झुडपे पृथ्वीच्या पृष्ठभागावर आहेत. पृथ्वीवर वातावरणाचा देखील भार आहे. पृथ्वीचे वजन १३,१७०,०००,०००,०००,०००,०००,०००,००० पौंड इतके आहे. अधिक स्पष्ट सांगायचे झाले तर ५.९७२२१०२४ अर्थात ५,९७४,०००,०००,०००,०००,०००,०००,००० किलोग्रॅम इतके आहे.

अर्थात, पृथ्वीचे वजन कमी- जास्त होत आहे. पृथ्वीच्या वातावरणात असणारा हवेचा दाब तसेच पृथ्वीवर असणारे व पृथ्वीच्या बाहेरच्या कक्षातून वातावरणात येणारे वायूकण, धूलीकण यामुळे वजन सातत्याने कमी- जास्त होत आहे.

पृथ्वीवर अनेक गोष्टी या निसर्गनिर्मित तसेच मानवनिर्मित आहेत. यामुळे पृथ्वीचे वजन कायम स्थिर राहू शकत नाही. गुरुत्वाकर्षण बल दोन भिन्न वस्तूंमध्येही असते. हेच सूत्र वापरून दोन वस्तूंमधील गुरुत्वाकर्षण शक्ती मोजून पृथ्वीचे वजन काढण्यात आले. संशोधकांनी गुरुत्वाकर्षण शक्तीच्या मदतीने पृथ्वीचे वजन केले. यासाठी न्यूटनच्या गुरुत्वाकर्षणाचा सिद्धांताची मदत घेण्यात आली. अमेरिकेच्या नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ स्टँडर्स अँड टेक्नॉलॉजीचे मेट्रोलॉजिस्ट स्टीफन स्लेमिंगर यांनी याबाबतची माहिती दिलेली आहे.


## रक्तचाचणीतून होणार स्मृतिभ्रंशाचे निदान



उतारवयात होणाऱ्या मेंदूच्या काही असाध्य विकारांमध्ये डिमेन्शिया, अल्झायमर्स यासारख्या आजारांचा समावेश होतो. शरीरातील अन्य पेशींप्रमाणे चेतापेशी नव्याने निर्माण होऊ शकत नाहीत. त्यामुळे एकदा मेंदूतील अशा पेशींचा ऱ्हास झाला की, त्या जागी नव्या पेशी तयार होऊन मेंदूचे कार्य सुरळीत राहण्याची शक्यता नसते; मात्र असा ऱ्हास रोखण्यासाठी किंवा त्याचा वेग कमी करण्यासाठी वेळीच काही उपाययोजना करता येऊ शकतात. त्यासाठी अशा आजारांचे वेळीच निदान होणेही गरजेचे असते. याबाबत सातत्याने संशोधने होत असतात. रक्त चाचणीतूनही स्मृतिभ्रंश म्हणजेच डिमेन्शियाचे लवकर निदान करण्याची एक पद्धत शोधण्यात आलेली आहे. या चाचणीमुळे याबाबतच्या नव्या औषधांच्या निर्मितीसाठी चालना मिळण्याची शक्यता असल्याचे जर्मनीतील ऱ्हुर विद्यापीठाच्या संशोधकांनी म्हटले आहे.

स्मृतिभ्रंश झालेल्या रुग्णांच्या मेंदूमध्ये लक्षणांच्या सुरुवातीला अमायलॉइड बिटाचा थर जमा होण्यास सुरुवात होते. रक्ताच्या चाचणीमध्ये इम्युनो इन्फ्रारेड सेन्सर तंत्रज्ञानाच्या माध्यमातून अमायलॉइड बिटा थराचा आकार आणि त्याची रचना समजून घेतली जाते. या चाचणीमुळे स्मृतिभ्रंश आजाराचे निदान लवकर होत असल्याचे दिसून येते, असे मॉलिक्यूलर सेल नियतकालिकात प्रसिद्ध झालेल्या संशोधनात स्पष्ट करण्यात आले आहे. निरोगी व्यक्तीच्या मेंदूतील अमायलॉइड बिटाचा थर पातळ असतो, तर स्मृतिभ्रंश झालेल्या व्यक्तीच्या मेंदूमधील अमायलॉइड बिटाचा थर जाड आणि चिकट असतो. त्यामुळे तो वेगळा ओळखता येतो आणि निदान करता येते. या दोन्ही प्रकारचे थर अवरक्त किरण वेगवेगळ्या प्रकारे शोषून घेतात. ही बाब रोगनिदानासाठी उपयोगी ठरते.

## ड्रोनना लाभणार 'नवी दृष्टी'



संशोधकांनी एक नवी कॉम्प्युटर व्हिजन सिस्टीम विकसित केली आहे. तिच्या साहाय्याने भविष्यातील ड्रोन तसेच अन्य लष्करी रोबोंना दृश्यात्मकता कमी असताना किंवा दुर्गम वातावरणात लक्ष्याचा माग काढण्यासाठी मदत मिळेल. ही व्हिजन सिस्टीम मांजराच्या डोळ्यांपासून प्रेरित आहे, हे विशेष! या सिस्टीममुळे भविष्यातील ड्रोन आजूबाजूचा परिसर अधिक तीक्ष्ण नजरेने पाहू शकतील. रोबो, ड्रोन्स, स्वयंचलित मोटारी आणि अन्य स्वयंचलित यंत्रणा अधिकाधिक एकसारख्या बनत आहेत. मात्र, या सर्वांमधील एक समस्या म्हणजे सर्वच प्रकारच्या वातावरणात किंवा स्थितीत समोरचे दृश्य स्पष्टपणे पाहण्यासाठी किंवा लक्ष्यभेद करण्यासाठी त्यांच्यासमोर आजही आव्हाने आहेत. उदाहरणार्थ, स्वयंचलित मोटारी मुसळधार पावसात किंवा दाट धुक्याच्या स्थितीत चांगली कामगिरी करू शकत नाहीत. याचे कारण म्हणजे, अशा स्थितीत त्यांचे सेन्सर्स आणि कॅमेऱ्यांवर परिणाम होत असतो. आता संशोधकांनी अद्ययावत लेन्सेस म्हणजेच भिंग आणि सेन्सर्सच्या साहाय्याने ही नवी व्हिजन सिस्टीम विकसित केली आहे. एखाद्या वस्तूचा छडा लावणे व ती कोणती वस्तू आहे हे ओळखण्यासाठी ही सिस्टीम एखाद्या मांजराच्या डोळ्याप्रमाणे काम करते. याबाबतच्या संशोधनाची माहिती 'सायन्स ॲडव्हान्सेस' या नियतकालिकात प्रसिद्ध करण्यात आली आहे. मांजरे ही दिवसाचा प्रकाश आणि रात्रीच्या अंधारातही उत्तम प्रकारे पाहू शकतात. दिवसा मांजराची बुब्बुळे ही उभ्या चकतीसारखी असतात. ती प्रकाश फिल्टर करून बाहेर सोडतात व एखाद्या वस्तूवर त्यांना फोकस करता येतो. रात्रीच्या अंधारात ही बुब्बुळे विस्तारतात. त्यामुळे ती अधिकाधिक प्रकाश आत घेऊ शकतात व त्यांना अंधारातील वस्तूही स्पष्ट दिसतात. अशीच यंत्रणा या नव्या सिस्टीममध्ये बनवलेली आहे. दक्षिण कोरियातील ग्वांगजू इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजीमधील इलेक्ट्रॉनिक इंजिनिअरिंगचे प्राध्यापक यंग मिन साँग यांनी याबाबतचे संशोधन केले आहे.

## बैलगाडी चालवणाऱ्या महिलांचे गाव

आज प्रत्येक क्षेत्रात महिला आपले नाव कमावत आहे. पुरुषांच्या बरोबरीने आपले कर्तृत्व सिद्ध करत आहेत. यातच आता महिलांनी आणखी एक आदर्श निर्माण केला आहे. मध्यप्रदेशातील बुऱ्हाणूपर जिल्ह्यातील ठिल्लारी समाजातील महिलांनी एक वेगळा आदर्श निर्माण केला आहे. या समाजातील महिला या फक्त दुचाकी किंवा चारचाकीच नव्हे, तर बैलगाडी चालवण्यातही तरबेज आहेत. याठिकाणी मुली आणि महिलांना वयाच्या १० व्या वर्षांपासून बैलगाडी चालवायला शिकवले जाते.

भोलाना क्षेत्रातील या समाजाचे तानू यांनी सांगितले की, आमचा ठिल्लारी समाज हा प्रवास करत राहतो. त्यामुळे आम्ही १० वर्षे वयाच्या मुलांना, महिलांना किंवा मुलांना बैलगाडी चालवायला शिकवतो. ते बैलगाडी चालवायला शिकतात. आमचे काम सोपे होऊन जाते. आम्ही माणसे जनावरांची काळजी घेण्यात व्यस्त असतो. त्यामुळे महिला बैलगाडी चालवून आमचा प्रवास पूर्ण करण्यात मदत करतात. यामध्ये मुलगी किंवा महिला, बैलगाडी कशी चालवायची



हे सर्वांनाच माहीत आहे.

भोलाना गावातील महिला बैलगाडी चालवण्यात तरबेज आहेत. ते बैलगाडीत सामान ठेवून प्रवास पूर्ण करतात. ठिल्लारी समाजातील लोक मध्यप्रदेश, महाराष्ट्र आणि इतर राज्यात फिरत राहतो. जिथे आपल्या जनावरांसाठी चारा उपलब्ध आहे, तिथे आम्ही थांबतो. ठिल्लारी समाजातील महिलांमध्ये आता बैलगाडी चालवणे हे फक्त कौशल्यच नाही, तर हे काम आता त्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. तसेच यामुळे त्या आत्मनिर्भर आणि धैर्यवान बनत आहेत.

## महाकाय ग्रहनिर्मितीबाबत नवा सिद्धांत


विज्ञानातील सिद्धांतही अनेक वेळा गृहितकेच असतात. कालौघात नवे संशोधन आधीच्या सिद्धांताला छेद देणारे व नवा सिद्धांत स्थापन करणारे असू शकते. यापूर्वी लहान मातृताऱ्याभोवती महाकाय ग्रहाची निर्मिती होऊ शकत नाही, असे मानले जात होते. मात्र, एका महाकाय ग्रहाच्या शोधाने या समजालाही असाच छेद गेला. या ग्रहाचे नाव आहे 'एनजीटीएस-१बी'. वार्विक विद्यापीठाचे खगोलशास्त्रज्ञ डॉ. डॅनियल बेल्लिस यांनी म्हटले होते की, या ग्रहाचा शोध आमच्यासाठी एक आश्चर्याचा धक्काच होता. इतक्या मोठ्या आकारमानाचा ग्रह इतक्या लहान ताऱ्याजवळ असू शकत नाही, अशीच आमची धारणा होती.



या ग्रहाला चिलीतील अटाकामा वाळवंटात असलेल्या नेक्स्ट-जनरेशन ट्रांझिट सर्व्हे या दुर्बिणीतून पाहण्यात आले होते. हा ग्रह त्याच्या ताऱ्याच्या अतिशय जवळ आहे. पृथ्वी आणि सूर्याच्या अंतराच्या केवळ तीन टक्के अंतरच यामध्ये आहे. या ग्रहाला ताऱ्याभोवती एक प्रदक्षिणा पूर्ण करण्यास अवघ्या २.६ दिवसांचा कालावधी लागतो. अर्थातच, या ग्रहाचे तापमान अत्याधिक म्हणजे ५३० अंश सेल्सिअस इतके आहे. या ग्रहाच्या मातृताऱ्याचा आकार अतिशय लहान असल्याने या ग्रहाला शोधणे कठीण होते. आकाशगंगेत असंख्य लहान आकाराचे तारे असून अशा प्रकारच्या ग्रहांचा शोध लागण्याची आणखी शक्यता आहे, असे वार्विक विद्यापीठातील प्रा. पीटर व्हिटले यांनी म्हटले आहे. हा अतिविशाल ग्रह आकाराने आपल्या सौरमालेतील गुरू ग्रहाइतक्या आकाराचा आहे. तो एका लाल ताऱ्याभोवती फिरतो. हा तारा आपल्या सूर्याच्या निम्म्याच आकाराचा आहे. ही सौरमाला पृथ्वीपासून ६०० प्रकाशवर्ष अंतरावर आहे. या ग्रहाचे आणि त्याच्या मातृताऱ्याचे गुणोत्तर आतापर्यंत शोध लावण्यात आलेल्या ग्रहांच्या तुलनेत सर्वात वेगळे आहे.

## नाकात शिरले झुरळ आणि...

कधी कधी आपल्या शरीरात काही अनाहूत पाहुणे येऊन ठाण मांडून बसतात आणि आपल्यालाच त्याची कल्पना नसते. एखादा कीटक नाक, डोळे किंवा कानात गेल्याच्या अनेक घटना देश-विदेशात घडलेल्या आहेत. चीनमधील एका ५८ वर्षीय व्यक्तीसोबत नुकतीच अतिशय धक्कादायक घटना घडली. झोपेमध्ये या व्यक्तीच्या नाकामध्ये झुरळ शिरले आणि श्वसननलिकेमध्ये जाऊन अडकले. जेव्हा त्याला या गोष्टीची जाणीव झाली तेव्हा तो अस्वस्थ झाला. नाकामध्ये शिरलेले झुरळ घशाच्या भागात येत असल्याचेही त्याला जाणवत होते आणि यामुळे त्याला खोकल्याची समस्या सुरू झाली; पण काही झुरळ बाहेर पडेना.



स्थानिक चिनी न्यूज आऊटलेटनुसार, त्यावेळेस नेमके काय घडले हे त्याला समजलेच नव्हते. थोड्या वेळाने तो पुन्हा झोपी गेला. दुसऱ्या दिवशी त्यानं घडलेल्या प्रकाराकडे दुर्लक्ष केले आणि दैनंदिन कामामध्ये तो व्यस्त झाला. पण तीन दिवसांनंतर त्याच्या लक्षात आले की, त्याच्या श्वासाला अतिशय घाणेरडा वास येत होता. दात घासले आणि तोंडाची स्वच्छता राखल्यानंतरही दुर्गंधीची समस्या काही केल्या कमी होत नव्हती. त्यांच्या धुंकीचा रंगदेखील बदलला होता. अखेर त्याने डॉक्टरांना संपर्क साधला. चीनच्या हैनान प्रांतातील हायकोऊ येथील रहिवासी असलेल्या या व्यक्तीने केल्या हैनान रुग्णालयात जाऊन ईएनटी तज्ज्ञाकडून तपासणी करून घेतली. येथे तपासणीदरम्यान श्वसनमार्गाच्या वरील भागामध्ये काहीही असामान्य आढळले नाही. पण समस्या गंभीर असल्याचे लक्षात घेता, डॉक्टरांनी त्याला डॉ. लिन लिंग यांच्याशी संपर्क साधण्याचा सल्ला दिला. डॉ. लिन यांनी त्याच्या छातीचे सीटीस्कॅन केले, ज्यामध्ये फुफ्फुसाच्या मागील बाजूस बेसल सेगमेंटमध्ये त्यांना एक गोष्ट आढळली, ज्याद्वारे तेथे बाहेरील गोष्ट अडकल्याचे स्पष्ट झाले. संबंधित व्यक्तीला या प्रकरणात तज्ज्ञांनी ब्रॉन्कोस्कोपी टेस्ट करण्याचा सल्ला देण्यात आला. डॉ. लिन यांनी आऊटलेटला दिलेल्या माहितीनुसार, प्रक्रियेदरम्यान मला ब्रॉन्कसमध्ये पंख असलेली एखादी गोष्ट स्पष्टपणे दिसली. बाहेरून शरीराच्या आतमध्ये गेलेल्या या गोष्टीवर कफ जमा झाला होता. कफ काढल्यानंतर ही वस्तू झुरळ असल्याचे आढळले. यानंतर काळजीपूर्वक श्वसननलिकेतून झुरळ बाहेर काढण्यात आले आणि शरीराचा तो भागदेखील पूर्णपणे स्वच्छ करण्यात आला. रुग्णाच्या तोंडाला येणारी दुर्गंधीची समस्या लवकरच दूर झाली आणि दुसऱ्या दिवशी त्याला डिस्चार्जही देण्यात आला.

## शतपावली का गरजेची?



केवळ उदरभरण करण्यासाठी किंवा चवीसाठी खाऊ नये, तर आरोग्याचा विचार करून पौष्टिक आहार घ्यावा, हे जसे गरजेचे आहे तसेच जेवणावर आडवा हात मारून लगेचच आडवे होऊ नये, हेही समजून घेणे गरजेचे ठरते. अनेकांना जेवल्यानंतर बसून राहण्याची किंवा पहुडण्याची सवय असते. त्याचे वाईट परिणाम आपल्याला पाहायला मिळतात. जेवल्यानंतर अचानक कोणतेही काम करणे किंवा झोपणे टाळले तसेच जेवल्यानंतर फेरफटका मारण्याची सवय लावल्यास उत्तम. भोजनोत्तर शतपावली करण्याची आपल्याकडे जुन्या काळापासूनच पद्धत आहे. ही पद्धत आरोग्यासाठी अतिशय लाभदायक ठरते. जेवणानंतरच्या अशा शतपावलीचे हे काही लाभ...

**रक्तातील साखर नियंत्रित राहते :** यासंदर्भात अभ्यासात असे म्हटले आहे की, जर जेवल्यानंतर थोडा फेरफटका मारला, तर रक्तातील साखरेची पातळी नियंत्रणात राहते. यासाठी भोजनानंतर किमान ५ मिनिटे चालणे आवश्यक आहे, असे करणे खूप फायदेशीर मानले जाते.

**पचनसंस्था उत्तम राहते :** खाल्ल्यानंतर फेरफटका मारण्याची सवय असेल, तर ते पचनसंस्थेसाठी फायदेशीर ठरू शकते. चालणे पोट आणि आतडे उत्तेजित करते, जे अन्न पचनमार्गातून अधिक जलद हलवण्यास मदत करते.

वजन नियंत्रित राहते : जर तुमचे वजन वाढले असेल, तर तुम्ही वाढलेले वजन व्यवस्थापित करा, यामुळे तुमच्या शरीरातील लठ्ठपणा नियंत्रणात राहतो. १ पौंड कॅलरीज बर्न करण्यासाठी तुम्हाला दररोज ३,५०० कॅलरीज, म्हणजेच ५०० कॅलरीज बर्न कराव्या लागतील. खाल्ल्यानंतर थोडे चालणे चयापचय वाढवू शकते.

**मूड सुधारतो :** जेवणानंतर चालण्याचा व्यायाम केल्यास मूड सुधारतो. अशा हलक्या व्यायामामुळे शरीरातील कॉर्टिसोलसारख्या स्ट्रेस हार्मोन्सची पातळी कमी होण्यास मदत होते. हे एंडोर्फिन आणि ऑक्सिटोसिनदेखील वाढवते, ज्याला लव्ह हार्मोनदेखील म्हणतात. या चालण्याच्या व्यायामाने तुमची झोपेची समस्याही दूर होऊ शकते, असे तज्ज्ञ सांगतात.

## श्वासोच्छवास, फुफ्फुसांच्या विकारांमध्ये वाढ

# शहरातील हवेची गुणवत्ता ढासळली

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पिंपरी :** हिवाळा सुरु झाल्याने थंडी वाढू लागली आहे. शहरावर दाट धुक्याची चादर पसरली जात आहे. त्यातच शहरातील काही भागात प्रदूषणामुळे पिंपरी-चिंचवडची हवा खराब श्रेणीत गेल्याचे दिसून येत आहे. परिणामी पिंपरी-चिंचवडवासियांमध्ये श्वसनसंस्थेच्या आजारांत वाढ झाली आहे.

भोसरी, थेरगाव, पिंपरीसारख्या भागात सकाळी हवा गुणवत्ता निर्देशांक २००-२५० पेक्षा अधिक नोंदविला जात आहे. हवेची गुणवत्ता खराब श्रेणीत गेल्याने श्वासोच्छवास, फुफ्फुसांचे विकार असलेल्या रुग्णांना अनेक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. मात्र, हवा शुद्ध करण्यासाठी महापालिकेकडून विविध उपाययोजना राबविल्या जात असतात. त्या यंत्रणादेखील फेल ठरु लागल्याचे दिसून येत आहे.

पिंपरी-चिंचवड शहरात दिवाळीमध्ये मोठ्या प्रमाणात हवा प्रदूषण वाढल्याचे पाहायला मिळाले होते. फटाक्यांच्या धुरापासून रुग्णांना त्रास झाल्याचे समोर आले होते. परंतु, त्यानंतर वातावरणातील बदल, वाढणारी थंडी आणि अन्य वायू प्रदूषणामुळे पुन्हा शहरातील प्रदुषणाची पातळी वाढली आहे. हवा गुणवत्ता निर्देशांक ५० पर्यंत असणे आवश्यक आहे. त्यापेक्षा अधिक प्रदूषण वाढल्यास त्याचे आरोग्यावर परिणाम होतात. शहरातील काही भागात मागील काही दिवसात सकाळी हवा गुणवत्ता निर्देशांक (एक्यूआय) १५० ते ३०० च्या जवळपास नोंदवला गेला. यामध्ये भोसरीतील खंडेवस्ती येथे २७९, थेरगाव परिसरात ३०६, पिंपरी कॉलनी परिसरात २३९, तर वाकडमध्ये १५३ असल्याचे दिसून आले.

खराब श्रेणीत पोहोचलेली शहराची हवा शहरवासियांच्या आरोग्यावर परिणामकारक ठरत आहे. त्यातून श्वसनविकाराचा धोका वाढत आहे. तसेच, अस्थमा, सीओपीडी, इतर फुफ्फुसांच्या विकार असलेल्या रुग्णांना याचा मोठा त्रास होतो. या दिवसांमध्ये श्वसनविकाराच्या रुग्णांनी योग्य काळजी घ्यावी. तसेच, लक्षणे वाढताच तातडीने डॉक्टरांचा सल्ला घेण्याचे आवाहन वैद्यकीय तज्ज्ञांकडून केले जात आहे. हवा प्रदूषण कमी करण्यास महापालिका प्रशासन अपयशी ठरत असून केलेल्या उपाययोजना नावालाच असल्याचा आरोप पर्यावरणप्रेमींकडून होत आहे.

### श्वसनाच्या रुग्णांमध्ये सतत वाढ

● महापालिका वैद्यकीय विभागाकडील सलग तीन वर्षांच्या आकडेवारीवरून शहरात प्रदूषणामुळे श्वसनाच्या रुग्णसंख्येत सतत भर पडत असल्याचे दिसून येते. २०२०-२१ या वर्षात अशा विकारांचे फक्त ३६१ रुग्ण होते. दुसऱ्याच वर्षी २०२१-२२ तीनपट वाढ होऊन १,३०१, तर २०२२-२३ मध्ये ही रुग्णसंख्या २,३२१ पर्यंत पोहोचली. सतत वाढणाऱ्या प्रदूषामुळे यात आणखी वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

### हवा गुणवत्ता निर्देशांक - प्रकार

- ०-५० - चांगला
- ५१-१०० - समाधानकारक
- १०१-२०० - मध्यम प्रदूषित
- २०१-३०० - खराब
- ३०१-४०० - अत्यंत खराब
- ४०१ - गंभीर

> थंडी आणि अन्य वायुप्रदूषणामुळे श्वसन विकाराचा धोका वाढतो. दम्याच्या रुग्णांसह या दिवसांमध्ये सामान्य नागरिकांना काळजी घ्यावी. बाहेर पडताना मास्कचा वापर करावा. श्वसनाशी संबधित आजारांचा प्रतिकार करण्यासाठी योग्य आहाराचे संतुलन ठेवणे गरजेचे आहे.
>
> - डॉ. शिवाजी ढगे, सहायक आरोग्य वैद्यकीय अधिकारी, पिंपरी-चिंचवड महापालिका

राष्ट्रसंचार थंडीची लाट... रा

## पिंपरी चिंचवड गारठले! शहरातील तापमानात घट

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड परिसरात गारवा वाढण्यास सुरुवात झाली आहे. शहरातील बहुतांश भागाचे किमान तापमान ११ ते १२ अंशावर आले होते. दरम्यान आगामी दोन ते तीन दिवसांत जिल्ह्याचे तापमान आणखी कमी होईल असा अंदाज हवामान विभागाने दिला आहे. नोव्हेंबर महिन्यातील पहिले पंधरा दिवस जिल्ह्यात कुठेही थंडी जाणवली नाही. कारण ढगाळ वातावरणासह काही भागात पाऊस झाला.मात्र गत बारा तासांत वातावरणात बदल झाला अन थंडी पडण्यास सुरुवात झाली आहे. उत्तर भारतातून शहरात शीत लहरी येत असल्याने गारठा वाढत आहे.

पिंपरी चिंचवडमध्ये सकाळी चहुबाजूंनी धुक्याची चादर पसरली होती. या धुक्यात इमारती अक्षरशः हरवून गेल्या. ढग जमिनीवर अवतरल्याची परिस्थिती निर्माण झाली होती. जणू जम्मू काश्मीरचा निसर्ग शहरात अवतरला होता. शहरवासीयांना यंदाच्या मोसमात गुलाबी थंडीची चाहूल पहिल्यांदाच अनुभवता आली. ग्रामीण भागात ही धुक्यामुळं कमालीची थंडी पसरलेली आहे. दरम्यान, देशाच्या उत्तर भागात असलेल्या थंडीच्या लाटेचा परिणाम राज्यावर, विशेषत: उत्तर भागावर होऊ लागला असून अनेक जिल्ह्यांमध्ये तापमानात लक्षणीय घट झाली आहे. येत्या काही दिवसांत राज्याच्या उत्तर भागात तापमानात एक ते दोन अंश सेल्सिअसची घसरण होणार असून तापमान ७ ते ८ अंश सेल्सिअसराहील, असा अंदाज हवामान खात्याच्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.



## जीवनगौरव...

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**पिंपरी :** बाबा भारती यांच्या जन्मशताब्दीनिमित्त वार्षिक शब्दोत्सवाच्या सहाव्या उपक्रमांतर्गत ज्ञानदीप विद्यालयाचे निवृत्त प्राचार्य सूर्यकांत भसे यांना लोकशिक्षक बाबा भारती जीवनगौरव सन्मान प्रदान करून गौरविण्यात आले.

## बाबा भारती प्रतिष्ठानतर्फे पुरस्कार सोहळ्याचे आयोजन

# युद्धखोर जगाला शांततेच्या संदेशाची गरज!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** "युद्धखोर जगाला शांततेच्या संदेशाची गरज असून बौद्ध, महावीर आणि गांधींची भूमी हा संदेश देऊ शकते!" असे विचार ८९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष प्रा. डॉ. श्रीपाल सबनीस यांनी ज्ञानदीप विद्यालय, रूपीनगर, तळवडे येथे बुधवार, दिनांक २७ नोव्हेंबर २०२४ रोजी व्यक्त केले. लोकशिक्षक बाबा भारती प्रतिष्ठान आयोजित पुरस्कार प्रदान सोहळ्यात प्रा. डॉ. श्रीपाल सबनीस बोलत होते. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील पाली विभागप्रमुख डॉ. महेश देवकर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते; तसेच कृषिभूषण सुदाम भोरे, रूपीनगर शिक्षण मंडळाचे कार्याध्यक्ष सुधाकर दळवी, लोकशिक्षक बाबा भारती प्रतिष्ठानचे अध्यक्ष महेंद्र भारती यांची प्रमुख उपस्थिती होती.

पाली - मराठी भाषेचे पहिले शब्दकोशकार बाबा भारती यांच्या जन्मशताब्दीनिमित्त वार्षिक शब्दोत्सवाच्या सहाव्या उपक्रमांतर्गत ज्ञानदीप विद्यालयाचे निवृत्त प्राचार्य सूर्यकांत भसे यांना लोकशिक्षक बाबा भारती जीवनगौरव सन्मान प्रदान करून गौरविण्यात आले. त्याचबरोबर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील पाली विभागातील डॉ. लता देवकर (लोकशिक्षक बाबा भारती पाली भाषा पुरस्कार), पिंपरी - चिंचवड महापालिका शाळा मुख्याध्यापक श्रीकांत चौगुले (लोकशिक्षक बाबा भारती शिक्षकप्रतिभा पुरस्कार), ज्येष्ठ पत्रकार नारायण बडगुजर (लोकशिक्षक बाबा भारती उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार), कवयित्री सविता इंगळे (लोकशिक्षक बाबा भारती काव्यप्रतिभा पुरस्कार), लेखक प्रभाकर वाघोले (लोकशिक्षक बाबा भारती साहित्य पुरस्कार) यांना सन्मानित करण्यात आले.

पुरस्काराला उत्तर देताना सूर्यकांत भसे यांनी, "कामगारांनी कामगारांच्या मुलांसाठी सुरू केलेल्या शिक्षण संस्थेत दीर्घकाळ काम करायला मिळाले याचा आनंद आहे. बहुजनांची मुले शिकली पाहिजेत हे संस्थेचे धोरण असल्याने हा पुरस्कार शाळेचा आहे!" अशी भावना व्यक्त केली.

# महापालिका आणि बीव्हीजी यांच्यात सामंजस्य करार



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चिंचवड :** पिंपरी चिंचवड महानगरपालिका औद्योगिक प्रशिक्षण विभाग आणि बीव्हीजी इंडिया लिमिटेड यांच्यावतीने शैक्षणिक व रोजगारासाठीचा सामंजस्य करार करण्यात आला. यावेळी महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त चंद्रकांत इंदलकर, औद्योगिक प्रशिक्षण विभागाचे प्राचार्य शशिकांत पाटिल, बीव्हीजी इंडीया लिमिटेड अप्रेंटिसशिप विभागाचे प्रमुख रवी घाटे, अप्रेन्टिस व्यवसाय विकास प्रमुख प्रमोद पवार हे यावेळी उपस्थित होते.

ख्यातनाम उद्योजक हणमंतराव गायकवाड यांच्या बीव्हीजी उद्योगसमूहामध्ये सध्या ९२,००० पेक्षा जास्त कर्मचारी काम करत असून ग्रुप विविध क्षेत्रात कार्यरत आहेत. पिंपरी-चिंचवड शहर तसेच परिसरातील शहरांमधील आस्थापनांना कुशल मनुष्यबळाची आवश्यकता असते. हा विचार करून आस्थापनांना कुशल मनुष्यबळ उपलब्ध व्हावे व त्यामाध्यमातून मोठ्या प्रमाणात शैक्षणिक व रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी महापालिका आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली शैक्षणिक तांत्रिक धोरण ठरविण्यात आले असून त्यानुसार सदर सामंजस्य करार करण्यात आला आहे.

महापालिकेचा औद्योगिक प्रशिक्षण विभागच्या माध्यमातून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना, विशेषत: हॉस्पिटल हाऊसकीपिंग ट्रेडच्या विद्यार्थ्यांना, एक्सपर्ट फॅकल्टी प्रोग्राम तसेच ऑन जॉब ट्रेनिंग प्रोग्रामही बीव्हीजी इंडिया लिमिटेडच्या माध्यमातून उपलब्ध होणार आहे. तसेच बीव्हीजीच्या माध्यमातून एनएसडीसी प्रमाणित अद्यावत स्किल कोर्सेस तसेच उच्च शिक्षणाची संधी मिळणार आहे. त्यामुळे परदेशातही नोकरीच्या संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न होणार आहे.

## औद्योगिक गुणवत्ता स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**भोसरी :** भोसरीतील क्वालिटी सर्कल एक्सलन्स सेंटरमध्ये क्वालिटी सर्कल फोरम ऑफ इंडिया, पुणे चॅप्टरने 'औद्योगिक गुणवत्ता स्पर्धा २०२४' आयोजित करून गुणवत्ता महिना साजरा केला. या उपक्रमाचे हे ११वे वर्षे होते. यात ३५ संस्थांमधील ३०७ सदस्य सहभागी झाले होते. तसेच एकूण १४८ संघांचा समावेश होता.

स्पर्धेचे उद्घाटन टाटा ऑटोकॉम्प सिस्टीम कोम्पोजिट डिव्हिजन ४ प्लांटचे सीनियर जनरल मॅनेजर-ऑपरेशन्स मुख्य सरबजीत सिंग भोगल यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून झाले. या स्पर्धेत सहभागी संघांनी ६९ केस स्टडी, ३ स्किट, ३८ पोस्टर्स आणि ३८ घोषवाक्य सादर केले. यावेळी क्वालिटी सर्कल फोरम ऑफ इंडियाच्या, पुणे चॅप्टरच्या अध्यक्षा डॉ. रजनी इंदुलकर, काउंन्सिल सदस्य अनंत क्षीरसागर, भूपेश मॉल, विजया रुमाले आदी उपस्थित होते.

समारोप सत्राचे प्रमुख पाहुणे मॅक्सियन व्हील्स इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक राहुल वैद्य यांचा अनंत क्षीरसागर यांनी स्मृतीचिन्ह देऊन सन्मान केला.

## ७५० कोटी रुपयांची अर्थसंकल्पात तरतूद

# उद्योगनगरीला मिळणार विकासाची गती

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहराचा झपाट्याने विकास होत आहे. शहरात राहायला येणाऱ्यांची संख्या वाढत आहे. परिणामी, अनेक प्रश्न, समस्या निर्माण होत आहेत. त्यावर कायमस्वरूपी उपाययोजना केल्या जात आहेत. विकसनशील भागातील प्रश्न सोडवत टप्याटप्याने विकासकामे करावी लागतात. विकास आराखड्यातील रस्ते विकासासाठी ७५० कोटी रुपयांची अर्थसंकल्पात तरतूद केली आहे. चऱ्होली-मोशी, वाकड-ताथवडे भागातील ४५ रस्त्यांची कामे हाती घेतली आहेत. पुढील २५-३० वर्षांचा विचार करून व आरक्षणे ताब्यात घेऊन कामे केली जाणार आहेत.



प्रत्येक प्रभागात आरोग्य, वैद्यकीय, क्रीडा सुविधा व उद्यान विकसित करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. लष्कराच्या मोकळ्या जागेत वृक्षारोपण केले जात असून, सर्वात मोठा ग्रीनझोन निर्माण होईल. अर्धवट डीपी रस्ते, लोहमार्ग व नद्यांवर पूल उभारण्याचे नियोजन आहे.

बांधकाम व्यावसायिकांनी दर्जेदार प्रकल्प उभारून नागरिकांना सुविधा द्याव्यात, यावर भर दिला आहे. यापुढील काळात बांधकाम परवाने ऑनलाइन करण्यात येणार आहेत. शहरातील इंद्रायणी, पवना व मुळा या तीनही नद्यांच्या कडेचे रस्ते विकसित करणार आहे.

> पिंपरी-चिंचवड शहरातील चऱ्होली, डुडुळगाव, मोशीसह शहराच्या विकास आराखड्यातील (डीपी) सर्व रस्ते विकसित करण्याचे आमचे उद्दिष्ट आहे. त्याची कार्यवाही सुरू केली आहे. चऱ्होली परिसरात काही रस्त्यांची कामे सुरू आहेत. जे रस्ते झाले आहेत, त्यातील रखडलेली किरकोळ कामे पूर्ण करून परिसरातील कनेक्टिव्हिटी वाढविणार आहोत. त्यामुळे नागरिकांना पायाभूत सुविधा मिळणार असून, शहर विकासाला गती मिळणार आहे.
>
> - शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, महापालिका

#रा

## » Selected

### महात्मा फुले स्मृती दिनानिमित्त पालिकेतर्फे प्रबोधन पर्व

**पिंपरी :** क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या स्मृतीदिनानिमित्त गुरुवारी (ता. २८) महापालिकेच्या वतीने विविध प्रबोधनात्मक



कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. गुरुवारी सकाळी साडे दहा वाजता महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय भवनात महात्मा ज्योतिराव फुले यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. त्यानंतर सकाळी पावणे अकरा वाजता क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाचे उद्घाटन आयुक्त सिंह यांच्या हस्ते झाले. सकाळी सव्वा अकरा वाजता 'मी ज्योतिराव फुले बोलतोय' हा एकपात्री नाट्यप्रयोग सुप्रसिद्ध अभिनेते कुमार आहेर यांनी सादर केला. दुपारी बारा वाजता शाहीर सुदेश कांबळे आणि सुप्रसिद्ध गायिका साधना मेश्राम यांचा महात्मा फुले यांच्या जीवनावर आधारित गीत गायन कार्यक्रम संपन्न झाला. 'सलाम क्रांतिसूर्याला' हा महात्मा फुले यांच्या जीवनकार्यावर आधारित सांस्कृतिक कार्यक्रम बाळासाहेब निकाळजे आणि त्यांचे सहकारी सादर केला. दुपारी तीन वाजता संगीत विशारद प्रज्ञा इंगळे यांचा प्रबोधनात्मक गीत गायनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

### शहरातील विविध संस्थामध्ये संविधान दिन उत्साहात साजरा



**पिंपरी :** भारतीय राज्यघटनेच्या (संविधान) दिनानिमित्त विविध संस्था, संघटना, सरकारी कार्यालये आणि शाळांमध्ये संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. तसेच, शहरात जनजागृतीपर कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. कै श्रीमती कोंडाबाई गोलांडे प्राथमिक विद्यालय चिंचवड येथे संविधानदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात मुख्याध्यापिका उज्वला चौधरी या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या. विद्या सोनवणे यांनी सूत्रसंचालन केले. या कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी संविधानाची गरज, निर्मिती व महत्त्व भाषणातून अधोरेखित केले. संविधानाचे सामूहिक वाचन करण्यात आले.

### आदित्य बिर्ला मेमोरियलमध्ये अत्याधुनिक ऑपरेशन थिएटर

**पिंपरी:** आदित्य बिर्ला मेमोरियल हॉस्पिटलने आज आपले अत्याधुनिक हाय-टेक ऑपरेशन थिएटर (OT) कॉम्प्लेक्सचे



उद्घाटन केले, जे जागतिक दर्जाच्या आरोग्यसेवा प्रदान करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे. या अत्याधुनिक सुविधेचे उद्घाटन सौ. राजश्री बिर्ला, अध्यक्षा, आदित्य बिर्ला फाऊंडेशन, तसेच श्री. के.के. महेश्वरी, संचालक, आदित्य बिर्ला ग्रुप यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. नवीन सहा ऑपरेशन थिएटरच्या समावेशामुळे आता आदित्य बिर्ला मेमोरियल हॉस्पिटलमध्ये एकूण १५ ऑपरेशन थिएटर ( OT )उपलब्ध आहेत. ही सुविधा प्रगत शस्त्रक्रिया प्रक्रियांसाठी वाढत्या मागणीला प्रतिसाद देण्यासाठी तयार करण्यात आली आहे.

### आर्थिक नुकसानीच्या कारणावरून एकाचा खून, गुन्हा दाखल

**पिंपरी :** आर्थिक नुकसानीचा राग मनात धरून एका व्यावसायिकाने घराशेजारीच राहत असलेल्या व्यक्तीचा भर दुपारी कुऱ्हाडीने वार करून खून केला. त्यानंतर रक्ताने माखलेली कुऱ्हाड हाती घेऊन पिंपरी पोलीस ठाणे गाठत आपण खून केल्याचे त्याने पोलिसांना सांगितले. पिंपरी कॅम्पातील गेलार्ड चौकात ही घटना घडली. त्यामुळे पिंपरी-चिंचवड शहरात एकच खळबळ उडाली. महेश सुंदरदास मोटवाणी (४६, रा. गेलार्ड चौक, पिंपरी), असे खून झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. त्यांच्या पत्नीने याप्रकरणी पिंपरी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली.

## महापालिका आयोजित परिसंवादात वक्त्यांचा सूर

# भारतीय संविधान हा मानवतेचा जाहीरनामा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पिंपरी :** जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेल्या भारताचे प्रदीर्घ आणि सर्वंकष संविधान हा केवळ नियम कायद्यांचा संच नसून स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय या मानवी मूल्यांना प्रवर्धित करणारा मानवतेचा जाहिरनामा आहे, असा सुर महापालिकेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या परिसंवादामध्ये सहभागी वक्त्यांकडून व्यक्त करण्यात आला.

भारतीय संविधान दिनानिमित्त पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने आयुक्त शेखर सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली दि.२६ आणि २७ नोव्हेंबर २०२४ रोजी दोन दिवसीय प्रबोधनात्मक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानिमित्ताने दि. २६ रोजी सायंकाळच्या सत्रात "भारतीय संविधानाला अभिप्रेत समाजव्यवस्था" या विषयावर आधारित परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. या परिसंवादामध्ये नाट्य लेखक,दिग्दर्शक, कलावंत प्रा. दिलीप महालिंगे, प्रा.डॉ.अर्चना जगतकर, राईट टू लव चळवळीचे कार्यकर्ते के.अभिजित, विद्यार्थी कार्यकर्ते मुकुल निकाळजे हे वक्ते प्रत्यक्ष सहभागी झाले , तर शिकागो येथील संशोधक डॉ.मौलिकराज, गांधीनगर गुजरात येथील सामाजिक शास्त्राचे अभ्यासक डॉ.अविनाश तायडे आणि दिल्ली येथून प्रा.डॉ.प्रज्ञा जाधव हे वक्ते दुरदृश्य प्रणालीद्वारे (ऑनलाईन) सहभागी झाले होते. यावेळी महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे सदस्य ॲड. गोरक्ष लोखंडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, माजी नगरसेवक मारुती भापकर, निवृत्त अभियंता अनिल सूर्यवंशी, कामगार नेते निवृत्ती आरवडे, तुकाराम गायकवाड, गणेश भोसले, सामाजिक कार्यकर्ते संतोष जोगदंड, प्रकाश बुक्तर, राजेंद्र पवार, महापालिकेचे कर्मचारी यांच्यासह नागरिक उपस्थित होते.


भारतीय संविधानाची निर्मिती होत असताना घटनाकारांपुढे विषमता, विविधता, दारिद्र्य, बेरोजगारी, निरक्षरता, साक्षरता, संसाधनांची उपलब्धता असे अनेक विषय आणि त्याबाबतचे प्रश्न उभे होते. त्यातून घटनाकारांनी आपल्या देशात आदर्श समाजव्यवस्था निर्माण करण्यासाठी स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय या मानवी मुल्यांचा घटनेत अंतर्भाव केला आहे. विवेकी व वैज्ञानिक दृष्टीकोन बाळगणारा ,विषमता विरहित, प्रेम आणि बंधुता या मानवी मुल्यांवर आधारित समाजाची निर्मिती करण्यासाठी निर्मिलेले भारतीय संविधान हा केवळ कायद्यांचा संच नसून समस्त कल्याणकारी मानवतेचा जाहिरनामा होय, असा विचार परिसंवादातील वक्त्यांनी मांडला.

भारतीय संविधान सर्व जाती, धर्म, भाषा, लिंग, किंवा कोणत्याही प्रकारच्या भेदभावाशिवाय प्रत्येक व्यक्तीला समान अधिकार देते. हे मानवतेच्या सर्वसमावेशकतेच्या तत्त्वाची मूर्त प्रतिमा आहे. त्यामुळे आपल्या संविधानामध्ये देशातील सर्व घटकांचे प्रतिबिंब आढळते, असे प्रतिपादन प्रा.दिलीप महालिंगे यांनी केले.

मानवता हा संविधानाचा गाभा असून देशातील सर्व समाजाला सामावून घेण्याचे कार्य भारतीय संविधानाने केले आहे. जीवन जगण्याची अनेक पद्धतींपैकी भारतीय संविधान ही एक जीवनपद्धती असल्याचे मत प्रा.डॉ.अर्चना जगतकर याने केले. घराणेशाही, गुंडगिरी आणि बेबंदशाही ही आपल्या ऱ्हासाची कारणे असून आपण विवेकवाद जोपासून संविधानाचे रक्षण केले पाहिजे, असे त्या म्हणाल्या.

» Selected

## लोहगडला जागतिक वारसा स्थळाचा दर्जा देण्याची मागणी



**मावळ :** छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाच्या ३५० व्या वर्षानिमित्त बारा शिवकालीन गडकिल्ल्यांना जागतिक वारसा स्थळाचा दर्जा मिळावा, असा प्रस्ताव भारत सरकारने युनेस्कोला पाठवला आहे. त्यात मावळ तालुक्यातील लोहगड किल्ल्याचा समावेश असल्याने शिवप्रेमींनी आनंद व्यक्त केला आहे. लोहगडाचा जागतिक वारसा स्थळाच्या यादीत समावेश झाल्यानंतर जगभरातील पर्यटक येथे भेटी देतील व मावळच्या इतिहासाची जगाला ओळख होईल. जागतिक वारसा स्थळांच्या यादीसाठी भारतातर्फे २०२४-२५ साठी सादर होणाऱ्या प्रस्तावात महाराष्ट्रातले नऊ गिरीदुर्ग व तीन जलदुर्ग अशा बारा गडकोटांना नामांकन देण्यात आले आहे. त्यामुळे छत्रपती शिवरायांचा इतिहास, त्यांनी केलेला पराक्रम, लष्करीदृष्ट्या केलेली गडकोटांची बांधणी याची दखल आता जागतिक स्तरावर घेतली जावी यासाठी केंद्राने एक पाऊल पुढे टाकले आहे. वारसा स्थळाच्या नामांकनासाठी शिवछत्रपतींचे जन्मस्थळ शिवनेरीसह, स्वराज्याची पहिली राजधानी राजगड, द्वितीय राजधानी रायगडसह साल्हेर, लोहगड, खांदेरी, प्रतापगड, सुवर्णदुर्ग, पन्हाळा, सिंधुदुर्ग आणि विजयदुर्ग त्याचबरोबर तामिळनाडूतील जिंजी या किल्ल्याचा समावेश आहे.

# संरक्षण दलातील निवृत्तीवेतनधारक आणि बँक ऑफ बडोदा यांच्यात सामंजस्य करार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**पिंपरी :** इंडियन एक्स - सर्व्हिसेस लीग (पुणे जिल्हा) आणि बँक ऑफ बडोदा यांच्या वतीने संरक्षण दलातील निवृत्ती वेतनधारकांसाठी संत ज्ञानेश्वर उद्यान, पेठ क्रमांक २८, आकुर्डी प्राधिकरण येथे गुरुवार, दिनांक २८ नोव्हेंबर २०२४ रोजी सामंजस्य करार करण्यात आला. याप्रसंगी बँक ऑफ बडोदा पुणे विभागीय महाव्यवस्थापक कविता सिंह, उपव्यवस्थापक (व्यवसाय विकास) जयंत पट्टजोशी, विभागीय व्यवस्थापक शब्बीर मेहसानिया, संरक्षण विभाग बँकिंग सल्लागार निवृत्त ब्रिगेडियर डॉ. संजीव देवस्थळी, इंडियन एक्स - सर्व्हिसेस लीगचे अध्यक्ष वाय. एस. महाडिक, सचिव डी. एच. कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी कविता सिंह यांनी आपल्या मनोगतातून, "दिवसरात्र दक्ष राहून आणि डोळ्यात तेल घालून प्रत्येक भारतीय नागरिकाच्या संरक्षण सेवेचे कर्तव्य तिन्ही दलाकडून चोखपणे पार पाडले जाते. या कार्याप्रति अभिवादन करण्यासाठी अन् कृतज्ञता व्यक्त करण्याची संधी म्हणून बँक ऑफ बडोदा आणि इंडियन एक्स - सर्व्हिसेस लीग यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला आहे.

सर्व प्रकारच्या बँकिंग सेवेसाठी आम्ही सदैव कटिबद्ध आहोत!" अशी भावना व्यक्त केली. डी. एच. कुलकर्णी यांनी स्वागतपर मनोगत व्यक्त केले.

# हरिनामाच्या जयघोषात दुमदुमली पवनानगरी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पिंपरी :** पवना विद्या मंदिर संकल्प इंग्लिश स्कूलच्यावतीने कार्तिकी महाएकादशी व आळंदी यात्रेनिमित्त आयोजित दिंडी सोहळ्याने पवनानगरीला भक्तिमय आळंदीचे स्वरूप आले होते. सुमारे एक हजार विद्यार्थी व शिक्षक वारकऱ्यांची वेषभूषा करून दिंडीत सहभागी झाले होते, तर संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत तुकाराम, संत मुक्ताबाई यांच्या वेशभूषा परिधान करून हरिनामाच्या जयघोषात पालखी मिरवणूक काढली होती.

या वेळी काले पवनानगरचे सरपंच खंडुजी कालेकर, ज्ञानेश्वर ठाकर, संकल्प शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक सचिव लक्ष्मण भालेराव, उपाध्यक्ष पोपट कालेकर, संचालक डॉ. संजय चौधरी, मुख्याध्यापक राहुल सोनवणे, ज्ञानेश्वर कालेकर, रघुनाथ आढाव, चिंधू कालेकर, कानिफनाथ कालेकर, हरिश्चंद्र कालेकर, कांती देशमुख यांच्यासह अनेक माजी विद्यार्थी उपस्थित होते.

दिंडी शाळेतून निघाल्यानंतर पवनानगर पाटबंधारे वसाहत येथून पवनानगर चौक, काले गावातील विठ्ठल रुक्मिणी मंदिरापर्यंत गेली. यामध्ये भजन पथकाबरोबरच लेझीम पथक, वृक्ष दिंडी, ग्रंथ दिंडी, पर्यावरण दिंडी यांचाही समावेश होता. यादरम्यान, १५० विद्यार्थिनींनी टाळांच्या ठेक्यात नादब्रह्म व संतांचा जीवनपट सादर केला. या आवाजाने पवनानगर परिसर दुमदुमून गेला होता. या पथकांनी पवनानगर चौकात प्रात्यक्षिके दाखवून नागरिकांची दाद मिळविली. अनेक ठिकाणी दिंडीचे जोरदार स्वागत करण्यात आले. महिलांनी जागोजागी पालखीची ओवाळणी करून पूजन केले. अनेक ठिकाणचे ग्रामस्थ व शिक्षक सांप्रदायिक खेळ, फुगडी खेळत दिंडीत सहभागी झाले होते. त्यामुळे पवनानगरला आळंदीचे स्वरूप प्राप्त झाले होते. हा सोहळा पाहण्यासाठी परिसरातील नागरिकांनी गर्दी केली होती.

या वेळी पवनानगर व्यापारी मित्र मंडळ, मार्च १९९९-२००० बॅच यांनी पवनानगर चौकात महाआरती आयोजित केली होती. या वेळी दुर्गामाता मित्र मंडळ पाटबंधारे वसाहत, दुर्गामाता मित्र मंडळांना विद्यार्थ्यांना खाऊ व फराळाचे वाटप केले.

पान १ वरून

## मुख्यमंत्री पुण्याचा ?

याशिवाय चंद्रकांतदादा पाटील, राधाकृष्ण विखे पाटील यांचीही नावे घेतली जात आहेत. मुख्यमंत्रिपदाप्रमाणेच मंत्र्यांसाठीही काही अपवाद वगळता वयाचा निकष लावण्याची चर्चा सुरू असून, इच्छुकांचे धाबे दणाणले आहेत.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांची केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याबरोबर भेट होण्याअगोदर भाजपचे राष्ट्रीय महासचिव विनोद तावडे आणि शाह यांच्यात खलबते झाली. राज्यात गेल्या वर्षीच्या सप्टेंबरपासून मराठा आंदोलन अधिक तीव्र झाले. मनोज जरांगे यांच्या नेतृत्वात आरक्षणाची लढाई गाजली. त्यांच्या उपोषणामुळे सरकारने अनेकदा नमते घेतले, तरीही जरांगे यांचा भाजप आणि फडणवीस यांच्यावरील रोष कमी झाला नाही. त्यांनी आता सरकार स्थापन झाल्यानंतर मराठा आरक्षणासाठी उपोषणाचा इशारा दिला आहे.

## दिव्यांग शिक्षक भरतीत कोट्यावधींचा घोटाळा

गंभीर दखल घेऊन त्याची चौकशी करण्याचे आदेश जिल्हा परिषद प्रशासनाला देण्यात आले आहेत, त्यासाठी तीन सदस्यीय समितीची नियुक्ती करण्यात आली असून त्याचा अहवाल महिनाभरात सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. अनुदानित शाळा आणि कर्मशाळांनी त्यांच्याकडे शिक्षकांची भरती करताना दिव्यागांसाठी पन्नास टक्के जागा राखीव ठेवाव्यात, असा नियम खुद्द न्यायालयानेच तयार केला आहे. त्यानुसार राज्य शासनाच्या वतीने २०१६ मध्ये शाळा संहिता आणि दिव्यांग हक्क तयार करण्यात आला असून या भरतीसाठी नियमावली तयार करण्यात आली आहे. त्यानुसार या पदांची भरती करताना या नियमांचे पालन करणे आवश्यक असते, विशेष म्हणजे या नियमांचे उल्लघंन झाल्यास त्या शाळांचे अनुदान रद्द करण्याचा आणि प्रसंगी मान्यताही रद्द करण्याचा अधिकारही शासनाला देण्यात आला आहे.

## नॅशनल बुक ट्रस्टचे कार्यालय पुण्यात होणार

मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते गुरवारी करण्यात आले. यावेळी महोत्सवाचे आयोजक राजेश पांडे , खासदार प्रा. मेधा कुलकर्णी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कुलगुरू सुरेश गोसावी, प्र - कुलगुरू पराग काळकर, एनबीटी संचालक युवराज मलिक, अध्यक्ष मिलिंद मराठे, उद्योजक कृष्णकुमार गोयल, डीक्कीचे अध्यक्ष मिलिंद कांबळे, डीईएस अध्यक्ष प्रमोद रावत, उपाध्यक्ष अशोक पलांडे, जेष्ठ संपादक किरण ठाकूर, भाजप नेते माधव भंडारी, खासदार मेधा कुलकर्णी, युवा सेना नेते किरण साळी, कुमार शंकर, सोमनाथ पाटील, प्रसेनजित फडणवीस, फर्ग्युसन महाविद्यालय प्राचार्य डॉ. विजय तडके, आरपीआय नेते मंदार जोशी, सुशील जाधव उपस्थित होते.

## कोयता गँगची दहशत सुरूच; एकाचा खून

सतीश सुदाम थोपटे हा जमीन खरेदी विक्रीचे व्यवहार करत होता.

त्याच्यावर हवेली पोलीस ठाण्यात गोळीबार केल्याचा गुन्हा देखील दाखल होता. सतीश थोपटे हा बुधवारी दुपारी कोल्हेवाडी भागात आला होता. यावेळी काही जणांनी त्याच्यावर अचानक कोयत्याने हल्ला केला. सतीश थोपटेवर अनेक वार करण्यात आले. यामुळे तो गंभीर जखमी झाला. त्याला तातडीने स्थानिकांनी दवाखान्यात नेले. मात्र, त्याचा मृत्यू झाला होता. या घटनेची माहिती पोलिसांना मिळाली. त्यांनी तातडीने घटनास्थळ गाठले. पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

## २३ डिसेंबर पर्यंत हिशोब द्या !

खर्च निरीक्षकांकडे आल्यानंतर त्यांच्याकडून तपासणी करण्यात येते. त्या तपासणीमध्ये प्रशासनाकडील खर्चानुसार, उमेदवाराच्या खर्चात काही फरक आढळल्यास त्याबाबत उमेदवाराकडे विचारणा केली जाते. त्याबाबत नोटीस जारी केली जाते. त्या संदर्भात उमेदवाराने खुलासा दिल्यास तो समाधानकारक असल्यास त्यांची बाजू ग्राह्य धरली जाते. खुलासा समाधानकारक नसल्यास त्यांच्याकडे पुन्हा विचारणा होण्याची शक्यता असते. त्या उमेदवारालाही 'जिल्हा समिती'कडे दाद मागता येते.

# झेप्टोची पार्क प्लसशी भागीदारी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

zepto

**पिंपरी :** त्वरित डिलीव्हरीसाठी ख्यातनाम असलेल्या भारतातील सर्वाधिक वेगाने वाढणाऱ्या ग्राहक इंटरनेट ब्रँड झेप्टोने सर्व कार केअर उत्पादनांसाठी हक्काची जागा असलेल्या पार्क प्लस शी हातमिळवणी केली आहे. या अंतर्गत संपूर्ण भारतात आठपेक्षा अधिक ठिकाणी ११ पार्क प्लस कार केअर उत्पादने झेप्टोवर उपलब्ध होणार आहेत. या पहिल्याच प्रकारच्या उपक्रमामुळे क्लिनिंग किट्स, कम्फर्ट ॲक्सेसरीज आणि मेंटेनन्स अवजारांसारख्या उच्च दर्जाच्या उत्पादनांच्या शोधात असलेल्या कारमालकांसाठी नवे अनुभव खुले होणार आहेत.

भारतीय रस्त्यावर ५ कोटींपेक्षा अधिक खासगी कार धावत आहेत, त्यामुळे उंची (प्रीमियम) कार केअर उत्पादनांची मागणी प्रचंड प्रमाणात वाढली आहे. त्वरेने होणाऱ्या ई-कॉमर्समुळे भारतीय कार मालकांना अशा उत्पादनांसाठी अधिक सुलभता आणि डिलीव्हरीची अपेक्षा असते. झेप्टो आणि पार्क प्लस हे सुलभ आणि किफायती अशी कार केअर उत्पादने उपलब्ध करून देण्यासाठी हातात हात घालून काम करत आहेत.

झेप्टो वर पार्क प्लस उत्पादनांची पडलेली भर ही अतुलनीय सोयी आणि वेगासह निवडक दैनंदिन जीवनावश्यक वस्तू उपलब्ध करून देण्याच्या कंपनीचे समर्पण अधोरेखित होते.झेप्टोच्या सेवा क्षेत्रातील कार मालक आता प्रीमियम कार केअर वस्तू सहजपणे मिळवू शकतील व त्या त्यांच्या दारापर्यंत त्वरेने आणि विना कटकट वितरित केल्या जातील.

झेप्टोचे मुख्य चीफ अधिकारी चंदन मेंडिरट्टा म्हणाले, पार्क प्लस ची उच्च दर्जाची कार केअर उत्पादने थेट ग्राहकांच्या उंबरठ्यापर्यंत आणण्यासाठी सहयोग करताना आम्हाला आनंद होत आहे. वेग आणि सुविधा ही झेप्टोच्या केंद्रस्थानी असून या भागीदारीमुळे आम्हाला कार देखभालीच्या अत्यावश्यक वस्तूंचा समावेश करून आमच्या उत्पादनांची मालिका विस्तार करता येईल. हे शक्य केल्याबद्दल आम्ही आमच्या विक्रेत्यांचे आभार मानतो.

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहिर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टमध्ये नमूद केलेली मिळकत ही **श्री. गौरव अरुण म्हाळगी आणि श्री. अरुण दत्तात्रय म्हाळगी, दोघे रा. रवीशिल्प, प्लॉट नंबर- ४२, सहवास सोसायटी, पुणे - ४११०५२** यांची खरेदी मालकी वहिवाटीची होती व आहे. विद्यमान मालक यांनी सदर मिळकत एन.आर. केशवन व आशा केशवन यांचेकडुन खरेदीखत दस्त क्र. ३३६४/२०१५ दिनांक २६/०४/२०१५ अन्वये खरेदी घेतलेली असून सदर मिळकतीवर एचडीएफसी बँक लिमिटेड या वित्तीय संस्थेचे कर्ज असून त्या व्यतिरीक्त सदर मिळकत निर्वेध, निजोखमी असल्याबद्दल आमचे अशिलांस खात्री व भरवसा दिला आहे. सदरची मिळकत विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांना विसाराची रक्कम स्विकारून कायमखुष खरेदी देण्याचे ठरविले आहे. सदरची मिळकत एचडीएफसी बँक लिमिटेड या वित्तीय संस्थेच्या कर्जा व्यतिरीक्त निर्वेध, निर्जो खमी असल्याबद्दलची खातरजमा करुन घेण्याच्या उद्दिष्टाने ही जाहिर नोटीस प्रसिध्द केली आहे. तरी सदर मिळकतीचे संदर्भात विद्यमान मालक श्री. गौरव अरुण म्हाळगी आणि श्री. अरुण दत्तात्रय म्हाळगी यांचे व्यतिरिक्त अन्य कोणीही नाही आणि सदर मिळकतीच्या बाबतीत कोणाचाही, कोणताही हक्क, वारस हक्क, इजमेंट, दावा, पोटगी, मनाईहुकूम, अव्वल जप्ती, गहाण खत, डिपॉझीट ऑफ टायटल डिड नुसार इक्वीटेबल मॉर्गेज, चार्ज, साठेखत, बक्षीसपत्र, करार, आदलाबदल लेख किंवा अन्य कोणताही हक्क-हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ दिवसांचे आत त्यांचे हक्काबाबत योग्य त्या कागदपत्रानिशी खालील नमुद केलेल्या पत्यावर कळवावे. मुदतीत कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरच्या मिळकतीवर अन्य कोणाचाही हक्क नाही, असे समजून अथवा असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिला आहे, असे ग्राह्य धरुन आमचे अशिल विद्यमान मालकाबरोबर सदर मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर कोणाचीही हरकत विचारात घेतली जाणार नाही. **परिशिष्ट - डि।। पुणे सब डि।। हवेली पैकी पुणे महानगरपालिका हद्दीतील वीर भद्रनगर, मौजे बाणेर येथील सर्व्हे नं. ८८ मधील हिस्सा नं. १/२/१०, प्लॉट नं. ५३ चे क्षेत्र ४५०.०० चौ. मी. पूर्वे सस - स. नं. ८८/१/१ ची कंपाऊंड वॉल, बाणेर, दक्षिणेस - प्लॉट नं. ५२, पश्चिमेस - कॉलनी रोड, उत्तरेस - प्लॉट नं. ५४.** यावर बांधण्यात आलेल्या **कुबेर कुंज अपार्टमेंट कंडोमिनीअम** या इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील फ्लॅट नं. २०२ चे बांधकाम क्षेत्रफळ ८७.३६ चौ.मी. (९४० चौ. फुट) + पाकींग क्षेत्रफळ **९.२९ चौ.मी.** (१०० चौ. फुट) व १६.४४ अविभाज्य हिश्यासह ही संपुर्ण फ्लॅट मिळकत. येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक फ्लॅट नं. २०२ ही मिळकत तसेच यामधील पिण्याचे पाण्याचे नळकनेक्शन यासह व इतर दरोबस्त तदंगभुत वस्तु, वहिवाट, वागणूकीचे हक्कासह काहीही एक राखुन न ठेविता असे. सदर इमारतीचे घोषणापत्रातील नमुद केलेल्या अटी व शर्तीसह.

**अहमदनगर**
**दिनांक :- २८/११/२०२४**

**ॲड. यशवंत श्रीकृष्ण जोशी,** गाळा नं. १, गोदावरी कॉम्प्लेक्स, स्वागत झेरॉक्स, जुन्या जिल्हा न्यायालया समोर, अहमदनगर. मो.नं. ९४२२३०४११०

**महाराष्ट्र शासन**
**वन परिक्षेत्र अधिकारी कार्यालय मंचर प्रा.**
**वन सावित्री उद्यान, अवसरी घाट ता. आंबेगाव, जि.पुणे 412405**
**निविदा सुचना क्र 01 / सन 2024-25**

खालील कामांच्या सीलबंद निविदा वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय मंचर (प्रा.) बनसावित्री उद्यान, अवसरी घाट ता. आंबेगाव, जि. पुणे 412 405 हे महाराष्ट्र शासनाच्या बांधकाम खात्याकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून मागवित आहेत. को-या निविदा या वनपरिक्षेत्र मंचर कार्यालयामध्ये मिळतील. सदरच्या निविदा दिनांक-27.11.2024 ते 04.12.2024 या कालावधीमध्ये भरून हार्ड कॉपीचे स्वरुपात भरावयाच्या आहेत. सदरच्या भरलेल्या निविदा वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय मंचर (प्रा.) यांचे कार्यालयामध्ये दिनांक 06.12.2024 रोजी दुपारी 04:00 वा पर्यंत स्विकारणेत येतील व त्याच दिवशी सायंकाळी 05:00 वा उघडणेत येतील.

| अ. क्र. | कामाचा तपशिल | परिमाण | अंदाजपत्रकीय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| 1. | Constuction of Parking shed at premised of proposed 1 leopard at Gavadewadi in Manchar range of junnar forest division | 1 | 403000 | सुशिक्षीत बेरोजगार अभियंता |
| 2 | Construction of Ramp & Otta for moving leopard cage at Gavadewadi in Manchar range of junnar forest division | 1 | 95100 | सुशिक्षीत बेरोजगार अभियंता |
| 3 | Construction of Staff Room for leopard camp at Gavadewadi in Manchar range of junnar forest division | 1 | 999800 | सुशिक्षीत बेरोजगार अभियंता |
| 4 | Construction of Store Room for leopard camp at Gavadewadi in Manchar range of junnar forest division | 1 | 999800 | सर्व साधारण खुला वर्ग |
| 5 | Construction of Toilet block at Gavadewadi base camp in Manchar range of junnar forest division | 1 | 999800 | सर्व साधारण खुला वर्ग |
| 6 | Providing & Erecting Chainink fencing with UCR wall part-1 at Gavadewadi for proposed leopard camp in Manchar range of junnar forest division | 1 | 802100 | सर्व साधारण खुला वर्ग |
| 7 | Providing & Erecting Chainink fencing with UCR wall part-II at Gavadewadi for proposed leopard camp in Manchar range of junnar forest division | 1 | 800400 | सर्व साधारण खुला वर्ग |
| 8 | Providing Fixing paving Block in premises of proposed leopard camp at Gavadewadi in Manchar range of junnar forest division | 1 | 995900 | सर्व साधारण खुला वर्ग |
| 9 | Construction of Raised water tank structure platform for pondevadi forest Nursary in Comp. No. 232 at Pondevadi in Manchar (T) Range of Junnar Division | 1 | 826200 | सर्व साधारण खुला वर्ग |
| 10 | Construction of Raised water tank structure platform for 10 kalamb forest Nursary in Comp. No. 232 in Manchar (T) Range of Junnar Division | 1 | 826200 | मजुर सोसायटी साठी राखीव |
| 11 | Construction of store room in pondevadi forest Nursary at Pondevadi in Manchar (T) Range of Junnar Division | 1 | 931300 | सर्व साधारण खुला वर्ग |
| 12 | Construction of store room in kalamb forest Nursary in comp no. 232 in Manchar (T) Range of Junnar Division | 1 | 931300 | सुशिक्षीत बेरोजगार अभियंता |
| 13 | Development of forest nursery area in kalamb forest Nursary in comp no. 232 in Manchar (T) Range of Junnar Division | 1 | 999300 | मजुर सोसायटी साठी राखीव |
| 12 | Providing and erecting chainlink fencing on C.C.1:2:4 Wall near Talav at Pondevadi Nursary in comp no. 253 in Manchar (T) Range of Junnar Division | 1 | 853900 | सर्व साधारण खुला वर्ग |
| 15 | Providing and erecting Labour shed in pondevadi forest nursary in Manchar (T) Range of Junnar Division | 1 | 713536 | सुशिक्षीत बेरोजगार अभियंता |
| 16 | Providing and erecting Labour shed in the premised of kalamb forest nursary in comp no.232 inManchar (T) Range of Junnar Division | 1 | 725576 | सुशिक्षीत बेरोजगार अभियंता |
| 17 | Providing & fixing Chainink fencing at pondevadi forest nursary in comp no. 253 in Manchar range of junnar forest division | 1 | 949700 | मजुर सोसायटी साठी राखीव |
| 18 | Providing & fixing Chainink fencing to left side of WBM road in kalamb forest nursary in comp no. 232 in Manchar range of junnar forest division | 1 | 949700 | सुशिक्षीत बेरोजगार अभियंता |
| 19 | 1Providing & fixing Chainink fencing to right side of WBM road in kalamb forest nursary in comp no. 232 in Manchar range of junnar forest division | 1 | 980800 | सर्व साधारण खुला वर्ग |

शिक्का

सही/-
**विकास भोसले**
वन परिक्षेत्र अधिकारी मंचर (प्रा.)

## नामा म्हणे आता लोपला दिनकर । बाप ज्ञानेश्वर समाधिस्थ ||

# श्री ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी दिन सोहळ्यावर पुष्पवृष्टी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**आळंदी :** आळंदी मंदिरात माऊली माऊली नामजयघोषात कीर्तन सेवा, पुष्पवृष्टी आणि घंटानाद, श्रींची आभूषणांसह सजलेल्या पूजेतील लक्षवेधी वैभवी रूप दर्शन, तसेच परंपरेने पहाट पूजा करून श्रींचा ७२९ वा संजीवन समाधी दिन सोहळा प्रथा परंपरांचे पालन करीत नामजयघोषात लाखो भाविकांचे उपस्थितीत परंपरेने साजरा झाला. यावेळी ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी दिन सोहळ्यावर हेलिकॉप्टरने पुष्पवृष्टी केली.

यावर्षीचे सोहळयास माजी मंत्री, आमदार चंद्रकांत पाटील, आमदार विजय शिवतारे, खासदार संजय उर्फ बंडू जाधव, देवस्थानचे प्रमुख विश्वस्त विधितज्ञ ॲड.राजेंद्र उमाप, विश्वस्त योगी निरंजन नाथसाहेब, विश्वस्त डॉ. भावार्थ देखणे, पंढरपूर देवस्थान विश्वस्त ॲड. माधवीताई निगडे, देहू देवस्थान अध्यक्ष पुरुषोत्तम महाराज मोरे, विश्वस्त माणिक महाराज मोरे, रवींद्र महाराज हरणे, व्यवस्थापक ज्ञानेश्वर वीर, पालखी सोहळ्याचे मालक बाळासाहेब आरफळकर, उपव्यवस्थापक तुकाराम माने, राजाभाऊ चौधरी, स्वामी सुभाष महाराज, बाळासाहेब चोपदार, राजाभाऊ चोपदार, राजाभाऊ चोपदार, मुख्याधिकारी कैलास केंद्रे, चैतन्य महाराज कबीरबुवा, मानकरी साहिल कुऱ्हाडे, माजी नगराध्यक्ष मानकरी राहुल चिताळकर, माजी नगराध्यक्षा वैजयंता उमरगेकर, स्वप्नील कुऱ्हाडे, मंगेश आरु, माजी नगरसेवक डी.डी. भोसले पाटील, राम गावडे, माजी नगराध्यक्ष रोहीदास तापकीर, संजय घुंडरे, अजित वडगावकर, राहुल चव्हाण, वैजयंता कांबळे, पुष्पा कुऱ्हाडे, सागर रानवडे, महेश कुऱ्हाडे, अमोल घुंडरे, अमोल वीरकर, ज्ञानेश्वर कुऱ्हाडे, सागर कुऱ्हाडे, संतोष भोसले, विष्णू वाघमारे, विलास तात्या बालवाडकर, वारकरी भाविक व ग्रामस्थ उपस्थित होते.



सर्व छायाचित्रे : अर्जुन मेदनकर, आळंदी

### आळंदी देवस्थानला पिकअप वाहन भेट

● श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमेटीस पिक अप व्हॅन पुणे जिल्हा वारकरी महामंडळाचे जिल्हाध्यक्ष विलास तात्या बालवडकर यांनी उपलब्ध करून देऊन या पिकअप व्हॅनचे लोकार्पण श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कडे चावी सुपूर्द करून करण्यात आले. यावेळी पूजा, वाहनास पुष्पहार घालून वाहन सुरु करण्यात आले. यावेळी श्री ज्ञानेश्वर संस्थान कमिटीचे प्रमुख विश्वस्त विधीतज्ञ राजेंद्र उमाप, विश्वस्त डॉ. भावार्थ देखणे, विश्वस्त योगी निरंजन नाथसाहेब, पंढरपूर मंदिरे देवस्थानचे विश्वस्त माधवी निगडे, व्यवस्थापक माऊली वीर, उमेश महाराज बागडे, राजेंद्र जाधव आदी उपस्थित होते. श्री ज्ञानेश्वर संस्थान कमिटीचे प्रमुख विश्वस्त विधीतज्ञ राजेंद्र उमाप यांनी नवीन वाहन चालवीत वाहनाचे सारथ्य केले.



माऊलींचे मंदिरात सोहळ्यातील परंपरेने पहाटे विधीतज्ञ प्रमुख विश्वस्त राजेंद्र उमाप यांच्या हस्ते माऊलींच्या संजीवन समाधीवर पवमान अभिषेक पूजा झाली. सोहळ्यातील परंपरेने हैबतबाबा पायरीपुढे हैबतबाबा आरफळकर यांच्या वतीने कीर्तन सेवा झाली. श्रींचे संजीवन समाधी दिन प्रसंगावर आधारित सोहळ्या निमित्त संत नामदेव महाराजांचे १६ वे वंशज माधव महाराज नामदास यांचे हृदय स्पर्शी वाणी तुन श्रींचे संजीवन समाधी दिन प्रसंगावर आधारित प्रभावी कीर्तन सेवा रुजू झाली. यावेळी संत नामदेव महाराज यांचे १६ वे, १७ वे आणि १८ वे वंशज नामदास परिवार उपस्थित होते.

सोहळ्यातील कीर्तन प्रसंगी माधव नामदास महाराज यांनी श्रीक्षेत्र अलंकापुरीचे माहात्म्य विषद केले. यासह श्रींचे चरित्र, समाधी सोहळ्याचे प्रसंग आदी वर भाष्य करीत सोहळ्यात हृदयस्पर्शी कीर्तन सेवा केली. यावेळी अनेक भाविकांच्या डोळ्यांचे कडा पाणावल्या.

आळंदी मंदिरात समाधी दिन सोहळ्यास आकर्षक रांगोळी, फुलांची आकर्षक सजावट लक्षवेधी ठरली. मंदिर परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त होता. कार्तिकी यात्रा कालावधीत श्रींचा अभिषेक, आरती, महानैवेद्य असे नित्योपचार पूजा या काळात सोडून भाविकांसाठी दर्शन खुले राहिले. कमी वेळेत जास्त भाविकांना दर्शन व्यवस्थेत देवस्थान चे कर्मचारी व्यवस्थापन यांनी विशेष परिश्रम घेतले. यामुळे लाखो भाविकांना दर्शन सुलभ रित्या घेता आले. अनेक भाविकांनी मंदिर प्रदक्षिणा करीत महाद्वारातून श्रींचे दर्शन घेत मंदिर कलश दर्शन घेत आपली वारी पूर्ण केली.

माजी पालक मंत्री आमदार भाजपचे नेते चंद्रकांत पाटील संजीवन सोहळ्या पूर्वी मोठ्या ताफ्यात येत श्रींचे दर्शन घेतले. यावेळी मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणात ताफ्यातील वाहने आल्याने भाविकांनी नाराजी व्यक्त केली. श्रींचे ७२९ व्या संजीवन समाधी दिन सोहळ्यात आमदार चंद्रकांत पाटील यांनी श्रींचे दर्शन घेतल्या नंतर त्यांचे हस्ते भाविकांना महाप्रसादाचे वाटप उत्साहात सुरु झाले. यावेळी आळंदी संस्थांनचे विश्वस्त डॉ. भावार्थ देखणे यांचे हस्ते पाटील यांचा शाल, हार, श्रीफळ देत शतकात करण्यात आला. यावेळी संस्थांचे मुख्य व्यवस्थापक माऊली वीर, किसान मोर्चाचे संजय घुंडरे, संकेत महाराज वाघमारे आदी ग्रामस्थ उपस्थित होते. याप्रसंगी आमदार चंद्रकांत पाटील यांनी विश्वस्त भावार्थ देखणे यांचे समवेत संवाद साधला. येथील समस्या, अडचणी जाणून घेतल्या. देवस्थानचे नियोजित प्रकल्पाची माहिती घेत देवस्थानचे समस्या, अडचणी आणि नियोजित प्रकल्पास यापुढील काळात मदत सहकार्य केले जाईल असे आमदार पाटील यांनी सांगत ग्वाही दिली. देवस्थानचे विकास कामासाठीचे अनुषंगाने बैठक घेतली जाईल असे सांगत संवाद साधला. श्रींचे संजीवन समाधी दिनी गुरुवार असल्याने परंपरेने गुरुवारची पालखी मंदिर प्रदक्षिणा होणार आहे.

आळंदी मंदिरात संजीवन समाधी दिनी परिमंडळ ३ चे सहाय्यक पोलीस आयुका डॉ. शिवाजी पवार, राजेंद्र गौर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक भीमा नरके, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुतीश नांदुरकर, बापू ढेरे, पोलिस नाईक मच्छिंद्र शेंडे, दत्त जाधव, श्रीधर सरनाईक, राहुल काळे आदींनी बंदोबस्तासाठी मंदिरात नियोजन केले.

### पहिल्या सार्थ इंग्रजी ज्ञानेश्वरीचे प्रकाशन

● श्री संत ज्ञानेश्वर महाराजांच्या संजीवन समाधी दिन सोहळ्यानंतर पहिल्या सार्थ इंग्रजी ज्ञानेश्वरी चे प्रकाशन श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटीचे प्रमुख विश्वस्त राजेंद्र उमाप, विश्वस्त योगी निरंजननाथ साहेब, विश्वस्त डॉ. भावार्थ देखणे, कबीर मठाचे प्रमुख चैतन्य महाराज लोंढे कबीर बुवा, खासदार संजय उर्फ बंडू जाधव आदी मान्यवरांचे उपस्थितीत झाले. यावेळी कृष्णा खोरे विकास महामंडळाचे संचालक राम गावडे आध्यात्मिक आघाडीचे संजय घुंडरे पाटील, किरण गवारे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. डॉ. सुरेंद्र सूर्यवंशी, तुकाराम बुवा गरुड ठाकूर दैठणकर, मीरा तुकाराम गोरडे (सूर्यवंशी ) यांनी सार्थ इंग्रजी श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी प्रकाशन सोहळ्याचे आयोजन केले. यावेळी विश्वस्त डॉक्टर भावार्थ देखणे, विश्वस्त योगी निरंजन नाथसाहेब यांनी उपक्रमाचे कौतुक करून संत साहित्याचा प्रचार प्रसार करण्यासाठी उपयुक्त प्रकाशन ठरेल असे सांगितले. तत्पूर्वी श्री ज्ञानेश्वरी हिंदी अनुवाद देखील प्रकाशित असल्याचे संयोजकांनी सांगितले.

---

## जागतिक सहकार परिषदेमुळे सहकाराच्या विकासाला चालना



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**इंदापूर :** आयसीए जागतिक सहकार परिषदेमुळे जगातील व देशातील सहकार क्षेत्राच्या विकासास चालना मिळणार आहे. स्वातंत्र्योत्तर काळानंतर देशाच्या विकासामध्ये सहकारी संस्थांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे, असे मत राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांनी व्यक्त केले.

नवी दिल्ली येथे आयसीए जागतिक सहकार परिषदेचे सोमवारपासून आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेमध्ये हर्षवर्धन पाटील यांनी सहभाग घेतला. यावेळी या सहकार परिषदे संदर्भात हर्षवर्धन पाटील यांनी मत व्यक्त केले. जागतिक सहकारी चळवळीची प्रमुख संस्था असलेल्या आंतरराष्ट्रीय सहकारी आघाडीच्या १३० वर्षाच्या इतिहासामध्ये ही परिषद प्रथमच भारतात होत आहे.

## वीजदेयक चुकीचे असल्याचा दावा फेटाळला

# वीजचोराला दिवाणी न्यायालयाचा पुन्हा दणका

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क


**बारामती :** सासवड येथील साईनाथ आईस फॅक्टरीला वीजचोरी प्रकरणात मा. दिवाणी न्यायालयाने दुसऱ्यांदा दणका दिला आहे. वीजचोरीपोटी आकारलेले देयक चुकीचे असल्याचा दावा फेटाळल्याने साईनाथ आईस फॅक्टरीला ३५ लाख ८६ हजारांचा दंड भरल्याशिवाय वीजपुरवठा पूर्ववत करता येणार नसल्याचे मा. न्यायालयाने बजावल्याने वीजचोरांचे धाबे दणाणले आहेत.

महावितरणच्या भरारी पथकाने सासवड येथील साईनाथ आईस फॅक्टरीची वीजचोरी अनुक्रमे ६ एप्रिल २०२२ व १५ मार्च २०२३ अशी दोनवेळा उघडकीस आणली होती. पहिल्या वेळी आईस फॅक्टरीला २ लाख ३४ हजार २४३ युनीटची चोरी केल्याबद्दल ३५ लाख ८६ हजारांचा दंड आकारला होता. आकारलेल्या दंडाबाबत व वीजपुरवठा जोडून देण्याबाबत साईनाथ फॅक्टरीचे मालक श्री. नारायण दगडू पवार यांनी दिवाणी न्यायालयात अर्ज केला होता. दिवाणी न्यायालयाने बिल कायम ठेवले. त्यांनतर श्री. पवार यांनी जिल्हा न्यायालयात दाद मागितली. यामध्ये आरोपीला काही काळ अटक सुद्धा झाली होती.

दरम्यान पहिले प्रकरण मा. दिवाणी न्यायालय (वरिष्ठस्तर) यांचे कोर्टात दावा चालू असताना साईनाथ आईस फॅक्टरीने दुसऱ्यांदा मीटर बायपास करुन वीजचोरी केली. महावितरणच्या भरारी पथकाने दि. १५ मार्च २०२३ रोजी ही वीजचोरी उघडकीस आणली. तेंव्हा या ग्राहकाला पुन्हा २२ लाख ३२ हजारांचा दंड आकारला. ही रक्कम ग्राहकाने भरली मात्र पहिल्या चोरीतील दंडाची रक्कम पूर्ण भरलेली नव्हती. त्यामुळे जोपर्यंत ३५ लाख ८६ हजारांचा दंड संपूर्ण भरला जात नाही तोपर्यंत वीजपुरवठा पूर्ववत करता येणार नसल्याचा युक्तीवाद न्यायालयाने ग्राह्य धरुन ग्राहकाचा अर्ज फेटाळून लावला. याउपर आईस फॅक्टरीने वीजचोरीचे देयक चुकीचे असल्याचा दावा केला.

## आंबेगाव पूर्वेला कांदा लागवडीसाठी रोपांचा तुटवडा

थोरांदळे (ता. आंबेगाव ) येथे कांदा लागवडीसाठी रोपांची काढणी करताना महिला मजूर.



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**रांजणी :** आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात रब्बी हंगामातील कांदा लागवडी सुरू झाल्या आहेत. मात्र, या परिसरात कांदा लागवडीसाठी रोपांचा प्रचंड तुटवडा निर्माण झाला आहे. मध्यंतरी पडलेल्या परतीच्या पावसाचा फटका कांदा रोपांना बसला. त्यामुळे सध्या लागवडीसाठी शेतकऱ्यांकडे रोपेच शिल्लक नाहीत, अशी परिस्थिती आहे.

सध्या कांद्याला उच्चांकी बाजारभावाची साथ मिळत आहे. परंतू अनेक शेतकऱ्यांनी यापूर्वीच कांदे विकून टाकल्याने या बाजारभाव वाढीचा कमी शेतकऱ्यांनाच फायदा झाला. पुढील काळात देखील कांद्यांना बाजारभाव चांगलाच मिळेल, अशी खात्री शेतकऱ्यांना आहे. त्यामुळे यंदा कांदा लागवडी अधिक होणार आहेत. यासाठी बहुतांशी शेतकऱ्यांनी घरीच शेतांमध्ये कांदा रोपे टाकली. परंतु या कांदा रोपांची उगवण झाल्यानंतर या परिसरात परतीच्या पावसाने अक्षरशः धुमाकूळ घातला. यामुळे अनेक ठिकाणी कांदा रोपांमध्ये पावसाचे पाणी साचून राहिले. कांदा रोपांची सड मोठ्या प्रमाणावर झाली.

### रोपांची टंचाई त्यात मजूर मिळेना

● या परिसरात सर्वाधिक शेतकरी कांदा लागवडी करतात . परंतु यंदा कांदा लागवडीसाठी रोपांची टंचाई निर्माण झाली आहे. रोपे उपलब्ध झाली तरी कांदा लागवडीसाठी मजूर महिला मिळत नाहीत. त्यामुळे लागवडी करता येत नाहीत. महिला मजुरांच्या टोळीला अगोदरच बुकिंग करावे लागते. त्या टोळीतील महिलांना दिवसाची हजेरी ४०० रुपये द्यावी लागते. तसेच वाहन भाडे देखील द्यावे लागते.

---

## शिरूर तालुक्यातील तलाठ्यांकडून नोंदी प्रलंबित

# तलाठ्यांवर कारवाई करण्याची मागणी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिरूर :** तालुक्यातील अनेक तलाठ्यांकडे १५५ दुरुस्ती, जमिन बिगरशेती केल्याच्या नोंदी, खरेदी खताच्या, बँकेचा बोजा चढवण्याच्या नोंदी गेल्या तीन महिन्यापासून प्रलंबित असल्याने अशा तलाठ्यांवर कारवाई करण्याची मागणी आता जोर धरु लागली आहे.

कोरेगाव भिमा येथील तलाठी तहसिलदारांनी दिलेल्या जमिन बिगरशेती आदेशाची तीन महिने उलटून गेले तरी नोंद करत नाही. पैसे दिल्याशिवाय कोणत्याच नोंदी करत नाही, असा आरोप लक्ष्मण गव्हाणे यांनी केला आहे. वारंवार फोन करूनही कुठल्याच नोंदी केल्या जात नाही. तशीच परिस्थिती सणसवाडी येथील तलाठ्याची आहे. या हायवेच्या कडेला असणाऱ्या मग्रुर तलाठयांची तातडीने चौकशी होऊन कारवाई होणे गरजेचे आहे.

तेथील मंडल अधिकारी काय करतात त्यांच्यावर ते नियंत्रण ठेवू शकत नाही का? उशिरा टाकणाऱ्या नोंदीचे व पाठीमागून लगेच केल्या जाणाऱ्या नोंदी पाठीमागचे नक्की गौडबंगाल काय आहे? हे समजायला जनता खुळी नाही. 'सरकारी काम अन् बारा महिने थांब' या म्हणीचा तंतोतंत प्रत्यय नागरीकांना येत असून आता नागरीकांचा संयम सुटत चालला असून सामाजिक कार्यकर्ते आता याबाबत मैदानात उतरून आंदोलन करणार आहेत.

## पुरंदरमधील विमानतळ जुन्याच जागेवर?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** पुरंदर तालुक्यातील विमानतळ हे भूसंपादनाचे एक मॉडेल आहे. ते विमानतळ प्रस्तावित असणाऱ्या आंतरराष्ट्रीय विमानतळ असून ते जुन्याच जागी म्हणजे पारगाव, मुंजवडी, खानवडी, उदाची वाडी, वनपुरी, एखतपुर आणि कुंभार वळण या गावाच्या हद्दीमध्ये होणार आहे.

पुरंदर तालुक्यातील सात गावांमध्येच २ हजार ८३२ हेक्टर जागेची आवश्यकता आहे. केंद्र आणि राज्य सरकार तसेच एअरपोर्ट, थॉरिटी संरक्षण मंत्रालयाने त्या जागेसाठी हिरवा कंदील दाखवला आहे. आत्तापर्यंत भूसंपादन कोणी करायचे आणि भूसंपादनासाठी मोबदला काय द्यायचा, यावर अंतिम निर्णय होणे बाकी आहे. विमानतळाच्या भूसंपादनासाठी ५००० कोटी रुपये लागणार आहे. जागेचे भूसंपादन हे महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी की एमआयडीसीसाठी यांनी करावयाचा यावर देखील चर्चा होऊन, अंतिम निर्णय होणे, बाकी आहे. पुरंदरच्या आमदारांनी सांगितले आहे की, शेतकऱ्यांना विश्वासात घेतल्याशिवाय हे विमानतळ होणार नाही.




**वधारलेला कांदा :** राजगुरूनगर (ता. खेड) येथील कांदा व लसूण संशोधन कांदा व लसूण संशोधन संचालनालयातील सहाय्यक संशोधक डॉ. पूजा डांगी यांनी कांद्याच्या वाढलेल्या भावाबद्दल कार्टूनमधून समर्पक संदेश दिला आहे.

---

# जिल्ह्यात रब्बी पेरण्यांचा वेग वाढला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** पुणे जिल्ह्यात रब्बी हंगामातील पेरण्यांचा वेग वाढला आहे. सद्य:स्थितीत ५३ टक्के क्षेत्रावरील पिकांच्या पेरण्या पूर्ण झालेल्या आहेत. त्यामध्ये मक्याची सर्वाधिक म्हणजे १३३ टक्के क्षेत्रावरील पेरणी पूर्ण झाली असून, ज्वारीच्या पेरण्या ५९ टक्क्यांइतक्याच झाल्या आहेत. या क्षेत्रात थोडी आणखी वाढ अपेक्षित असून, गहू आणि हरभऱ्याच्या पेरण्यांनी सध्या वेग घेण्यास सुरुवात केल्याची माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संजय काचोळे यांनी दिली.


२१ नोव्हेंबरअखेर १ लाख २१ हजार ९४ हेक्टरवर (५३ टक्के) पेरणी पूर्ण झालेली आहे. बारामती तालुक्यात सर्वाधिक २४ हजार ४४८ हेक्टरवर पिकांची पेरणी पूर्ण झाली आहे. तालुकानिहाय झालेली पेरणी हेक्टरमध्ये पुढीलप्रमाणे : पुरंदर २० हजार ७४३, खेड १५ हजार ९०७, इंदापूर १४ हजार ३६२, शिरूर १३ हजार ३९१, जुन्नर १३ हजार २३६, आंबेगाव ९ हजार ७१०, दौंड ३ हजार ९०७, भोर ३ हजार ६२५, हवेली १ हजार ४, तर मावळ, मुळशी आणि वेल्हे या तालुक्यांत तुलनेने पेरणी क्षेत्र कमी आहे.

ज्वारीच्या पेरणीचा कालावधी आता जवळपास संपुष्टात आला आहे. पहिल्या पेरणीतील ज्वारीचे पीक आता सव्वा ते दीड महिन्याचे झाले असून, जमिनीतील ओलाव्यामुळे पिकांची उगवण चांगली झाल्याचे चित्र आहे. पश्चिम पट्ट्यातील तालुक्यांमधील भात काढणी पूर्ण झालेली आहे. त्या ठिकाणी प्रामुख्याने हरभरा आणि पाणी उपलब्धतेनुसार गव्हाच्या पेरणीवर शेतकऱ्यांचा भर आहे. सध्या हरभऱ्याची २४, तर गव्हाची २३ टक्के पेरणी पूर्ण झालेली आहे.

## विधानसभा निवडणूक झाल्याने

# सहकारी संस्थांच्या निवडणुकीचा मार्ग मोकळा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** विधानसभेच्या निवडणुकांमध्ये मागील महिन्यात राज्य शासनाने सहकारी संस्थांच्या निवडणुकांना ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत स्थगिती दिली होती. आता विधानसभेच्या निवडणुकीची आचारसंहिता समाप्त झाली आहे. त्यामुळे आता नवीन वर्षापासून राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणुकांचे बिगुल वाजणार आहे.

विधानसभेच्या निवडणुकीच्या कामकाजासाठी सहकार विभागातील अधिकारी-कर्मचारी यांच्या सेवा अधिग्रहित केल्यास सहकारी संस्थांच्या निवडणुका पार पाडण्यात येणाऱ्या अडचणी विचारात घेता राज्य शासनाने राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणुका पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला होता. २०२४-२५ या वर्षात राज्यातील २९ हजार ४२९ सहकारी संस्थांची निवडणूक प्रलंबित असून त्यांपैकी ७ हजार १०९ सहकारी संस्थांची निवडणूक प्रक्रिया सुरू आहे. जून २०२४ मध्ये राज्यातील पावसाची परिस्थिती विचारात घेऊन शासनाने २० जून २०२४ रोजी राज्यातील सहकारी संस्थांची निवडणूक प्रक्रिया ३० सप्टेंबर २०२४ पर्यंत पुढे ढकलण्यात आली होती.

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने १ ऑक्टोबरपासून सहकारी संस्थांची निवडणूक प्रक्रिया पुन्हा सुरू करण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर राज्य शासनाने ऑक्टोबर महिन्यात प्राधिकरणाच्या आदेशाला स्थगिती देत या निवडणुका पुढे ढकलण्याचा आदेश सहकार विभागाचे अवर सचिव अनिल चौधरी यांनी जारी केला होता.

## कमळाच्या चिन्हावर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या
# निवडणुका जिंकण्यासाठी भाजपची सदस्य नोंदणी सुरु

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिरोली :** राज्यात सर्वाधिक आमदार निवडून आलेल्या भाजपने आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका कमळ चिन्हावर जिंकण्यासाठी सदस्य नोंदणी अभियान सुरू केल्याची माहिती भाजपचे जिल्हाध्यक्ष शरद बुट्टे पाटील यांनी दिली. उत्तर पुणे जिल्ह्य भाजपची बैठक राजगुरुनगर येथे बुधवारी (दि.२७) रोजी संपन्न झाली. विशेष म्हणजे भाजपने आयोजित केलेल्या या बैठकीला विधानसभा निवडणुकीत पक्षापासून बाजूला गेलेले व बंडखोरी करणारे उमेदवार आणि नेतेही उपस्थित होते.




या जिल्हा बैठकीला भाजपचे प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे, प्रदेश उपाध्यक्ष व माजी मंत्री संजयबाळा भेगडे, किसान मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष गणेश भेगडे, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष प्रदीप कंद, जुन्नरच्या महिला नेत्या आशा बुचके, क्रीडा आघाडीचे प्रदेशाध्यक्ष पै. संदीप भोंडवे, अनुसूचित जाती मोर्चाचे प्रदेश सरचिटणीस अशोक उमरगेकर, जिल्हा सरचिटणीस संजय रौंधळ, भगवान शेळके, सविता गावडे, पंडित मेमाणे, श्रीकृष्ण देशमुख, कोषाध्यक्ष मनोज मांजरे यांचेसह मंडल अध्यक्ष आबा सोनवणे (शिरूर), संतोष खैरे (जुन्नर), संदीप बाणखेले (आंबेगाव ), मारुती शेळके (शिरूर बेट), दत्ताभाऊ गुंड (मावळ ग्रामीण) अरुण लाड (लोणावळा),लहूमामा शेलार (देहूरोड), जिल्हा महिला अध्यक्ष पूनम चौधरी, युवामोर्चा जिल्हाध्यक्ष संदीप सातव, ओबीसी मोर्चा जिल्हाध्यक्ष दत्ता माळी, अध्यात्मिक आघाडीचे जिल्हाध्यक्ष गुलाब खांडेभराड आदी उपस्थित होते.

लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीमध्ये काही कारणाने बाजूला गेलेले, नाराज असलेले सर्व कार्यकर्ते एकत्र करण्याची पक्षाची भूमिका असून आगामी सर्व निवडणूका पक्ष स्वबळावर लढणार आहे. यातून अनेक नवीन कार्यकर्त्यांना संधी मिळणार असल्याचे प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे यांनी सांगितले.

सामान्य कार्यकर्त्यांना विकास योजना आणि प्रशासनामध्ये पाठबळ देण्याचे काम देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पक्ष करेल अशी भूमिका यावेळी प्रदेश उपाध्यक्ष संजय बाळा भेगडे यांनी मांडली.

सरकारचे माध्यमातून विविध शासकीय समित्या व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकित उमेदवारी देताना सदस्य नोंदणी मध्ये उत्तम काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनाच संधी मिळेल. कार्यकर्त्यांनी आता जिल्हा व राज्यांमध्ये हेलपाटे मारण्यापेक्षा आपल्या मतदारसंघामध्ये घराघरापर्यंत पोहोचावे असे आवाहन जिल्हाध्यक्ष शरद बुट्टे पाटील यांनी केले.

» Selected

## जेजुरी देवसंस्थानच्या वतीने संविधान दिन साजरा



**जेजुरी :** भारतीय संविधान दिनानिमित्त महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या जेजुरीच्या खंडोबा मंदिराचे व्यवस्थापन पाहणाऱ्या श्री मार्तंड देवसंस्थानच्या विश्वस्त मंडळाच्या वतीने संविधानाचे पूजन, वाचन करून संविधांनदिन साजरा करण्यात आला. जेजुरी येथील देवसंस्थानच्या मल्हार भक्त निवासात संविधान दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आले होते. या वेळी अड पांडुरंग थोरवे यांनी भारतीय संविधान विषयी माहिती दिली तर विश्वस्त अनिल सौंदडे यांनी संविधानाचे वाचन केले. विश्वस्त मंडळ,देवसंस्थानचे आधिकरी व कर्मचाऱ्यांनी यावेळी शपथ घेतली. यावेळी श्री मार्तंड देवसंस्थानचे प्रमुख विश्वस्त अभिजित देवकाते, विश्वस्त मंगेश घोणे, पोपट खोमणे, डॉ राजेंद्र खेडेकर, विश्वास पानसे, अ‍ॅड पांडुरंग थोरवे, अनिल सौंदडे, व्यवस्थापक आशिष बाठे, अधिकारी बाळासाहेब खोमणे, महेश नानेकर आदी उपस्थित होते.

# जळोची भाजी मार्केट मध्ये फुल मार्केटचा शुभारंभ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** बारामती कृषि उत्पन्न बाजार समितीचे जळोची भाजी मार्केट मध्ये आज महात्मा ज्योतिबा फुले यांचे पुण्यतिथी निमित्ताने फुल मार्केटचा शुभारंभ बाजार समितीचे सभापती सुनिल पवार यांचे शुभहस्ते करण्यात आला. आज २८ नोव्हेंबर रोजी महात्मा ज्योतिबा फुले पुण्यतिथीचे औचित्य साधुन बारामती बाजार समितीने फुल मार्केटचा शुभारंभ केल्याने याचा आनंद होत आहे असे सभापती सुनिल पवार यांनी शुभारंभ प्रसंगी मत व्यक्त केले. फुल उत्पादक शेतक-यांनी याचा लाभ घ्यावा व आपल्या फुलांची विक्री जळोची मार्केट मध्ये करावी असे उपसभापती निलेश लडकत यांनी सांगितले.

जळोची भाजी मार्केट सेलहॉल नं. ५ मधील गाळा नं. ९० चे आडतदार सोमनाथ झगडे व महेश शिंदे यांनी एकत्र येऊन सर्व प्रकारच्या फुलांची विक्री उघड लिलावाने सुरू केली. पहिल्या दिवशी झेंडु, गुलाब, शेवंती, पासली पेंडी इत्यादी फुलांची आवक झाली. शेळगाव, इंदापुर, फलटण, पिपंळी तेथील गणेश कटके, अमित हेगडे, ओंकार शिंदे, अनिल शहा या शेतक-यांनी फुले विक्रीस आणली होती. यावेळी झेंडुला कमाल ३५ रूपये प्रति किलो दर निघाला तर शेवंती ३० ते ४३ प्रति किलो आणि गुलाब शेकडा २०० ते ५०० रूपये, पासली पेंडी शेकडा १००० ते १७०० पर्यन्त अशी विक्री झाली. मार्केट मध्ये फुलांची विक्री उघड लिलाव पद्धतीने सुरू केली असल्याने फुलांचे दर चांगले निघतील. सुट्टीचे दिवस सोडुन रोज दुपारी बारा वाजता फुलांचे लिलाव होतील.

### शुभारंभ

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



**बारामती :** जळोची भाजी मार्केट मध्ये आज महात्मा ज्योतिबा फुले यांचे पुण्यतिथी निमित्ताने फुल मार्केटचा शुभारंभ बाजार समितीचे सभापती सुनिल पवार यांचे शुभहस्ते करण्यात आला.

## समाजरत्न पुरस्कारासाठी सुनीता नाईक वाव्हळ यांची निवड

**जेजुरी :** आंतरराष्ट्रीय काव्य जागर अभियानांतर्गत यंदाच्या आंतरराष्ट्रीय फुलेप्रेमी समाजरत्न पुरस्कारासाठी शिक्षिका, कवयित्री, लेखिका सुनीता नाईक वाव्हळ यांची निवड करण्यात आली आहे. कवी विजय वडवेराव आयोजित आंतरराष्ट्रीय काव्य जागर अभियान तसेच क्रांतीसुर्य ज्योतिराव फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या विचारांचा वसा घेऊन या चळवळीत कार्य करणाऱ्या हातांना बळ देण्यासाठी, कार्याला गती व प्रोत्साहन मिळावे म्हणून आंतरराष्ट्रीय फुले प्रेमी समाजरत्न पुरस्कार नुकतेच जाहीर करण्यात आले. या पुरस्कारासाठी सुनिता वाव्हळ नाईक यांची निवड करण्यात आली. दि.२ ते ५ जानेवारी दरम्यान देशात पहिल्यांदाच होणाऱ्या आंतरराष्ट्रीय फुले फेस्टिव्हल मध्ये एस.एम.जोशी सभागृह पुणे येथील सोहळ्यात सदर पुरस्काराचे वितरण होणार आहे. सुनिता मधुकर नाईक वाव्हळ या खेड तालुक्यातील कुरुळी येथील जिल्हा परिषद केंद्र शाळा कुरुळी येथे मुख्याध्यापक म्हणून कार्यरत आहेत. या पुरस्कारासाठी निवड झाल्यानंतर शाळा समितीच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.



## अश्लील वर्तनामुळे शिक्षकाला अटक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**महाळुंगे :** चाकणलगतच्या खराबवाडी येथील कोचिंग क्लासेस घेणाऱ्या सुशील पुंडलिकराव कुन्हेकर या शिक्षकाने स्वतःच्या खासगी शिकवणीत शिक्षण घेण्यासाठी येणाऱ्या एका २० वर्षीय विद्यार्थिनीशी व तिच्या दोन अल्पवयीन मैत्रिणींशी अश्लील वर्तन केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. खराबवाडी येथे जुलै पासून आजपर्यंत हा प्रकार सुरू होता. या शिक्षकाला गावातील नागरिकांनी बेदम चोप देऊन त्याला महाळुंगे इंगळे एमआयडीसी पोलिसांच्या ताब्यात दिले. महाळुंगे पोलिसांनी सोमवारी (दि. २५) रात्री उशिरा याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.


# शाहीर सगनभाऊ पुण्यतिथी निमित्त आजपासून संगीत महोत्सव

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जेजुरी :** महाराष्ट्राचे कुलदैवत व कलावंतांची जन्म भूमी असणाऱ्या खंडोबा देवाच्या जेजुरी नगरीत शुक्रवारपासून शाहीर सगनभाऊ जेजुरीकर यांच्या पुण्यतिथी निमित्त तीन दिवस संगीत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

ऐतिहासिक काळात धर्माने मुस्लिम असणाऱ्या शाहीर सगन आणि स्थानिक गोंधळी भाऊ यांनी शाहिरी कलेतून प्रबोधन व मनोरंजन केले.कलावंतांची जन्मभूमी असणाऱ्या जेजुरी नगरीत जन्म झालेल्या सगण यांनी खंडोबा देवाची भूपाळी लिहिली ही भूपाळी ऐतिहासिक काळा पासून आजपर्यंत दररोज जेजुरीच्या खंडोबा मंदिरात गायली जाते. तसेच त्यांनी अनेक पोवाडे, कवणे व शृंगारिक लावण्या लिहिल्या असून, त्या अजरामर झाल्या आहेत. शाहिरी व लोककलेचे जतन करण्यासाठी शाहीर सगनभाऊ स्मृती रंगमंचाच्या वतीने गेली ७० वर्षे शाहीर सगनभाऊ यांच्या पुण्यतिथी निमित्त संगीत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

शुक्रवारी रात्री शाहिरांची या कला मैफिलीत स्थानिक कलावंताची शाहिरी तसेच जल्लोष महाराष्ट्राचा या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन जेजुरी पालिकेचे माजी नगराध्यक्ष दिलीप बारभाई यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. शनिवार लावणीत रंगल्या सांजरात्री या कला मैफिलीत नाद खुळा या लावणी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, या कला मैफिलीचे उद्घाटन माजी आमदार संजय जगताप यांच्या हस्ते होणार आहे. रविवारी संगीतात रंगल्या सांजरात्री या कला मैफिलीत मालती इनामदार यांच्या लोकनाट्य तमाशाचे आयोजन करण्यात आले आहे. या मैफिलीचे उद्घाटन आमदार विजय शिवतारे यांच्या हस्ते होणार आहे.




या कार्यक्रमात लोककलावंत अरुण गायकवाड,लावणी सम्राज्ञी संगीता लाखे व राष्ट्रपती पुरस्कार विजेते मालती इनामदार तमाशा मंडळाला शाहीर सगनभाऊ पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार असल्याचे शाहीर सगनभाऊ मंडळाचे अध्यक्ष गोविंद कुडाळकर यांनी सांगितले.

# शिरूरमधील ऊसतोड समस्या सोडवण्यासाठी पाठपुरावा सुरू

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**रांजणगाव गणपती :** शिरूर व हवेली तालुक्यातील शेतकऱ्यांच्या ऊसतोडीबाबतच्या समस्या सोडवण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या माध्यमातून प्रयत्न सुरू असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते स्वप्निल गायकवाड यांनी दिली.

याबाबत अधिक माहिती देताना गायकवाड म्हणाले, शिरूर आणि हवेली तालुक्यातील काही भागात शेतकऱ्यांना ऊसतोडीबाबत मोठ्या प्रमाणात समस्या आहेत. अनेक शेतकरी वेळेत ऊसतोडणीची मागणी करतात. मात्र, काही कारखान्यांकडून जाणीवपूर्वक ऊसतोड दिली जात नाही. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होते. हे नुकसान टाळण्यासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या माध्यमातून थेट शेजारच्या कारखान्यांची मदत घेतली जाणार आहे. याबाबत प्रत्येक कारखान्याच्या प्रशासनाशी थेट भेटून पत्रव्यवहार केला आहे. तसेच याबाबत उपमुख्यमंत्री पवार यांनीदेखील निर्देश दिले आहेत. मलठण येथील पराग साखर कारखाना, दौड शुगर, अंबालिका शुगर, श्रीनाथ म्हस्कोबा या कारखान्यांना भेट देऊन ऊसतोडीसंदर्भात नियोजन करण्याबाबत निवेदन दिल्याची माहिती स्वप्निल गायकवाड यांनी दिली.



# संत सोपानकाका बँकेचा २७ वा वर्धापनदिन साजरा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** दिवंगत लोकनेते चंदुकाका जगताप यांनी स्थापन केलेल्या व अल्पावधीतच नावलौकिक मिळविलेल्या संत सोपानकाका सहकारी बँकेचा गुरुवारी २७ वा वर्धापनदिन साजरा झाला. यानिमित्त बँकेच्या सासवड येथील शाखेत श्रीसत्यनायायण पूजेचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी क्रांतीसुर्य महात्मा फूले यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन करण्यात आले. बँकेचे संस्थापक स्व. चंदुकाका जगताप यांनी घालून दिलेली सहकारातील शिस्त आणि कामाच्या पद्धतीप्रमाणे संत सोपानकाका सहकारी बँक कार्यरत असल्याने व सभासद, ठेवीदार, कर्जदार, खातेदार या सर्वांच्या विश्वासामुळे बँक सक्षमपणे उभी आहे., संस्थेचा कारभार काटेकोर आणि पारदर्शीपणे करून त्यात वाढ होत असल्याचे बँकेचे माजी अध्यक्ष व पुरंदर हवेलीचे माजी आमदार संजय जगताप यांनी सांगितले.



याप्रसंगी आनंदीकाकी जगताप, बँकेचे अध्यक्ष रमणिकलाल कोठडिया, उपाध्यक्ष शिवाजी ढमढेरे, व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रकाश पवार, संचालिका राजवर्धिनी जगताप, संचालक मनोहर पवार, राजेंद्र बडदे, विजय थेऊरकर, रविंद्र जोशी, पुरंदर नागरीचे सरव्यवस्थापक अनिल उरवणे, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप साबणे, अधिकारी चंद्रशेखर जगताप, गणेश मोहोळ, विश्वजीत आनंदे, शाखा व्यवस्थापक जगताप उपस्थित होते.

## पिढ्यान् पिढ्यांची परंपरा टिकून
# आंबेगाव तालुक्यामध्ये मरिआई वाले भक्त दाखल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**रांजणी :** आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील रांजणी, वळती परिसरात मरिआई वाले भक्त दाखल झाले आहेत. डोक्यावर देव्हारा, त्यात मरीआईची मूर्ती घेऊन हे भक्त गावांमधील वाडी-वस्त्यांवर आता दिसत आहेत. काळाच्या ओघात त्यांच्याकडे समाजाने दुर्लक्ष केल्याचे दिसून येते.

दिवाळी सणाच्या नंतर या परिसरात नंदीवाले, मरीआईवाले हे दाखल होतात. कित्येक पिढ्यान पिढ्यांची ही परंपरा आजही टिकून आहे. दहा पंधरा वर्षांपूर्वी मरीआई वाले गावात वस्तीत आल्यानंतर मरीआईची पूजा करण्यासाठी प्रत्येक घरातील महीला सुपामध्ये धान्य (मदान), हळद कुंकू, नारळ, वस्त्रे, घेऊन देव्हाऱ्या भोवती अक्षरशः गर्दी करत होत्या. मरिआईचा भक्त अंगावर चाबकाचे फटके मारून घ्यायचा.



"आम्ही मुळचे नगर जिल्ह्यातले, आमच्या अनेक पिढ्या या भागात वर्षातून एक वेळ येतात. आता पूर्वीसारखे लोक पुजा करत नाहीत. आम्हाला धान्य मिळत नाहीत. कोणी वस्त्रदान करत नाहीत" — रामचंद्र शिंदे

## रोबोटिक्सवर सादर केलेल्या उपकरणाचा प्रथम क्रमांक
# नरसिंह विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे विज्ञान प्रदर्शनात यश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**रांजणी :** रांजणी (ता. आंबेगाव ) येथील रयत शिक्षण संस्थेच्या नरसिंह विद्यालयातील विद्यार्थ्यांनी विज्ञान प्रदर्शनात घवघवीत यश संपादन केल्याची माहिती विद्यालयाचे प्राचार्य शिवाजी दुंडे यांनी दिली.

निती आयोग भारत सरकार, कॅपजेमिनी महाराष्ट्र, एसआरएफ फाउंडेशन व रयत शिक्षण संस्थेचे के.के. घुले मांजरी बुद्रुक, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी क्लस्टर लेवल कॉम्पिटिशन(विज्ञान प्रदर्शन) आयोजित करण्यात आले होते. या विज्ञान प्रदर्शनामध्ये रोबोटिक्स वर २५ प्रकल्प व आरडीनो वर ७६ प्रकल्प सादर करण्यात आलेले होते.



रांजणी (ता. आंबेगाव) येथिल नरसिंह विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी विज्ञान प्रदर्शनात घवघवीत यश मिळवले.

छाया: रोहीत खुडे

या प्रदर्शनामध्ये नरसिंह विद्यालयाच्या चैतन्य विक्रम खरमाळे ,मानस सुनील वाघ या दोन विद्यार्थ्यांनी रोबोटिक्स वरती उपकरण सादर केले होते. हे उपकरण तयार करण्यासाठी फक्त एक तासाचा अवधी होता. या उपकरणाचा प्रथम क्रमांक आला.

प्रकल्पांचे परीक्षण नीती आयोगाच्या परीक्षकांनी केले होते. त्याचप्रमाणे आदित्य संजीवकुमार हिले, आदिनाथ लक्ष्मण गांजवे या विद्यार्थ्यांनी स्मार्ट कार्डचा वापर करून आरएफआयडी डोअर लॉक सिस्टीम हे नाविन्यपूर्ण उपकरण सादर केले होते. त्याचेही कौतुक करण्यात आले. या सर्वांना विभाग प्रमुख बी. डी. थोरात व सर्व विज्ञान गणित शिक्षकांनी मार्गदर्शन केले. या यशाबद्दल विद्यालय व स्कूल कमिटीच्या वतीने या विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. या सत्कार प्रसंगी स्कूल कमिटी सदस्य मधुकर हांडे, एकनाथ भोर, बंडेश वाघ, उपाध्यक्ष नम्रता भोर, गणेश वाघ, पर्यवेक्षक राजेंद्र पडवळ आदींनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

#रा

# महात्मा फुले यांच्या स्मृती दिनानिमित्त अभिवादन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** सामाजिक क्रांतीची मशाल पेटवणारे स्त्री शिक्षणाचे पुरस्कर्ते ज्येष्ठ समाजसुधारक, क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या १३४ व्या स्मृतिदिनी त्यांच्या पुरंदर तालुक्यातील खानवडी येथील स्मारक स्थळी त्यांना अनेक मान्यवरांनी अभिवादन केले. ग्रामपंचायत खानवडी व महात्मा फुले स्मारक समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमास माजी आमदार संजय जगताप, विजय कोलते, सुदाम इंगळे, अशोक टेकवडे, दिगंबर दुर्गाडे, दिलीप यादव, हरिभाऊ लोळे, दत्ता झुरंगे यांसह अनेक मान्यवर या प्रसंगी उपस्थित होते.




दिपप्रज्वलन व महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. गट शिक्षणं अधिकारी संजय जाधव यांनी प्रास्ताविक केले. माजी आमदार संजय जगताप, विजय कोलते, दिगंबर दुर्गाडे, दत्ता झूरंगे, सुनिल धिवार यांनी या प्रसंगी मनोगतातून महात्मा फुले यांच्या कार्यकर्तृत्वाचा आढावा घेत त्यांना अभिवादन केले. गौरी विलास टिळेकर या विद्यार्थीनींने महात्मा फुले यांच्याविषयी केलेले मनोगत, सतीश कुमुंदाळे यांचे व्याख्यान उपस्थितांच्या टाळ्या घेवून गेले.

## अजितदादांचे स्पष्टीकरण; दोन उपमुख्यमंत्री होणार

# खातेवाटपाबाबत मतभेद नाहीत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क





**मुंबई :** महाराष्ट्रात एक मुख्यमंत्री व दोन उपमुख्यमंत्री असतील हा फॉर्म्युला ठरल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांनी दिली. "आम्ही एकत्र चर्चा करून पुढे काय करायचे यावर निर्णय घेऊ. मंत्रिमंडळ कसे असेल, त्यात मुख्यमंत्री व इतर दोन मुख्यमंत्री याबाबत साधक-बाधक चर्चा होईल. आम्ही अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात खातेवाटप, पालकमंत्रिपदे, अध्यक्ष, उपाध्यक्ष, सभापती, उपसभापती यांची निवड यासंदर्भात निर्णय घेऊ. आमच्यात एकवाक्यता असून कोणतेही मतभेद नाहीत. पदांबाबतची कोणतीही चर्चा आम्ही कुणाशीच केलेली नाही," असेही त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्रिपदाच्या उमेदवारासाठी भाजपाला पाठिंबा असल्याच्या भूमिकेचा पुनरुच्चार करून ते म्हणाले, की कोण कुठल्या पदासाठी आग्रही आहे या चर्चेला काहीही अर्थ नाही. राज्यात महायुतीचे सरकार आणण्याचे लक्ष्य आम्ही पूर्ण केले आहे. एकनाथ शिंदे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी व अमित शाह घेतील तो निर्णय मान्य असेल, असे सांगितले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसने निकाल जाहीर झाल्यानंतर हे जाहीर केले होते, की भाजप व त्यांचे नेते जी व्यक्ती ठरवतील, त्या नेत्याला आम्ही मुख्यमंत्री म्हणून पाठिंबा देऊ.

शाह यांच्यासोबतच्या बैठकीपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांची दिल्लीत प्रफुल्ल पटेल यांच्या निवासस्थानी बैठक झाली. या बैठकीला अजित पवार व सुनील तटकरेंसह पक्षाचे सर्वच ज्येष्ठ नेते उपस्थित होते. राष्ट्रवादी काँग्रेसला राष्ट्रीय पक्ष बनवण्यासाठी दिल्ली विधानसभेच्या निवडणुका लढवण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला.

## ठाकरे देश सोडून पळून जातील!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत महायुतीत न भूतो न भविष्य असे जोरदार यश मिळवून राज्याच्या सत्तेचीचावी आपल्याकडेच ठेवली आहे. महायुतीच्या सुनामीत महाविकास आघाडी पालापाचोळ्याप्रमाणे वाहून गेली. विधानसभेच्या पराभवानंतर शिवसेना ठाकरे गट महाविकास आघाडीपासून वेगळा होणार व मुंबई महापालिकेसह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर लढवणार असल्याच्या चर्चा राजकीय वर्तुळात रंगल्या आहेत. या पार्श्वभूमीवर आता शिवसेना शिंदे गटाचे नेते रामदास कदम यांनी ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर जहरी टीका केली आहे. एक दिवस असा येईल की,उद्धव ठाकरे रात्री २वाजता आपल्या कुटूंबासह देश सोडून पळून जातील,,असे खळबळजनक वक्तव्य कदम यांनी केले आहे.

## » Selected

### महिला पायलट मृत्यूप्रकरणी मित्राला अटक

**मुंबई** : मुंबईतल्या 'एअर इंडिया'मध्ये कार्यरत असणाऱ्या महिला पायलटचा मृतदेह तिच्या घरात आढळून आला. या प्रकरणात पोलिसांनी तिचा मित्र आदित्य पंडीतला अटक केली आहे. पवई पोलिसांनी ही कारवाई केली आहे. सृष्टी तुली असे २५ वर्षीय पायलटचे नाव होते. तिने आत्महत्या केली आहे, असा प्राथमिक अंदाज आहे. मरोळ या ठिकाणी तिचा मृतदेह आढळून आला.

### ट्रकच्या धडकेत पिता ठार, मुलगा जखमी

**कल्याण** : अंबरनाथ परिसरातील ऑरचिड स्वेकर सोसायटीत राहणारे पारसनंद पाल हे सकाळच्या सुमारास उल्हासनगरला मुलासोबत दुचाकीवरून जात असताना मागून येणाऱ्या विटाने भरलेल्या भरधाव वेगातील ट्रकची धडक बसल्यामुळे झालेल्या अपघातात पारसनंद यांचा जागीच मृत्यू झाला आहे, तर त्यांचा मुलगा गंभीररित्या जखमी झाला आहे.

### गॅस पाईपलाईनला गळतीने घबराट

**पालघर** : बोईसर तारापूर एमआयडीसीतील जे झोनमधील रस्त्याशेजारी आज दुपारी पीएनजी गॅस पाइपलाइनला गळती झाली. त्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. रस्त्याच्या कडेला जेसीबीने खोदकाम सुरू असताना ही गळती लागली. या घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन विभागाचे अधिकारी वैभव तांडेल म्हणाले, की पाइपलाइन खराब झाली आहे. सुरुवातीला घबराट निर्माण झाली होती; मात्र गुजरात गॅस कंपनीच्या अधिकाऱ्यांनी परिस्थितीवर नियंत्रण मिळवले. गॅस गळतीमुळे संभाव्य धोका टाळण्यासाठी पाईपलाईन बंद करून दुरुस्तीचे काम सुरू केले.

### सोमेश्वरचे चालू हंगामात १३ लाख टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट


**बारामती** : विधानसभा निवडणुका असल्याने राज्यभरातील जवळपास निम्म्याहून अधिक ऊस कामगार कारखाना कार्यक्षेत्रात दाखल झाले नव्हते. कारखान्याने गाळपाचा पन्नास हजाराचा टप्पा ओलांडला आहे. सोमेश्वरने चालू हंगामात १३ लाख टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट ठेवले आहे. कारखान्याने आजअखेर ९.४१ चा सरासरी साखर उतारा राखत ६७ हजार टन ऊस गाळप करत ५९ हजार क्विंटल साखरेचे उत्पन्न घेतले आहे.

निवडणुका पार पडल्यानंतर ऊसतोड करणारी संपूर्ण यंत्रणा कारखाना कार्यक्षेत्रात दाखल झाल्या आहेत. उपलब्ध झालेल्या यंत्रणेवरच दहा दिवसांपासून हंगाम सुरू होता. मात्र, संपूर्ण यंत्रणा दाखल झाल्यानंतर सोमेश्वर कारखान्याच्या गाळप हंगामाने वेग घेतला आहे. ऊसतोडणी सुरू झाल्याने वाहने कारखाना कार्यस्थळावर दाखल होत आहेत.

सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याचा गाळप हंगाम दि. १५ नोव्हेंबरपासून सुरू झाला आहे. सुरुवातीला कारखान्याने करारबद्ध केलेली ७० टक्के यंत्रणा कारखाना परिसरात दाखल झाली होती. सुरुवातीला सभासदांच्या ऊस गाळपास प्राधान्य देण्यात येत आहे.

## शिवसेनेच्या उपमुख्यमंत्री पदासाठी श्रीकांत शिंदे, भुसेंची जोरदार चर्चा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्रिपदाचा दावा सोडला आहे. शिवसेनेच्या शिंदे गटाला उपमुख्यमंत्रपद येणार असून, एकनाथ शिंदे ते स्वीकारणार नाहीत. त्यामुळे खा. डॉ. श्रीकांत शिंदे यांची नवीन सरकारमध्ये उपमुख्यमंत्रिपदी वर्णी लागू शकते.

शिंदे यांनी मुख्यमंत्री पदाच्या शर्यतीतून माघार घेतल्यानंतर भाजपने त्यांना केंद्रात कॅबिनेट मंत्रिपद अथवा राज्यात उपमुख्यमंत्री पदाचा प्रस्ताव दिल्याची माहिती आहे. शिंदे यांनी दोन्ही प्रस्ताव नाकारल्याचे समजते. शिंदे यांनी आपल्याला मुख्यमंत्री करता येत नसल्यास महायुती सरकारचा निमंत्रक म्हणून नियुक्ती करावी, शिवाय श्रीकांत शिंदे यांना नव्या सरकारमध्ये उपमुख्यमंत्रिपद द्यावे, असा प्रस्ताव भाजपसमोर मांडला आहे. शिंदे यांच्या या प्रस्तावावर भाजपश्रेष्ठींकडूनही सकारात्मक प्रतिसाद आल्याची माहिती आहे.

दरम्यान, शिंदे यांच्या आपल्या मुलाला उपमुख्यमंत्रिपद देण्याच्या प्रस्तावावर पक्षांतर्गत नाराजी पसरल्याचे समजते. श्रीकांत यांना राज्यात एका वरिष्ठ पदावर आणल्याने पक्षाची विश्वासार्हता बिघडू शकते, अशी भीती शिवसेनेच्या काही नेत्यांकडून व्यक्त केली जात आहे. यापूर्वीही उद्धव ठाकरे यांनी त्यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या कारकीर्दीत मुलगा आदित्य ठाकरे यांना पुढे आणल्याने त्यांच्यावर टीका झाली होती. दुसरीकडे, उपमुख्यमंत्रिपदासाठी शिवसेनेतून शिंदे यांचे निकटचे स्नेही व विश्वासू सहकारी दादा भुसे यांचे नाव समोर येत आहे. शिंदे यांनी पुकारलेल्या बंडात भुसे यांनी त्यांची साथ देत वेळोवेळी पक्षाची भूमिकाही समर्थपणे निभावली. भुसे सलग पाचवेळा विधानसभा निवडणूक जिंकले आहेत. तसेच ते फडणवीस, शिंदे आणि ठाकरे यांच्या मंत्रिमंडळातही मंत्री राहिले आहेत. भुसे नाशिक, धुळे आणि पालघरचे पालकमंत्री होते. त्यामुळे दादा भुसे यांच्यासारख्या अनुभवी नेत्याकडे उपमुख्यमंत्रिपद येण्याची जास्त शक्यता राजकीय वर्तुळात व्यक्त केली जात आहे.

### लोकशाहीचे वस्त्रहरण सुरू असल्याची टीका; ईव्हीएमबाबत संशय

## आढावांचे आत्मक्लेश आंदोलन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** आज देशात लोकशाहीचे अक्षरशः वस्त्रहरण सुरू झाले आहे. त्याविरोधात राज्य घटनेने दिलेल्या अधिकारांनुसार तीन दिवसांचे आत्मक्लेश आंदोलन करत आहे. आता नागरिकांनी रस्त्यावर उतरण्याची गरज आहे. हे करूनही गरज भासल्यास या सरकारविरोधात सत्याग्रह करावा लागेल, अशी टीका ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. बाबा आढाव यांनी केली. ईव्हीएमबाबत संशय घेण्यास जागा आहे, असेही ते म्हणाले.

महात्मा फुले वाडा येथे डॉ. आढाव यांनी आजपासून आत्मक्लेश उपोषण सुरू केले आहे. रिक्षा पंचायतीचे नितीन पवार, संदेश भंडारे या वेळी उपस्थित होते. हे उपोषण ३० नोव्हेंबरपर्यंत सुरू राहणार आहे. डॉ. आढाव म्हणाले, की अदानींचे प्रकरण घडत असताना पंतप्रधानांनी परदेशातून त्यांना पाठिंबा दिला. या प्रकरणाची संसदेत वाच्यताही होऊ नये, म्हणून जे चालले आहे, ते लांछनास्पद आहे. विधानसभा निवडणुकीत सरकारी पैशाचा खुळखुळा वाजला. जनतेने या पैशाला भुलू नये.

मतदानानंतर मतदानाच्या आकडेवारीमध्ये सतत बदल होतात. त्यामुळे ईव्हीएमबाबत शंका घेण्यास जागा आहे आणि ती रास्त आहे. हिंदू-मुस्लिम वाद निर्माण केले जात आहेत. मुस्कटदाबीच्या विरोधात समाजातील जागरूक वर्गाने बोलले पाहिजे. एकटा माणूसही बोलू शकतो, ही लोकशाहीची शक्ती आहे.

## पुण्यात स्किल टेक साई सर्व्हिस फाऊंडेशनस 'साईस्टा' कौशल्य विकास प्रबोधिनीची स्थापना!!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** पुण्यातील स्कील टेक साई सर्व्हिस फौंडेशन आणि अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद, पुणे यांच्या मध्ये सामंजस्य करार होऊन, संस्थेचे श्री नामदेवराव सूर्यवंशी आय.टी. आय मधील सुविधा व प्रशिक्षण दर्जा वाढ करण्यात येत आहे तसेच 'साईस्टा' नावाने कौशल्य विकास प्रबोधिनी सुरू करण्यात येत आहे. तसा सामंजस्य करार अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद, पुणे आणि स्कील टेक साई सर्व्हिस फौंडेशन यांच्यात नुकताच करण्यात आला अशी माहिती स्कील टेक साई सर्व्हिस फौंडेशनच्या संचालिका मालती कलमाडी यांनी दिली. वाहनसेवा उद्योग क्षेत्रातील विविध ५ अल्प मुदतीचे अभ्यासक्रम यामध्ये सुरू करण्यात येत आहेत. ऑटोमोटिव्ह टेलिकॉलर, ऑटोमोटिव्ह सेल्स एक्झिक्युटिव्ह, फोर व्हिलर टेक्शनियन, ऑटोमोटिव्ह सर्विस एडव्हाईजर आणि लाइट मोटर वाहनचालक, असे कोर्सेस सुरु होत आहेत. या कोर्सेसच्या माध्यमातून आधुनिक सुविधा युक्त उच्च गुणवत्तेचे व विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासाचे प्रशिक्षण याद्वारे दिले जाणार आहे.

नुकताच आय टीआय व 'साईस्टा' यांचे संयुक्त विद्यमाने "वाहन उद्योग क्षेत्रातील रोजगार व प्रशिक्षण" या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. या परिसंवादात पुणे शहर, परिसर व जिल्ह्यातून विविध खाजगी आयटीआय, एमसीव्हिसी व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य, व्याख्याते तसेच व्यवस्थापन यांचे ६० प्रतिनिधी सहभागी झाले होते. या परिसंवादात प्रमुख पाहुणे म्हणुन उदय सूर्यवंशी , जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, 'साईस्टा' संचालिका ,संस्थापिका मालती कलमाडी, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, पुणे विभागाचे माजी सहसंचालक राजेंद्र घुमे, साई सर्व्हिसच्या सिनियर एच आर संध्या साधले, आदी. प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

## रणरागिणी रस्त्यावर...

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**वाशीम :** पाणीपुरवठ्याचा प्रश्न गेल्या तीन महिन्यांपासून निर्माण झाला आहे. या योजनेंतर्गत गावात पाणी मिळत नसल्याने संतप्त महिलांनी थेट जिल्हा परिषदवर धडक मोर्चा काढला.

### शिवसेना नेत्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी घेतली गंभीर नोंद

## स्पा, मसाज सेंटरमध्ये वाढले गैरप्रकार!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** नवी मुंबई येथील स्पा सेंटरमध्ये, काम करणाऱ्या, मुलीवर झालेल्या अत्याचाराबाबत नवीमुंबई पोलिसांनी नुकताच गुन्हा दाखल केलेला आहे. याची गंभीर दखल डॉ. नीलम गोऱ्हे यांनी घेतली. याबाबत राज्याचे अपर मुख्य सचिव, गृहविभाग यांना असे गैरप्रकार रोखण्यासाठी राज्यभरात खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत. राज्यातील सर्व स्पा, मसाज सेंटर, पार्लर येथे गैरप्रकार रोखण्यासाठी तपासणी मोहिम राबविण्यात यावी. तिथे काम करणाऱ्या मुली व महिला यांच्या सुरक्षितेची जबाबदारी स्पा चालक यांची राहील याचे प्रतिज्ञापत्र परवाना देताना घेण्यात यावे. नवी मुंबई येथे घडलेल्या घटनेतील आरोपीस तत्काळ अटक करून गुन्ह्याचा तपास निष्णात पोलीस अधिकाऱ्यांमार्फत करावा व सत्वर दोषारोप पत्र दाखल करावे. अशा सूचना डॉ. नीलम गोन्हे यांनी दिल्या आहेत.

## ठाकरे बीएमसी निवडणूक स्वबळावर लढण्याची शक्यता!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** विधानसभा निवडणुकीत पराभवाचा अनपेक्षित धक्का बसलेल्या उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेपुढं आता टिकून राहण्याचं आव्हान निर्माण झालं आहे. मुंबई महापालिकेची आगामी निवडणूक ही ठाकरेंच्या शिवसेनेसाठी कसोटी ठरणार आहे. विधानसभेला महाविकास आघाडीचा फारसा फायदा न झाल्यानं मुंबईची निवडणूक स्वबळावर लढण्याचा विचार पक्षात सुरू आहे. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत राज्यातील राजकारणात मोठी उलथापालथ झाली. काँग्रेस-राष्ट्रवादी व शिवसेना ही नवी आघाडी राज्यात निर्माण झाली. त्यातूनच फुटून निघालेल्या दोन गटांनी पक्षाचा दर्जा मिळवून भाजपसोबत महायुती स्थापन केली. या आघाडी व महायुतीनं लोकसभा व विधानसभा निवडणुका एकत्रितपणे लढल्या. त्यात लोकसभेला महाविकास आघाडीला यश मिळालं, तर विधानसभेत महायुतीनं बाजी मारली. मात्र, दोन्ही वेळा उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला आघाडीचा सर्वाधिक फटका बसल्याचं पाहायला मिळालं.

लोकसभेला महाविकास आघाडीत सर्वाधिक जागा लढणाऱ्या शिवसेनेला केवळ ९ जागा मिळाल्या, तर विधानसभेला काँग्रेसपेक्षा कमी जागा लढूनही सर्वाधिक जागा मिळाल्या. मात्र तो आकडा फक्त २० होता. याउलट मूळ पक्षातून फुटून निघालेल्या शिंदेंच्या शिवसेनेची सरशी झाली. त्यामुळं आता ठाकरेंच्या शिवसेनेत चलबिचल सुरू झाली आहे.

### न्यायालयात जाण्याचा काँग्रेसचा इशारा

## मतदानाची आकडेवारी; माजी निवडणूक आयुक्तांना शंका

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** राज्यात विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर 'ईव्हीएम' आणि मतदानाच्या आकडेवारीमुळे निवडणूक आयोगाच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहेत. माजी मुख्य निवडणूक आयुक्त एस. वाय. कुरैशी यांनी विधानसभा निवडणुकीतील मतदानाची तात्पुरती आकडेवारी आणि अंतिम आकडेवारी यातील फरकाबाबत चिंता व्यक्त केली आहे. दरम्यान, रात्रीतून ७६ लाख मतांची वाढ झाली. ही वाढ कशी झाली, असा सवाल काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी निवडणूक आयोगाला केला आहे. रात्री साडेअकरा वाजेपर्यंत मतदान झाल्याचे निवडणूक आयोग सांगते. मतदान जास्त झाले असेल, तर त्यासाठी लोकांच्या रांगा लागल्या असतील. निवडणूक आयोगाने त्या लागलेल्या लाईनचे आम्हाला व्हिडीओ द्यावेत, अशी मागणी पटोले यांनी केली. आयोगाने पारदर्शता पाळली नाही. सायंकाळी पाच वाजेपर्यंत ५८.२२ टक्के मतदानाची नोंद निवडणूक आयोगाने केली, तर रात्री ६५. २ टक्के मतदानाची नोंद आयोगाने केली. दुसऱ्या दिवशी ६६ टक्के मतदान झाल्याचे निवडणूक आयोगाने सांगितले. ७६ लाख मतांची वाढ कशी झाली, असा सवाल त्यांनी केला. मतदानाचे प्रमाण ७.५० टक्क्यांनी वाढले, याचे उत्तर निवडणूक आयोगाने द्यावे, अशी मागणी पटोले यांनी केली. मतदानाच्या टक्केवारीत तफावत असून आम्ही न्यायालयात जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

### शेतकऱ्यांचा कापूस विकण्याऐवजी साठवणुकीकडे वाढता कल

## कापसाला कमी भाव; शेतकरी चिंताग्रस्त

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जळगाव :** डिसेंबर महिना दोन दिवसांत सुरू होणार असला, तरी कापूस बाजारातली स्थिती फार चांगली नाही. कापसाला चांगला भाव मिळेल, या आशेवर शेतकरी आहेत. यामुळे कापूस घरात साठवून ठेवला जात असून कापूस विकायला तयार नाहीत. परिणामी जिनिंग उद्योग अद्याप ठप्प आहेत.

कापसाला यंदा प्रतिक्विंटल सुमारे सात ते साडेसात हजार रुपयांचा भाव मिळत आहे. हा भाव परवडत नसल्याने शेतकरी कापूस विकायला तयार नाहीत. त्यामुळे जिनिंग उद्योग ठप्प पडला आहे. जळगाव, धुळे आणि नंदुरबार या तीन जिल्ह्यांचा विचार केला तर सुमारे दीडशे पैकी ७० ते ८० जिनिंग प्रेसिंग कारखाने बंद आहेत. सुरू असलेले पूर्ण क्षमतेने चालत नाहीत. दरवर्षी दिवाळीपासून कापसाचा हंगाम सुरू होतो. डिसेंबरपर्यंत खान्देशात सुमारे तीन ते साडेतीन लाख गाठींची खरेदी होते; पण यंदा तशी परिस्थिती नाही.

आंतरराष्ट्रीय बाजारात भारताच्या कापसाला मागणी नाही. बांगला देश, व्हिएतनाम, चीन हे देश प्रामुख्याने भारताचा कापूस खरेदी करणारे देश आहेत; पण त्यांच्याकडूनही हवी तशी मागणी अद्याप होत नाही. कापसाची निर्यात ठप्प आहे. बांगला देशात राजकीय अराजकता आहे. त्याचा व्यापारावर परिणाम झाला आहे; शिवाय भारताच्या अनेक व्यापाऱ्यांचे सौदेही अडकले आहेत. कापूस आयात करून जिनिंग चालवायच्या, तर भरमसाठ आयातशुल्कामुळे तेही शक्य नाही. अशा परिस्थितीत कापूस बाजारात मंदी आहे.

**उत्पादन खर्चही निघेना...**

- उत्पादन खर्च वाढल्यामुळे कापसाला किमान १० ते १२ हजार रुपये प्रति क्विंटल भाव मिळावा, अशी शेतकऱ्यांची अपेक्षा आहे.
- आज 'सीसीआय' साडेसात हजार रुपयांचा भाव देत आहे; पण जाचक अटींमुळे शेतकरी तिकडे जायला तयार नाहीत. परिणामी शेतकरी कापूस विक्रीला न काढता घरातच साठवून ठेवत आहेत.



#रा

## शिवमंदिर असल्याचा दावा; दाव्याच्या सुनावणीस न्यायालयाची तयारी

# आता वाद अजमेरच्या दर्ग्याचा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**अजमेर :** अजमेर शरीफ दर्ग्याबाबत नवा वाद समोर आला असून त्यात हिंदू सेना प्रमुख विष्णू गुप्ता यांनी दर्ग्याच्या सर्वेक्षणाची मागणी केली आहे. हा दर्गा सुफी संत ख्वाजा मोईनुद्दीन चिश्ती यांची समाधी नसून शिवमंदिर असल्याचा दावा त्यांनी केला आहे.

उत्तर प्रदेशातील संभल येथील जामा मशिदीच्या सर्वेक्षणानंतर निर्माण झालेल्या वादानंतर आता अजमेर येथील ख्वाजा मोईनुद्दीन चिश्ती यांच्या दर्ग्याचे प्रकरण न्यायालयात पोहोचले आहे. हिंदू सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष विष्णू गुप्ता यांनी अजमेर दिवाणी न्यायालयात (पश्चिम) याचिका दाखल करून दर्ग्यात महादेव मंदिर असल्याचा दावा केला आहे. निवृत्त न्यायाधीश हरविलास शारदा यांनी १९११ मध्ये लिहिलेले 'हिस्टॉरिकल अँड डिस्क्रिप्टिव्ह' हे पुस्तक त्यांनी संदर्भीय दस्तावेज म्हणून सादर केले.



हिंदू आणि मुस्लिमांचे सारखेच श्रद्धास्थान असलेल्या अजमेरच्या चिश्ती दर्ग्याबाबत नवा वाद उद्भवला आहे.

> 'आम्ही ८०० वर्षांचा इतिहास नाकारायचा का? येथे हिंदू राजांनी पूजा केली. आतील चांदीचे ताट जयपूरच्या महाराजांनी अर्पण केले होते. या सर्व गोष्टी खोट्या आहेत का? १९५० मध्ये न्यायमूर्ती गुलाम सन यांच्या समितीने दर्ग्याच्या प्रत्येक इमारतीची तपासणी केली होती.
> **-नसरुद्दीन चिश्ती,** ख्वाजा साहेबांचे वंशज, दर्ग्याचे उत्तराधिकारी

दर्ग्याची रचना आणि शिवमंदिराचे पुरावेही दिले. यानंतर न्यायाधीश मनमोहन चंदेल यांनी दावा सुनावणीस योग्य मानला आणि दर्ग्याच्या अंतर्गत व्यवस्था पाहणाऱ्या केंद्र सरकारच्या समितीला अल्पसंख्याक व्यवहार मंत्रालय आणि भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षणला या खटल्यातील पक्षकार म्हणून नोटीस बजावली. या प्रकरणाची पुढील सुनावणी २० डिसेंबर रोजी होणार असून त्यात तिघांनाही आपली बाजू मांडावी लागणार आहे.

याचिककर्ते गुप्ता यांनी अजमेर आणि दिल्लीत धमक्या मिळत आहेत, असा आरोप करून पोलिसांकडे संरक्षण मागितले आहे. मी महादेवाचा भक्त असून त्यांचा माझ्यावर वरदहस्त आहे. म्हणूनच मी दिल्लीहून आल्यानंतर येथे खटला लढत आहे. दोन वर्षे संशोधन केले. ज्ञानवापी आणि मथुरा येथेही याचिका दाखल केल्या होत्या. यानंतर मथुरेत सर्वेक्षण सुरू झाले. आम्ही कायद्याचा मार्ग अवलंबत आहोत. उर्स मेळा शांततेत पार पडावा अशी आमची इच्छा आहे, असे त्यांनी म्हटले आहे.

## » Selected

### 'जपानी एन्सेफलायटीस'ची दिल्लीत एकाला लागण

**नवी दिल्ली :** पश्चिम दिल्लीतील उत्तम नगर येथील ७२ वर्षीय व्यक्तीमध्ये जपानी एन्सेफलायटीस (जेई) चे एक वेगळे प्रकरण दिल्लीत नोंदवले गेले आहे. तथापि, अधिकाऱ्यांनी शहरात कोणत्याही उद्रेकाची पुष्टी केलेली नाही. दिल्लीत नोंदवलेले 'जेई'चे बहुतेक प्रकरण शेजारील राज्यांतून आलेले आहेत. राष्ट्रीय मार्गदर्शक तत्त्वांनुसार, सार्वजनिक आरोग्य उपाय लागू केले गेले आहेत आणि अधिकाऱ्यांनी लोकांना घाबरण्याची गरज नाही असे सांगितले.

### 'पीव्हीआर' सिनेमाजवळ दिल्लीत मोठा स्फोट

**नवी दिल्ली :** दिल्लीतील प्रशांत विहार परिसरात 'पीव्हीआर'जवळ मोठा स्फोट झाला. दिल्ली पोलिस घटनास्थळी



दाखल झाले आहेत. सर्वप्रथम हा स्फोट कोणत्या प्रकारचा होता, याची माहिती गोळा करण्याचा प्रयत्न पोलिस करत आहेत. दिल्ली अग्निशमन सेवेने सांगितले, की प्रशांत विहार परिसरातून आज सकाळी ११.४८ वाजता स्फोट झाल्याची माहिती मिळाली. अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या आहेत. दरम्यान, पोलिसांनी लोकांना शांतता राखण्यास आणि अफवांवर विश्वास न ठेवण्यास सांगितले.

### यासीन मलिक प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाची नोटीस

**नवी दिल्ली :** जम्मू-काश्मीर फुटीरतावादी नेता यासिन मलिक याच्याशी संबंधित खटल्यावर सर्वोच्च न्यायालयात गुरुवारी सुनावणी झाली. हे प्रकरण जम्मूहून नवी दिल्लीला हस्तांतरित करण्याशी संबंधित आहे. 'सीबीआय'ने ही याचिका दाखल केली होती. न्यायमूर्ती अभय ओक आणि ऑगस्टिन जॉर्ज मसिह यांच्या खंडपीठाने मलिक आणि इतर आरोपींना नोटीस बजावली आणि १८ डिसेंबरपर्यंत उत्तर दाखल करण्याचे निर्देश दिले. सुनावणीदरम्यान सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी खंडपीठाला सांगितले, की तिहार तुरुंगात व्हिडिओ कॉन्फरन्सिंग सुविधेसह न्यायालय असल्याने अपहरण प्रकरणातील खटल्यासाठी मलिकला जम्मू न्यायालयात प्रत्यक्ष हजर राहण्याची गरज नाही. यापूर्वी २१ नोव्हेंबर रोजी झालेल्या शेवटच्या सुनावणीत न्यायालयाने म्हटले होते, की दहशतवादी अजमल कसाबवर निष्पक्ष खटला होऊ शकतो, तर यासिन मलिकवर का नाही. याप्रकरणी पुढील सुनावणी १८ डिसेंबरला होणार आहे.

## केंद्रीय मंत्री लालन सिंह अडचणीत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुझफ्फरपूर :** केंद्रीय मंत्री राजीव रंजन सिंह उर्फ लालन सिंह यांच्याविरोधात बिहार न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली. मुस्लिम त्यांच्या संयुक्त जनता दलाला मतदान करत नसल्याची टिप्पणी करून लालन सिंह यांनी अलीकडेच वाद निर्माण केला होता. सुनावणीसाठी ४ डिसेंबरची तारीख निश्चित करण्यात आली आहे.

मुझफ्फरपूरचे रहिवासी आणि सामाजिक कार्यकर्त्या तमन्ना हाश्मी यांनी या संदर्भात जिल्हा मुख्य न्यायदंडाधिकारी राज कपूर यांच्या न्यायालयात याचिका दाखल केली आहे. हाश्मीचे वकील सूरज कुमार यांनी पत्रकारांना सांगितले, की न्यायालयाने याचिकेवर सुनावणीसाठी ४ डिसेंबरची तारीख निश्चित केली आहे. मुस्लिमांच्या भावना दुखावण्याच्या उद्देशाने लालन यांनी जाणूनबुजून हे भाषण



दिल्याचा आरोप या याचिकेत करण्यात आला आहे. वकिलाने सांगितले, की प्रक्षोभक भाषणे करणे आणि धार्मिक भावना दुखावल्याबद्दल भारतीय न्यायिक संहितेच्या (बीएनएस) कलमांतर्गत केंद्रीय मंत्र्यांवर खटला चालवण्याची आम्ही न्यायालयाला विनंती केली आहे. हे लक्षात घेण्यासारखे आहे की संयुक्त जनता दलाचे माजी अध्यक्ष लालन सिंह यांनी नुकतेच मुझफ्फरपूर येथे पक्षाच्या बैठकीत भर दिला होता, की बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी कोणत्याही भेदभावाशिवाय सर्व सामाजिक वर्गांसाठी काम केले आहे, मग त्यांना मते मिळतील की नाही, असेही त्यांनी विचारले.

## हिंदू संघटनांची एक तारखेला महापंचायत

# उत्तरकाशीतील जुन्या मशिदीबाबत तणाव

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**डेहराडून :** उत्तरकाशीतील अनेक दशके जुन्या मशिदीबाबत सातत्याने तणाव वाढत आहे. हिंदू संघटनांनी एक डिसेंबरला महापंचायत आयोजित करण्याचा निर्णय घेतला आहे. वास्तू पाडण्यासाठी दबाव आणणे हा या महापंचायतीचा अजेंडा आहे. महापंचायतीसाठी सरकारकडून परवानगी मिळालेली नाही; मात्र संयुक्त सनातन धर्म रक्षा संघ, विश्व हिंदू परिषद या संघटना नियोजित तारखेनुसार कार्यक्रम आयोजित करण्यासाठी आग्रही आहेत.

दरम्यान, धामी सरकारने उच्च न्यायालयात आपली बाजू मांडली आहे. धामी सरकारने या महापंचायतीला अद्याप कोणतीही परवानगी दिलेली नसल्याचे उच्च न्यायालयात सांगितले आहे. याशिवाय, राज्य सरकारने उत्तरकाशीचे पोलिस अधीक्षक अमित श्रीवास्तव यांची नियुक्ती झाल्यानंतर तीन महिन्यांत त्यांची बदली केली आहे. महिनाभरापूर्वी उत्तरकाशीतील आंदोलक जमाव ठरलेल्या मार्गावरून हटक मशिदीकडे निघाला असता, पोलिसांनी त्यांना रोखले होते. परिणामी जमावाने पोलिसांवर दगडफेक केली. या घटनेच्या जवळपास महिनाभरानंतर श्रीवास्तव यांची बदली करण्यात आली आहे. उच्च न्यायालयासमोर स्पष्टीकरण देताना सरकारने सांगितले, की मशिदीला पुरेशी सुरक्षा पुरविण्यात आली आहे.



एका याचिकेवर सुनावणी करताना न्यायालयाने मशिदीला सुरक्षा देण्याचे आदेश दिले होते आणि सरकारला द्वेष पसरवणाऱ्या लोकांवर कारवाई करण्यास सांगितले होते. मशीद पाडण्याची मागणी करत हिंदू संघटनांकडून तीव्र निदर्शने करण्यात आली. याचिकाकर्त्यांचे वकील कार्तिकेय हरी गुप्ता म्हणाले, की राज्याने न्यायालयाला आश्वासन दिले आहे, की धार्मिक रचनेला चोवीस तास पाळत ठेवून पुरेशी सुरक्षा प्रदान केली जात आहे. यादरम्यान, न्यायालयाने पुन्हा एकदा पुनरुच्चार केला, की कायद्याचे राज्य असलेल्या देशात विनाशाच्या धमक्या आणि अपमानास्पद भाषा अस्वीकार्य आहे.

अल्पसंख्याक सेवा समितीचे अध्यक्ष मुशर्रफ अली आणि इस्तियाक अहमद यांनी त्यांच्या याचिकेत कथित मुस्लिम विरोधी भाषणांवर चिंता व्यक्त केली आणि भटवारी रोडवरील जामा मशिदीसह अल्पसंख्याकांच्या मालमत्तांना संरक्षण देण्याची मागणी केली. याचिकाकर्त्यांनी दावा केला, की मशीद वक्फ बोर्डाच्या अंतर्गत येते आणि त्यांच्याकडे ते सिद्ध करण्यासाठी पुरावे आहेत.

# झारखंडमध्ये प्रेयसीचे केले ५० तुकडे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**रांची :** कसाई म्हणून काम करणाऱ्या २५ वर्षीय तरुणाने आपल्या 'लिव्ह-इन पार्टनर'चा गळा दाबून खून केला. तिच्या शरीराचे अनेक तुकडे केले आणि झारखंडच्या खुंटी जिल्ह्यातील जंगलात फेकून दिले. पोलिसांनी याबाबत माहिती दिली. नरेश भेंगरा असे आरोपीचे नाव असून त्याला अटक करण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले.

हत्येनंतर सुमारे पंधरवड्यानंतर जरीगढ पोलिस ठाण्याच्या हद्दीतील जोरदग गावाजवळ एक भटका कुत्रा मानवी शरीरासह दिसला, तेव्हा ही बाब उघडकीस आली. भेंगरा गेल्या काही वर्षांपासून तमिळनाडूतील याच जिल्ह्यातील २४ वर्षीय महिलेसोबत 'लिव्ह-इन' रिलेशनशिपमध्ये राहत होता. काही काळापूर्वी तो झारखंडला परतला आणि आपल्या जोडीदाराला न सांगता त्याने दुसरे लग्न केले आणि पत्नीला सोबत न घेता दक्षिणेकडील राज्यात परत गेला. खुंटीचे पोलिस अधीक्षक (एसपी) अमन कुमार म्हणाले, "ही क्रूर घटना खुंटी येथे ८ नोव्हेंबर रोजी घडली. आरोपीने दुसरे लग्न केले होते आणि पीडितेला त्याला त्याच्या घरी घेऊन जायचे नव्हते. आरोपीने तिला जरियागड पोलिस ठाण्याच्या जोर्दग गावात घराजवळील जंगलात नेले आणि तिचे तुकडे केले. आरोपीला अटक करण्यात आली आहे."

या प्रकरणाचा तपास करत असलेले पोलिस निरीक्षक अशोक सिंह यांनी सांगितले, की हा माणूस तामिळनाडूतील कसायाच्या दुकानात काम करत होता आणि 'चिकन' बुचरिंग करण्यात तो तज्ज्ञ होता.

### श्रद्धा वालकर प्रकरणाची आठवण

● मृतदेह सापडल्यानंतर जंगलात मृत महिलेचे सामान असलेली बॅगही सापडली असून त्यात तिचे आधार कार्डही होते. महिलेच्या आईला घटनास्थळी बोलावून तिच्या मुलीच्या सामानाची ओळख पटवली. या घटनेने परिसरातील लोकांना धक्का बसला आहे आणि त्यांना २०२२ मध्ये झालेल्या श्रद्धा वालकर खून प्रकरणाची आठवण झाली आहे. 'लिव्ह-इन पार्टनर'नेच वालकरची हत्या करून त्याच्या मृतदेहाचे तुकडे करून दक्षिण दिल्लीतील मेहरौलीच्या जंगलात फेकून दिले होते.

## लष्कराचा बहुमान..

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**नवी दिल्ली :** लष्करात मानाचे असलेले राष्ट्रपतींचे पदक अहिल्यानगर येथील एमआयआरसीमध्ये सेनादलप्रमुख उपेंद्र द्विवेदी यांच्या हस्ते देण्यात आले.

# छोट्या न्यायाधीशांना पेटवायचा आहे देश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** समाजवादी पक्षाचे राज्यसभा खासदार राम गोपाल यादव यांनी न्यायाधीशांबाबत वादग्रस्त विधान केले आहे. ते म्हणाले, की छोट्या न्यायाधीशांना देश पेटवायचा आहे.

आपले पंतप्रधान स्वतः अजमेर शरीफला चादर पाठवतात. देश-विदेशातील लोक येथे येतात. आता या दर्ग्याला वादात अडकवणे हे अत्यंत घृणास्पद आणि क्षुद्र मानसिकतेचे प्रतीक आहे. भाजप समर्थक लोक सत्तेत राहण्यासाठी काहीही करू शकतात, अशी टीका करून यादव म्हणाले, की देश पेटला तरी त्यांना काही फरक पडत नाही. ते सत्तेत आहेत. आता लोकशाही उरलेली नाही. लाठ्या-गोळ्यांच्या जोरावर मनमानी पद्धतीने लोकांना मतदान करू दिले जात नाही. संभळमधील कुंडरकी निवडणुकीची चर्चा होऊ नये, म्हणून हे सर्व करण्यात आले आहे. निवडणुकीवरील चर्चेवरून लोकांचे लक्ष वळवण्यासाठी त्यांनी संभाळचा वाद निर्माण केला. ते म्हणाले, की तेथे कोणालाही परवानगी नाही.

# प्रियंका गांधी यांची खासदार म्हणून शपथ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** पहिल्यांदाच लोकसभेवर निवडून आलेल्या प्रियंका गांधी यांनी खासदार म्हणून शपथ घेतली. या वेळी प्रियंकाचे संपूर्ण कुटुंब घरात उपस्थित होते. आई सोनिया गांधी आणि भाऊ राहुल यांच्याशिवाय पती रॉबर्ट, त्यांचा मुलगा रेहान आणि मुलगी



मिराया हेदेखील संसद भवनात उपस्थित होते.

सकाळी ११ वाजता लोकसभेचे कामकाज सुरू झाल्यानंतर क्रीम रंगाची साडी परिधान करून संसद भवनात पोहोचलेल्या प्रियंका गांधी यांनी खासदार म्हणून शपथ घेतली.

शपथविधी सोहळ्यादरम्यान त्यांनी हातात संविधानाची प्रत धरली होती. त्यांनी हिंदीत शपथ घेतली. आई सोनिया, पती रॉबर्ट, रॉबर्टची आई, दोन्ही मुले, काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे आणि रंजित रंजन यांच्यासह अनेक काँग्रेस खासदारही खासदार गॅलरीत बसले होते.

शपथ घेतल्यानंतर प्रियंकाने लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना हात जोडून अभिवादन केले. त्यानंतर पहिल्या रांगेत बसलेल्या विरोधी पक्षनेत्यांना हात जोडून अभिवादन केले. सभागृहातील विरोधी पक्षनेते आणि त्यांचे बंधू राहुल गांधी यांनीही हात जोडून त्यांचे अभिवादन स्वीकारले. शपथ घेतल्यानंतर प्रियंका विरोधी खासदारांसाठी असलेल्या चौथ्या रांगेत जाऊन बसल्या. राहुल गांधी पहिल्या रांगेत बसले होते.

## अदानी प्रकरणावरून तृणमूल काँग्रेसची वेगळी भूमिका

# संसदेच्या कामकाजावरून 'इंडिया'आघाडीत फूट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** संसदेच्या हिवाळी अधिवेशनाच्या पहिले तीन दिवस गदारोळामुळे कोणतेही महत्त्वाचे काम होऊ शकले नाही. अदानी प्रकरण आणि वक्फ विधेयक बोर्डावर विरोधकांनी जोरदार घोषणाबाजी केल्यामुळे सभागृहाचे कामकाज तहकूब करण्यात आले. काँग्रेस अदानी मुद्द्यावरून सरकारला कोंडीत पकडत आहे; पण या काळात 'इंडिया'आघाडीतही फूट पडली. तृणमूल काँग्रेसने अदानी प्रकरणावर वेगळी भूमिका घेत संसदेत इतर मुद्द्यांवर चर्चा धरण्याचा आग्रह केला.

या अधिवेशनात एका महत्त्वाच्या मुद्द्यावरून काँग्रेस आणि 'टीएमसी'मध्ये मतभेद निर्माण झाले आहेत. काँग्रेस पक्ष सातत्याने अदानी समूहाविरोधात सरकारला घेरण्याचा प्रयत्न करत आहे, तर 'टीएमसी'ची भूमिका काहीशी वेगळी आहे. 'टीएमसी'नेत्यांचे म्हणणे आहे, की अदानी प्रकरणावरून संसदेत गोंधळ घालण्याऐवजी इतर महत्त्वाच्या मुद्द्यांकडे लक्ष दिले पाहिजे. संसदेत इतर महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा करण्याची गरज 'टीएमसी'ने व्यक्त केली. 'टीएमसी'चे राज्यसभा खासदार डेरेक ओब्रायन यांनी सांगितले, की सामान्य लोकांचे प्रश्न मांडता यावेत यासाठी संसदेचे कामकाज व्हावे अशी आमची इच्छा आहे. अदानी प्रकरणामुळे इतर महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा होत नाही.

### सरकार आणि विरोधकांत दरी वाढणार

● काँग्रेस आणि तृणमूल या दोन्ही पक्षांची आपापली राजकीय उद्दिष्टे आहेत; मात्र या अधिवेशनात दोन्ही पक्षांमधील मतभेदांमुळे सरकार आणि विरोधकांमध्ये संघर्षाची



परिस्थिती निर्माण झाली आहे. येत्या काही दिवसांत संसदेचे कामकाज सुरळीत होईल की नाही, हे पाहणे बाकी आहे. दरम्यान, विरोधी पक्षांनी सरकारवर अदानी प्रकरण आणि इतर मुद्दे दाबण्यासाठी संसदेचे कामकाज रोखण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप केला आहे, हा आरोप सरकारने फेटाळला आहे. हीच स्थिती राहिल्यास अधिवेशन सुरळीत चालणार नाही आणि सरकार आणि विरोधक यांच्यातील दरी आणखी वाढू शकते.

#रा

# चीनच्या नागरिकांच्या सुरक्षेवर चर्चा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**इस्लामाबाद :** अलीकडच्या काही दिवसांत पाकिस्तानमध्ये चीनी नागरिकांवरील वाढत्या हल्ल्यांदरम्यान, पाकिस्तान आणि चीनच्या लष्करी अधिकाऱ्यांनी दहशतवादविरोधी आणि सुरक्षा मुद्द्यांवर सखोल चर्चा केली. चीनच्या 'सेंट्रल मिलिटरी कमिशन'चे (सीएमसी) उपाध्यक्ष आणि सर्वोच्च लष्करी अधिकारी जनरल झांग युक्सिया यांनी त्यांच्या उच्चस्तरीय शिष्टमंडळासह पाकिस्तानला भेट दिली. जनरल झांग यांनी पाकिस्तानचे लष्करप्रमुख जनरल असीम मुनीर यांची भेट घेतली. या आमने-सामने



बैठकीनंतर दोन्ही पक्षांमध्ये शिष्टमंडळ स्तरावर चर्चा झाली.

डॉन वृत्तपत्राच्या वृत्तानुसार, चीनने पाकिस्तानमधील आपल्या नागरिकांच्या सुरक्षेसाठी अधिक सक्रिय भूमिका घेण्याची मागणी केली. पाकिस्तानमध्ये काम करणाऱ्या चीनी नागरिकांसाठी सुरक्षेच्या उपाययोजना आणखी मजबूत कराव्यात, असा चीनचा आग्रह आहे. तथापि, पाकिस्तानने स्पष्ट केले, की दोन्ही देशांमधील दहशतवादविरोधी सहकार्य "परस्पर सार्वभौमत्व आणि आदर" या तत्त्वांवर आधारित असेल. भारताची प्रादेशिक भूमिका आणि अफगाणिस्तानातील परिस्थिती, विशेषत: दहशतवादी गटांच्या कारवाया यावर बैठकीत सखोल चर्चा झाली.



पर्थ येथील कसोटी सामन्यात प्रामुख्याने दुसऱ्या डावात विराट कोहलीने बदललेला फलंदाजीचा स्टान्स त्याला पुन्हा फॉर्म मिळवून देण्यास मोलाचा ठरला. वेगवान गोलंदाज हॅझलवूडला मिडविकेट मारलेला चौकार जबरदस्त होता.
— सुनिल गावस्कर

भारतीय संघ चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी इथे येणार नसेल, तर यापुढे आम्ही भारताविरुद्ध भारतात क्रिकेट खेळणार नाही. आमची भूमिका स्पष्ट आहे. पाकिस्तान क्रिकेटसाठी सर्वोत्तम करण्याचा आमचा प्रयत्न आहे आणि ते आम्ही करूच...
— मोहसिन नक्वी



### फादर शॉच मेमोरियल हॉकी स्पर्धा; मुलांच्या तीन संघांचा पराभव, मुलीही पराभूत

# लोयोला हायस्कूलची निराशाजनक सुरुवात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** यजमान लोयोला हायस्कूलची फादर शॉच मेमोरियल हॉकी स्पर्धेतील सुरुवात निराशाजनक ठरला. त्यांचे चार संघ पराभूत झाले. त्यात मुले गटाच्या तीन आणि मुली गटाच्या एका संघाचा समावेश आहे.

मेजर ध्यानचंद हॉकी स्टेडियम, नेहरूनगर, पिंपरी येथे सुरू असलेल्या स्पर्धेत १७ वर्षांखालील मुले गटात लोयोला एचएस आणि कर्नल भगत स्कूल यांच्यातील लढत गोल शून्य बरोबरीत सुटली. त्यानंतर मुले संघांना मिलेनियम एचएस आणि मॉडर्न एचएसकडून पराभव पाहावा लागला. १९ वर्षांखालील मुली गटात लोयोला एचएस संघाचा खडकी एज्युकेशन सोसायटीकडून ४-० असे पराभूत व्हावे लागले. ही स्पर्धा लोयोला हायस्कूलने इलनसह हॉकी महाराष्ट्रच्या मान्यतेने केवळ शालेय मुलांसाठी आयोजित केली आहे. स्पर्धेचे हे सलग पाचवे वर्ष आहे.



दिवसातील पहिल्या लढतीत, मुलांच्या गटात लोयोला एचएस 'अ' आणि कर्नल भगत इंग्लिश स्कूल यांच्या गोलशून्य बरोबरी राहिली. त्यानंतर मुलींच्या विभागात खडकी एज्युकेशन सोसायटीने लोयोला एचएसला ४-० असे हरवले. शेहा बेंद्रेने (८ वा, ५६ वा) दोन तसेच कर्णधार मिताली शिंदे (१८ वा), सपना वडारने (३४वा) प्रत्येकी एक गोल करताना खडकी एज्युकेशन सोसायटीच्या विजयात मोलाचा वाटा उचलला.

लोयोला एचएच 'ब' संघाला मॉडर्न एचएसकडून आणखी एक निराशाजनक पराभव पत्करावा लागला. सामन्यातील एकमेव आणि निर्णायक गोल मेहेश चौधरीने (२५व्या) केला. न्यू मिलेनियमकडून १-० अशी मात खावी लागल्याने लोयोला एचएसची पराभवाची संख्या चार वर गेली. राकेश एम. याने (५७ व्या) सामन्यातील निर्णायक गोल केला.


अन्य सामन्यात लोकमान्य टिळक एचएसने कर्नल भगत इंग्लिश स्कूलवर ५-० असा विजय मिळवला. वैष्णवी मलमे (७वे), मानवी जुलाळे (९वे), पुष्पलता आखाडे (४२वे- पीसी), अर्पिता कंजारे (४५वे) आणि मृणाली बगाडेने (४७वे) प्रत्येकी एक गोल करताना विजयाला हातभार लावला. उशिरा झालेल्या सामन्यांमध्ये १९ वर्षांखालील मुलींच्या गटात न्यू मिलेनियमने हेत्वी कोटालियाच्या (५९व्या) सर्वोत्तम गोलच्या जोरावर लोयोला एचएसचा १-० असा पराभव केला. त्यानंतर, न्यू मिलेनियमने मॉडर्न एचएसवर २-१ अशी मात करताना सलग दुसरा विजय नोंदवला. विजेत्या संघाकडून राकेश एम. (६वे, ५९वे) तर पराभूत संघाकडून स्वयंभ पार्डेने (१६वे) गोल केला. मुले गटात कर्नल भगत इंग्लिश स्कूलने रामचंद्र गायकवाड स्कूलचा १०-० असा धुव्वा उडवला. अयान शाहचे (२५वे - पीसी, १६वे- पीसी, ५५वे) तीन तसेच कादर खानचे (२५वे-पीसी, ४६वा) दोन आणि अभिषेक वर्मा (२रा), शाहीद शेख (३रा), नुमैर शेख (३० वे); अरबाज खान (३२वे) आणि मारुफ खानचा (५१वे - पीसी) प्रत्येकी एक गोल त्यांच्या विजयाचे प्रमुख वैशिष्ट्य ठरले.

## गुकेशचा उलटवार, तिसरा डाव जिंकला; लिरेनला आणले शरण

**नवी दिल्ली :** भारतीय ग्रँडमास्टर डी गुकेशने शानदार खेळ करून विश्वअजिंक्यपद बुद्धिबळ स्पर्धेत गतविजेत्या चीनच्या डिंग लिरेन याला तिसऱ्या फेरीत पराभवाचा धक्का दिला आणि १.५०-१.५० अशी बरोबरी साधली.या स्पर्धेच्या सलामीला पहिल्या डावात काळ्या मोहऱ्यांसह खेळताना चुका केल्यामुळे पराभव सहन करावा लागलेल्या गुकेशने आजच्या तिसऱ्या डावासाठी कमालीची तयारी केल्याचे दिसून आले. मुळात चालीसाठी वेळेवर त्याचे नियंत्रण होते. त्याचवेळी लिरेन एकेक चाल करण्यासाठी बराच वेळ घेत होता. या विजयाचा आनंद निश्चितच आहे. गेल्या दोन डावांतील खेळावर मी समाधानी आहे. आजच्या दिवसातील खेळ फारच चांगला होता. बोर्डवर येताच आत्मविश्वास वाढलेला होता. प्रतिस्पर्धी खेळाडूला नामोहरम करताना आपला विश्वास अधिक वाढत असतो, असे गुकेशने आजच्या विजयानंतरच्या पत्रकार परिषदेत सांगितले. १३व्या चालीपर्यंत गुकेश घड्याळानुसार एका तास पुढे होता. जेथे लिरेनने एक सात सहा मिनिटे घेतली तेथे गुकेशने केवळ चार मिनिटांत चाली केल्या होत्या. १२० मिनिटांच्या निर्धारित वेळेत ४० चाली करायच्या असताना गुकेशने निर्विवाद वर्चस्व मिळवले होते.



## पीव्ही सिंधू, लक्ष्य सेन दुसऱ्या फेरीत दाखल



**लखनौ :** सय्यद मोदी आंतरराष्ट्रीय सुपर ३०० बॅडमिंटन स्पर्धेच्या दुसऱ्या फेरीत दाखल होताना अव्वल मानांकित पी. व्ही. सिंधू हिने महिला एकेरीत, तर लक्ष्य सेन याने पुरुष एकेरीत सरळ गेममध्ये आकर्षक विजय नोंदविले. दोन वेळच्या ऑलिंपिक पदकविजेत्या सिंधू हिने उदयोन्मुख खेळाडू अनमोल खरब हिला २१-१७, २१-१५ अशा फरकाने नमविले. या स्पर्धेत सिंधू दोन वर्षांनंतर सहभागी झाली आहे. आता दुसऱ्या फेरीत तिच्यासमोर ईरा शर्मा हिचे आव्हान असेल. तिने दुसरी फेरी गाठताना दीपशिखा सिंग हिला २१-१३, २१-१९ असे पराभूत केले. २०२१ साली जागतिक स्पर्धेत ब्राँझपदक जिंकलेल्या लक्ष्य सेन याने पहिल्या फेरीतील लढतीत मलेशियाच्या शोलेह ऐदिली याला २१-१२, २१-१२ असे पराजित केले. पहिल्या फेरीतील विजयानंतर सिंधू हिने सांगितले, 'दोन वर्षांनंतर या स्पर्धेत खेळताना मला आनंद झालेला आहे.

## एलिट ईगल्स्, आर्यन्स् क्रिकेट संघांचे विजय !

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** स्पोर्टसफिल्ड मॅनेजमेंट तर्फे आयोजित 'स्पोर्टसफिल्ड अजिंक्यपद करंडक' १७ वर्षाखालील आंतरक्लब एक-दिवसीय क्रिकेट स्पर्धेत एलिट ईगल्स् अ‍ॅकॅडमी आणि आर्यन्स् क्रिकेट अ‍ॅकॅडमी या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा दोनशेहून अधिक धावसंख्येच्या फरकाने पराभव करून शानदार आगेकूच केली.

मुकुंदनगर येथील महाराष्ट्रीय मंडळाच्या क्रिकेट नेक्स्ट अ‍ॅकॅडमीच्या मैदानावर झालेल्या स्पर्धेत जलदगती गोलंदाज साईराज शेलार याने केलेल्या भेदक गोलंदाजी आणि विहान केंजळे याच्या १४५ धावांच्या जोरावर एलिट ईगल्स् अ‍ॅकॅडमीने स्पार्क क्रिकेट अ‍ॅकॅडमीचा २९२ धावांनी दणदणीत पराभव केला. पहिल्यांदा फलंदाजी करणाऱ्या एलिट ईगल्स् अ‍ॅकॅडमीने ५० षटकात ७ गडी गमावून ३८३ धावांचा डोंगर उभा केला. विहान केंजळे याने ९५ चेंडूत २० चौकार आणि ४ षटकारांसह १४५ धावा तर, आयुष शर्मा याने ९३ धावांची खेळी साकारली. याशिवाय अर्णव पाटील याने नाबाद ५१ जोडल्या. या लक्ष्याचा पाठलाग करणाऱ्या स्पार्क क्रिकेट अ‍ॅकॅडमीचा डाव ९१ धावांवर आटोपला.



## स्टोक्स ने का घेतला आयपीएल न खेळण्याचा निर्णय?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** प्रीमियर लीग २०२५ लिलाव जेद्दाह येथे पार पडला, या लिलावात अनेक स्टार खेळाडूंना मोठी रक्कम मिळाली. दरम्यान, या लिलावातून एक मोठं नाव गायब होतं, ते नाव म्हणजे बेन स्टोक्स.

इंग्लंडचा कसोटी कर्णधार बेन स्टोक्सने या लिलावासाठी नाव नोंदवलं नव्हतं. त्यामुळे तो लिलावातही दिसला नाही. अनेकांना त्याच्या या निर्णयाचे आश्चर्य वाटले. या लिलावासाठी ५२ इंग्लिश क्रिकेटपटूंनी नाव नोंदवलं होत. पण स्टोक्सने हा निर्णय घेणं टाळलं. त्याने ऑक्टोबर दरम्यानच आयपीएल लिलावात सामील न होण्याचा निर्णय घेतला होता. त्यामुळे आता किमान २०२७ पर्यंत तो आयपीएल खेळू शकणार नाही.त्यावेळी त्याने पस्तीशीही पार केली असेल.

## क्युरोगी या प्रकारात पुणे जिल्ह्यात प्रथम

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** जळगाव जिल्हा तायक्वांडो असोसिएशन तथा तायक्वांडो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने २१ ते २३ नोव्हेंबर २०२४ रोजी ३४ व्या महाराष्ट्र राज्य सब ज्युनिअर तथा दहावी पुमसे राज्यस्तरीय स्पर्धा जळगाव येथील छत्रपती शिवाजी महाराज जिल्हा क्रीडा संकुल बॅडमिंटन हॉल येथे आयोजित करण्यात आले होते.




या स्पर्धेत क्युरोगी या प्रकारात पुणे जिल्ह्याने प्रथम क्रमांक पटकावला तर रत्नागिरी जिल्ह्याने द्वितीय क्रमांक पटकावला व तृतीय क्रमांक अमरावती जिल्हा तर पुमसे याप्रकारात पालघर जिल्हा प्रथम क्रमांक, द्वितीय रत्नागिरी, तृतीय सब मुंबई यांनी पटकाविले. उत्कृष्ट खेळाडू म्हणून मुलांमध्ये ठाण्याचा शक्ती दाभाडे तर मुलींमध्ये दुर्वा गुरव विजयी ठरलेत.

या स्पर्धेत संपूर्ण महाराष्ट्रातून ५५० खेळाडूंनी यशस्वी सहभाग नोंदवला. या स्पर्धेचे उद्‌घाटन जैन इरिगेशनचे मीडिया प्रमुख अनिल जोशी यांच्या हस्ते झाले. यावेळी तायक्वांडो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र चे अध्यक्ष डॉ. अविनाश बारगजे तसेच उपाध्यक्ष दुलीचद मेश्राम, कोषाध्यक्ष वेंकटेश करा तसेच जळगाव जिल्हा तायक्वांडो असोसिएशनचे सचिव अजित घारगे, रविंद्र धर्माधिकारी, महेश घारगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

२८ विविध वजनी गटात झालेल्या स्पर्धेत यात १४ मुले व १४ मुली सुवर्णपदक विजेते यांची हरियाणा येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्राच्या संघात निवड झाली आहे.

## भाजपमध्ये प्रवेश केला तर बंदी उठेल; बजरंगची टीका

**नवी दिल्ली :** मी भाजपमध्ये प्रवेश केला तर माझ्यावरची बंदी लगेचच उठवली जाईल, अशी खोचक टीका ऑलिंपिक पदकविजेता मल्ला बजरंग पुनिया याने केली आहे. उत्तेजक चाचणीसंदर्भात चाचणी नमुने देण्यास नकार दिल्यामुळे बजरंगवर चार वर्षांची बंदी घालण्यात आली आहे. राष्ट्रीय उत्तेजक प्रतिबंधक (नाडा) समितीने बजरंगवर बंदीची ही कारवाई केली आहे. १० मार्च रोजी झालेल्या निवड चाचणीदरम्यान उत्तेजक चाचणी देण्यास बजरंगने नकार दिला होता. बजरंगवर सर्वप्रथम जागतिक कुस्ती संघटनेने २३ एप्रिल रोजी बंदीची कारवाई केली होती. आता नाडाने बंदीची शिक्षा केली आहे. माझ्यासाठी ही धक्कादायक बातमी नाही. चाचणीतील उत्तेजक चाचणीचा हा प्रकार वर्षभरापूर्वीचा आहे. मुळात या गोष्टीला खूप उशीर झालेला आहे आणि मी त्यावेळी चाचणीस नकारही दिलेला नव्हता. ते माझ्याघरी चाचणीसाठी आले होते; पण त्यांच्याकडे असलेले चाचणीचे कीट याची मुदत संपलेली होती आणि मुदत संपलेल्या त्या तारखेसह मी ही माहिती सोशल मीडियावर उघड केली होती, असे बजरंगने सांगितले. बजरंगने विनेश फोगाटसह काही महिन्यांपूर्वी काँग्रेस पक्षात प्रवेश केलेला आहे. तुम्ही कोणालाही चाचणी घेण्यासाठी मुदत संपलेले कीट देऊ शकत नाही.



## प्रो कबड्डी लिग ११ स्पर्धेच्या फायनलचा मान महाराष्ट्राला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** यंदाच्या प्रो कबड्डी लीगच्या प्ले ऑफ लढती आणि अंतिम सामना पुण्यात म्हाळुंगे बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलातील बॅडमिंटन हॉल येथे २६ ते २९ डिसेंबर दरम्यान होणार आहेत.

लीग टप्प्यातील अव्वल दोन संघ थेट उपांत्य फेरीसाठी पात्र ठरणार आहेत. तिसऱ्या, चौथ्या, पाचव्या आणि सहाव्या स्थानावरील संघ २६ डिसेंबर रोजी एलिमिनेटर टप्प्यात आमनेसामने येतील. तिसऱ्या क्रमांकावर येणारा संघ एलिमिनेटर १ मध्ये सहाव्या स्थानावर असलेल्या संघाशी खेळेल. चौथ्या स्थानावरील संघ पाचव्या स्थानावरील संघाशी एलिमिनेटर २ मध्ये खेळेल.



एलिमिनेटर १चा विजेता उपांत्य फेरीत गुणतालिकेतील अव्वल स्थानावर असणाऱ्या संघाशी खेळेल. एलिमिनेटर २ चा विजेता दुसऱ्या उपांत्य फेरीत गुणतालिकेतील दुसऱ्या स्थानावरील संघाशी खेळेल.

## स्पाइन स्टार, ॲबिशियस क्रिकेट संघांची आगेकूच

**पुणे :** लायन्स क्लब पुणे रहाटणी च्या वतीने आयोजित लायन्स ज्युनियर लीग १३ वर्षाखालील एकदिवसीय क्रिकेट स्पर्धेत साखळी फेरीत स्पाइन स्टार क्रिकेट अकादमी, ॲबिशियस क्रिकेट अकादमी या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून आगेकूच केली.

फोर स्टार मैदान हिंजवडी येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत साखळी फेरीत ऋतुराज शिरतोडे(२-३६ व नाबाद १००) याने केलेल्या सुरेख अष्टपैलू खेळीच्या जोरावर ॲबिशियस क्रिकेट अकादमी संघाने क्रीक फायटर्स संघाचा ५ गडी राखून पराभव केला.

## महाराष्ट्राची घोडदौड, दोन्ही संघाचा बाद फेरीत प्रवेश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** कुमार व मुली गटाच्या ४३व्या राष्ट्रीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धेत महाराष्ट्राच्या मुले व मुलींच्या संघाने बाद फेरीत प्रवेश केला आहे. बाद फेरीत महाराष्ट्राच्या मुली छत्तीसगडबरोबर तर मुले कोल्हापूरबरोबर लढतील.

अलिगड (उत्तरप्रदेश) येथील महाराणी अहिल्याबाई होळकर स्पोर्टस स्टेडियमवर सुरू असलेल्या या स्पर्धेत शेवटच्या साखळी सामन्यात भरतसिंग वसावेने (२.१० मि. ४ गुण) व आशिश गौतम (२.४०, १.४० मिनिटे व ४ गुण) यांच्या अष्टपैलू खेळीमुळे महाराष्ट्राच्या मुलांनी पुद्दुचेरीवर ३९-२४ असा एक डाव राखून १५ गुणांनी दणदणीत विजय मिळविला.

जितेंद्र वसावे व सोत्या वळवी यांनी आपल्या धारदार आक्रमणात प्रत्येकी ८ गडी बाद करीत त्यांना साथ दिली. पुद्दुचेरीकडून स्टेफनन ६ गडी बाद केले. महाराष्ट्राच्या मुलींच्या शेवटच्या साखळी सामन्यात यजमान उत्तरप्रदेशचा २८-५ असा एक डाव २३ गुणांनी धुव्वा उडविला.

## क्रिकेट सामना सुरू असताना आला हृदयविकाराचा झटका

**छत्रपती संभाजीनगर :** सिडको गरवारे मैदानावर बुधवारी सायंकाळी सुरू असलेल्या एका सामन्यादरम्यान शहरातील प्रसिद्ध क्रिकेटपटू तथा उद्योजक इमरान पटेल (वय.३५, रा. रोजाबाग, आझाद महाविद्यालयाजवळ, उद्धवराव पाटील चौक) यांचे तीव्र हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. सामना खेळत असताना मैदानावरच ते कोसळले. त्यांच्या निधनामुळे क्रिकेट क्षेत्रात मोठी शोककळा पसरली आहे.गरवारेच्या मैदानावर क्रिकेटच्या स्पर्धा सुरू आहेत. या स्पर्धेदरम्यान बुधवारी सायंकाळी सहा वाजता यंग एलेव्हन विरुद्ध लकी बिल्डर यांच्यात सामना सुरू होता.

### पहिल्या दिवशी इग्लंडच्या गोलंदाजांचा दबदबा

# द्रविडचा 'नकोसा' विक्रम केनच्या नावावर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या फायनलमध्या जाण्याची न्यूझीलंडलाही संधी आहे आणि त्यांना उर्वरित कसोटी सामने जिंकावे लागणार आहे. पण, इंग्लंडविरुद्धच्या घरच्या मैदानावरील कसोटीच्या पहिल्याच दिवशी न्यूझीलंड संघ बॅकफूटवर फेकला गेला आहे. केन विलियम्सनने पुनरागमन करताना चांगली फटकेबाजी केली, परंतु त्याच्या नावावर नकोसा विक्रम नोंदवला गेला.



डेव्हॉन कॉनवे ( २) दुसऱ्याच षटकात गस ॲटकिन्सच्या गोलंदाजीवर झेलबाद झाला. कर्णधार टॉम लॅथम व केन यांनी अर्धशतकी भागीदारी करून संघाला सावरले. केनने भारताविरुद्धच्या कसोटी मालिकेतून दुखापतीमुळे माघार घेतली होती. त्याच्या गैरहजेरीतही किवींनी भारताला त्यांच्याच घरी ३-० असे पराभूत करण्याचा पराक्रम केला. ब्रेंडन कार्सने न्यूझीलंडला दुसरा धक्का देताना लॅथमला ४७ धावांवर माघारी पाठवले.

रचीन रविंद्र ( ३४) वगळल्यास नंतर केनला किवींच्या अन्य फलंदाजांना फार साजेशी साथ देता आली नाही. डॅरिल मिचेल ( १९) व टॉम ब्लंडल ( १७) हे अपयशी ठरले. केन खिंड लढवत राहिला आणि शतकासमीप पोहोचला होता. पण, ॲटकिन्सनने त्याला नर्व्हस 90s मध्ये माघारी पाठवले. केन १९७ चेंडूंत १० चौकारांसह ९३ धावांवर माघारी परतला. कसोटी क्रिकेटमध्ये मागील सहा वर्षांत तो प्रथमच ९०च्या पार जाऊन शतक पूर्ण करू शकला नाही. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक नर्व्हस 90s वर बाद होणाऱ्या फलंदाजांत सचिन तेंडुलकरनंतर ( २७) केनचा ( १३) क्रमांक लागतो. त्याने आज राहुल द्रविड, एबी डिव्हिलियर्स ( १२) यांना मागे टाकून नकोशा विक्रमात आगेकूच केली.

#रा

## अय्यरच्या झंझावाती ७१ धावा, रहाणेचीही फिफ्टी; ५ विकेटने मुंबईचा सहज विजय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**हैदराबाद :** आयपीएल लिलावात दुसऱ्या क्रमांकाची सर्वाधिक बोली लागलेल्या श्रेयस अय्यरने आपला फॉर्म कायम ठेवताना ३९ चेंडूत ७१ धावांचा झंझावात सादर केला, त्यामुळे मुंबईने मुश्ताक अली राष्ट्रीय ट्वेन्टी-२० स्पर्धेत महाराष्ट्रावर पाच विकेट आणि १७ चेंडू राखून मात केली.

महाराष्ट्र डर्बी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या सामन्यात महाराष्ट्राने प्रथम फलंदाजी करताना नऊ बाद १७१ धावा केल्या. अर्निष कुलकर्णी आणि कर्णधार ऋतुराज गायकवाड प्रत्येकी १९ धावांवर बाद झाल्यावर महाराष्ट्राची सहा बाद ७५ अशी घसरगुंडी उडाली होती; मात्र यष्टीरक्षक निखिल नाईकने ४७ धावा फटकावल्या, त्यामुळे त्यांना समाधानकारक धावा करता आल्या.



मुंबईची सुरुवात निराशाजनक झाली. आयपीएलमध्ये बोली न लागलेला पृथ्वी शॉ शून्यावर बाद झाला. त्यानंतर दोन बाद ३२ अशा स्थितीनंतर श्रेयस अय्यर आणि अजिंक्य रहाणे यांनी १० षटकांत ११० धावांची भागीदारी करून मुंबईचा विजय निश्चित केला. श्रेयसने आठ चौकार आणि तीन षटकार मारले तर रहाणेने तीन चौकार आणि तीन षटकारांसह ३४ चेंडूंत ५२ धावा केल्या.